


# आपला वैभवशाली
# मावळ लोकसभा मतदारसंघ



संकल्पना
**श्रीरंग आप्पा बारणे**
खासदार, मावळ लोकसभा

# आपला वैभवशाली
# मावळ लोकसभा मतदारसंघ

संकल्पना
**श्रीरंग आप्पा बारणे**
खासदार, मावळ लोकसभा

**संकल्पना**
श्रीरंग आप्पा बारणे
खासदार, मावळ लोकसभा
थेरगाव, चिंचवड, जि.पुणे.

**प्रकाशक**
गजानन पोपटराव चिंचवडे पाटील
चिंचवड, पुणे.

**मुद्रक**
मधुबन क्रिएशन
शिवशक्ती कॉम्प्लेक्स, मंचर,
ता. आंबेगाव, जि. पुणे.
मो. ९८९०९८९६०५

**प्रथम आवृत्ती**
मे २०१८

# अनुक्रमणिका

**✻ मनोगत**

दोन शब्द अभिमानाचे ........ १

**✻ मावळ लोकसभा : महापालिका, नगरपरिषद, नगरपालिका**

१. पिंपरी चिंचवड महानगरपालिका ........ ६

२. पनवेल महानगरपालिका ........ ९

३. नगरपालिका/नगरपरिषद

लोणावळा, तळेगाव दा., कर्जत, उरण, खोपोली, माथेरान ........ ११

४. नगरपंचायत खालापूर, वडगाव ........ १३

**✻ मावळ लोकसभा : औद्योगिक वसाहती**

१. पिंपरी चिंचवड एम.आय.डी.सी. ........ १५

२. तळेगाव दाभाडे एम.आय.डी.सी. ........ १७

३. पाताळगंगा एम.आय.डी.सी. ........ १९

४. तळोजा एम.आय.डी.सी. ........ २१

**✻ मावळ लोकसभा : धरणे**

१. मोरबे धरण ........ २३

२. आंद्रा धरण ........ २४

३. भूशी धरण ........ २५

४. पवना धरण ........ २७

५. जाधववाडी धरण ........ २८

६. वडीवळे धरण ........ २९

७. तुंगार्ली धरण ........ ३०

८. पळसदरी धरण ........ ३१

९. ठोकळवाडी धरण ........ ३२

१०. वळवण धरण ........ ३३

**✻ मावळ लोकसभा : प्रेक्षणीय स्थळे**

१. लोणावळा–खंडाळा हिल स्टेशन ..... ३६
२. निसर्गरम्य माथेरान (गिरीस्थान) ..... ३९
३. कर्नाळा पक्षी अभयारण्य ..... ४१
४. निसर्गाचा अविष्कार मावळ ..... ४३
५. मावळचा गुलाब ..... ४६
६. ऐतिहासिक वडगाव मावळ ..... ४८
७. एन.डी. स्टुडिओ – खालापूर ..... ५०
८. शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा–डांगे चौक, थेरगाव ..... ५२

**✻ मावळ लोकसभा : धार्मिक स्थळे**

१. एकविरा देवी – कार्ला ..... ५४
२. महडचा अष्टविनायक गणपती ..... ५६
३. चिरनेरचा गणपती ..... ५८
४. चिंचवडचे मोरया गोसावी ..... ६०
५. देहूरोडचे बुद्ध विहार ..... ६२
६. बिर्ला गणपती/प्रति शिर्डी – शिरगाव ..... ६४
७. देहू संत तुकाराम महाराज ..... ६६
८. खोपोलीचे गगनगिरी महाराज ..... ६९
९. केजुदेवी मंदिर – थेरगाव ..... ७२

**✻ मावळ लोकसभा : लेणी**

१. कार्ला लेणी ..... ७४
२. भाजे लेणी ..... ७६
३. घारापुरी लेणी ..... ७८
४. कोंढाणा लेणी ..... ८०
५. बेडसे लेणी ..... ८२
६. घोरावडेश्वर लेणी ..... ८४

**❊ मावळ लोकसभा : किल्ले–दुर्ग**

१. राजमाची किल्ला ........ ८७

२. लोहगड किल्ला ........ ८९

३. कर्नाळा किल्ला ........ ९१

४. विसापूर किल्ला ........ ९३

५. तुंग किल्ला ........ ९५

६. तिकोणा किल्ला ........ ९७

**❊ मावळ लोकसभा : नद्या**

१. इंद्रायणी नदी ........ ९९

२. पवना नदी ........ १००

३. आंद्रा नदी ........ १०१

४. कुंडलिका नदी ........ १०२

५. उल्हास नदी ........ १०३

६. पाताळगंगा नदी ........ १०४

७. पेज नदी ........ १०५

८. मुळा नदी ........ १०६

**❊ मावळ लोकसभा : क्रांतीकारक व थोर समाजसेवक**

१. आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके ........ १०८

२. चिंचवडचे क्रांतीवीर चाफेकर बंधू ........ ११०

३. हुतात्मा भाई कोतवाल ........ ११२

४. हुतात्मा हिराजी पाटील ........ ११४

५. चिरनेरचा सत्याग्रह ........ ११६

६. महाराष्ट्र भूषण डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी ........ ११८

**✻ मावळ लोकसभा : महत्वाचे शासकीय उपक्रम**


१. जे.एन.पी.टी./न्हावा शेवा बंदर ..... १२२

२. ओ.एन.जी.सी. ..... १२४

३. शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) ..... १२६

४. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण ..... १३०

५. पुणे महानगर विकास निर्माण संस्था (PMRDA) ..... १३२

६. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कोपर–पनवेल (प्रस्तावित) ..... १३४

७. हिंदुस्तान अँटिबायोटिक्स लिमिटेड पिंपरी ..... १३६

८. आय.एन.एस. शिवाजी ..... १३७

९. मिलीटरी इंजिनियरींग कॉलेज–दापोडी ..... १३८

१०. दारूगोळा कारखाना – देहूरोड ..... १३९

११. एन.ए.डी. – मोरा ..... १४०

१२. भक्ती–शक्ती शिल्प – निगडी, देशातील उंच तिरंगा ..... १४१

१३. मुंबई–पुणे एक्सप्रेस वे ..... १४३

१४. गहुंजे क्रिकेट स्टेडिअम ..... १४५


**✻ मावळ लोकसभा : तालुके/विधानसभा**


१. पिंपरी विधानसभा ..... १४८

२. चिंचवड विधानसभा ..... १४९

३. मावळ तालुका ..... १५०

४. कर्जत तालुका ..... १५१

५. खालापूर तालुका ..... १५२

६. पनवेल तालुका ..... १५९

७. उरण तालुका ..... १५४


● ● ●

# दोन शब्द अभिमानाचे



'पुणे तिथे काय उणे' अशी एक म्हण आहे. ती खरोखरच योग्य आहे. पुण्यामध्ये सर्वकाही आहे. सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि राजकीय वारसा तर आपल्याला भरभरून मिळाला आहे. छत्रपती शिवरायांची जन्मभूमी असलेला व मावळ प्रांतातील किल्ल्यांवर घोडदौड करून मावळ प्रांतात मावळे जमा केलेला पुण्याचा भाग आणि ज्या रायगड प्रांतातून रयतेचे राज्य केले तो रायगडचा भाग हा मावळ लोकसभेचा मतदारसंघ. याच भागात अध्यात्मात संत ज्ञानेश्वरांनी पाया रचला आणि जगद्गुरू तुकोबांनी त्यावर कळस चढविला. अशा थोर परंपरेच्या पुण्याचे अर्थात मावळ लोकसभा मतदारसंघाचे नेतृत्व करण्याची संधी मला मिळाली, हे मी माझे भाग्य समजतो.

पूर्वी मावळ हा स्वतंत्र लोकसभा मतदारसंघ नव्हता. या मतदारसंघातील काही भाग खेड लोकसभा आणि काही भाग कुलाबा या स्वतंत्र लोकसभा मतदारसंघात होता. पूर्वी खेड मतदारसंघातून बाळासाहेब साळुंके, आर.के. खाडीलकर, अनंतराव पाटील, अण्णासाहेब मगर, रामकृष्ण मोरे, किसनराव बाणखेले, विदुरा नवले, निवृत्ती शेरकर, अशोक मोहोळ, शिवाजीराव आढळराव पाटील या दिग्गज नेत्यांनी संसदेत नेतृत्व केलेले आहे. त्याचबरोबर कुलाबा या मतदारसंघातून सी.डी. देशमुख, राजाराम राऊत, भास्कर दिघे, दत्तात्रय कुंटे, शंकरराव सावंत, दि.बा. पाटील, ए.टी. पाटील, ए.आर. अंतुले, रामशेठ ठाकूर या दिग्गज नेत्यांनी संसदेत नेतृत्व केलेले आहे. तसेच पिंपरी-चिंचवड शहराचा काही भाग सन २००९ पूर्वी बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये समाविष्ट असल्याने या लोकसभा मतदारसंघाचे नेतृत्व केशवराव जेधे, गुलाबराव जेधे,

तुलसिदास जाधव, आर. के. खाडीलकर, संभाजीराव काकडे, शरदचंद्रजी पवार, शंकरराव पाटील या दिग्गज नेत्यांनी केलेले आहे.

दि. १९ फेब्रुवारी २००८ मध्ये राज्यातील लोकसभा मतदारसंघाची पुनर्रचना करण्यात आली. त्यात मावळ लोकसभा हा नविन मतदारसंघ तयार झाला. या लोकसभा मतदारसंघात पुण्यातील मावळ, पिंपरी, चिंचवड हे तीन विधानसभा मतदारसंघ आणि रायगड जिल्ह्यातील कर्जत-खालापूर, पनवेल आणि उरण या तीन मतदारसंघाचा समावेश होतो. दिग्गज नेत्यांनी नेतृत्व केलेल्या पुण्याचे अर्थात पुण्यातील मावळ लोकसभा मतदारसंघाचे नेतृत्व करण्याची संधी मला शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या आशीर्वादाने आणि प्रेरणेने मिळाली आहे याचा मला अभिमान वाटतो.

छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मभूमी असलेला पुणे जिल्हा आणि त्यांची स्वराज्याची राजधानी असलेला रायगड जिल्हा अशा दोन्ही पावन भूमीचे लोकसभेत नेतृत्व करण्याची संधी मला मिळाली आहे. ही माझ्यासाठी अभिमानाची बाब असली तरी ज्या शिवाजी महाराजांनी राज्यकर्ते कसे असायला हवेत याचा आदर्श घालून दिला. त्या मार्गावर चालण्याचे आव्हानही पेलण्याची शक्ती आई जगदंबा देवो ही प्रार्थना!

मावळ लोकसभा मतदारसंघातून निवडून आल्यानंतर मला दोन वेगवेगळ्या संस्कृती, राहणीमान, शेती आणि बोली भाषा असलेल्या भागामध्ये काम करण्याची संधी मिळाली. एका भागात उंच सह्याद्रीचा माथा तर दुसऱ्या भागात अथांग समुद्र किनारा. वेगवेगळ्या प्रांतातून नोकरी-व्यवसायासाठी आलेले कामगार, उरण येथील मासेमारी करणारे बांधव, रायगड जिल्ह्यातील काही आदिवासी पाड्यावरील निष्पाप, निरागस आदिवासी बांधव, मावळात भातशेती करणारे बांधव इत्यादींच्या अडी-अडचणी-समस्या सोडवताना केव्हा त्यांचाच झालो ते कळालेही नाही. मोठ्या आपुलकीने आणि हक्काने लोक मला आपला समजतात, यापेक्षा आनंददायी घटना ती कोणती असणार आहे. ग्रामीण, डोंगराळ आणि शहरी असे टोकाचे अंतर असणारा हा भाग असला तरी माझ्यासाठी हे एका एकत्रित कुटुंबासारखं आहे.

मावळ आणि कोकण भागाचा लोकप्रतिनीधी म्हणून काम करताना अठरा पगड जाती धर्माच्या लोकांचा संपर्क आला, सहवास लाभला. माणसं जोडून

माणूसकी कायम टिकवणं हा या मावळच्या मातीचाच गुण आहे. हे आपण शिवकाळापासून पहात आलो आहे. मी ही त्याच मातीत जन्मलो आणि वाढलो आहे. त्यामुळे भरपूर लोक जोडले व लोकांचे प्रेमही मिळाले. असं म्हणतात मनुष्य जन्माला आला की तो तीन प्रकारची ऋण घेऊन जन्माला येतो. पहिले ऋण असते जन्म देणाऱ्या आई वडिलांचे, दुसरे ऋण असते ज्या भूमीत जन्म झाला तिच्या उद्धाराचे (विकासाचे) आणि तिसरे ऋण असते देशाचे ! या देशाची सेवा करण्याचे! मी भाग्यशाली समजतो की या तिन्ही ऋणातून थोडे का होईना मुक्त होण्याची संधी मला मिळाली आहे. ही संधी मला उपलब्ध करून दिल्याबद्दल शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांचा मी शतश: ऋणी आहे.

मित्रहो, छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या ऐतिहासिक भूमीच्या विकासासाठी मला काम करण्याची संधी मिळाली आहे. ही भूमी ऐतिहासिक तर आहेच, याशिवाय वैभवशाली देखील आहे. सह्याद्रीचे उंच उंच डोंगरकडे, दऱ्या, खोरे, नद्या, धरणे, तलाव आणि सुंदर वनांनी नटलेल्या या भूभागाचा भौतिक विकासही तितक्याच वेगाने झाला आहे. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या कंपन्यांनी औद्योगिक वसाहतीमध्ये येऊन केवळ इथल्याच नव्हे तर राज्यभरातल्या कामगारांच्या हाताला काम दिले आहे. विज्ञानाच्या भरारीसोबत आयटी कंपन्याही स्थिरावल्या आहेत. या कंपन्यांनी पुण्याला वेगळी ओळख करून दिली आहे.

एकेकाळी गुलाब म्हटले की काश्मिरची आठवण यायची. काश्मिरचा गुलाब जगात प्रसिद्ध होता. आज माझ्या मावळातला गुलाब जगातल्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे. मावळातील ऐतिहासिक गड किल्ले प्रेरणा देत आहेत. सह्याद्रीच्या कुशीत पडणाऱ्या पावसाने धरणे तुडूंब भरली आहेत आणि लोकांचे जगणे समृद्ध करत आहेत. मावळ लोकसभा मतदारसंघाचा पश्चिम भाग असलेल्या उरण भागात समुद्र किनाऱ्यालगत जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट सारखे बंदर तयार झाल्याने अवघा देश या माझ्या मतदारसंघाशी यानिमित्ताने जोडला गेला आहे. जगातील कोणत्याही भागातून काहीही आयात किंवा निर्यात करण्यासाठी या जेएनपीटीचा उपयोग होत आहे. लोणावळा-खंडाळा आणि माथेरानसारखी हिल स्टेशन्स देशभरातल्या लोकांना भूरळ घालत आहेत. अशा

या वैभवशाली भूमीचे लोकप्रतिनिधीत्व मी करत आहे. याचा मला सार्थ अभिमान आहे. दोन वेगवेगळ्या प्रांतांना, घाटमाथा आणि कोकण यांना जोडणारा हा लोकसभा मतदारसंघ असल्यामुळे त्याची ओळख, परंपरा आणि ऐतिहासिक वारसासह तमाम लोकांना माहिती व्हावी, यासाठी एखादे पुस्तक तयार करावे अशी कल्पना या मतदारसंघात फिरत असताना माझ्या मनात अनेकदा आली होती. अखेर त्याला आज मूर्त रूप प्राप्त झाले आहे.

गेली चार वर्षे मी या मतदारसंघात फिरतो आहे, काम करीत आहे. कोकण आणि घाटमाथा असे थोडे वगळेपण आहे. चालीरिती, रूढी परंपरा जरा निराळ्या आहेत. पण एक मतदारसंघ म्हणून आम्ही त्याला एकत्र बांधले आहे. आदिवासींचे सण, उत्सव असोत की पुण्यातला गणेशात्सव असो या सर्वांना एकत्र बांधले आहे. ही गोष्ट जेव्हा मी दिल्लीत किंवा राज्याबाहेर सांगतो तेव्हा तेथील लोकांना माझं विशेष वाटतं की, मी शिवाजी महाराजांच्या कर्मभूमीचे नेतृत्व करतो, त्यांचे गड किल्ले माझ्या मतदारसंघात आहेत.

या सर्व ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि नैसर्गिक ठेव्यांबद्दल भरभरून लोकांना सांगावेसे वाटते. परंतु प्रत्येक वेळी ते शक्य नसते. त्यासाठी असे पुस्तक काढावे असे मनाला वाटले. मावळ लोकसभा मतदारसंघ व त्यामधील वैशिष्ट्ये, मतदारसंघातील कामाची व्याप्ती सर्वसामन्य जनतेपर्यंत पोहोचावी यासाठी हा शब्दप्रपंच. एखादी गोष्ट मनाला भावली की ती मी पुर्ण करतोच. परिणामत: आज हे पुस्तक आपल्या हाती येत आहे. मला आशा आहे की माझा हा प्रयत्न आपणास नक्की आवडेल.

स्वत:चा स्वार्थ न पाहता
सतत राष्ट्र हिताचा विचार मांडणारे
प्रखर राष्ट्रप्रेमी शिवसेनाप्रमुख
स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे
यांच्या पवित्र स्मृतीस हे पुस्तक अर्पण करीत आहे

**श्रीरंग आप्पा बारणे**

खासदार, मावळ लोकसभा

# मावळ लोकसभा मतदारसंघातील समाविष्ट महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपालिका

# पिंपरी-चिंचवड महानगरपालिका



पिंपरी-चिंचवड शहराला धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक असा वारसा आहे. कोणे एकेकाळी भोज नावाचा राजा याच ठिकाणी होऊन गेल्याच्या कथा आहेत. भोज राजाची राजधानी भोजपूर होती तीच आत्ताची भोसरी आहे. इसवी सन ८५० ते १३१० या काळात यादव कालिन राजांनाही येथे राज्यकारभार केल्याच्या नोंदी सापडतात. गौतम बुद्धांच्या चरित्र्यामध्ये देखील या भागाचा उल्लेख आढळून येतो. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात स्वत:चे बलिदान देणारे क्रांतीकारक चाफेकर बंधू हेही याच चिंचवड गावचे.

अशा या सांस्कृतिक, धार्मिक आणि ऐतिहासिक महानगरीत अनेक प्राचीन मंदिरे देखील असून ती सर्वधर्मसमभावाची साक्ष देत आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे गणेशभक्त संत मोरया गोसावी यांचे चिंचवड हे समाधी स्थळ आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील हे एक श्रद्धेय तीर्थस्थान आहे. संत शिरोमणी जगद्‌गुरू तुकाराम महाराज यांचे जन्मगाव देहू हे देखील याच पावन भूमीच्या कुशीत बसलेले आहे. असे हे पावन शहर आहे. आज मितीला पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही आपल्या देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील नावाजलेली, प्रतिष्ठित आणि श्रीमंत समजली जाणारी महानगरपालिका आहे. मला याचा अभिमान वाटतो की ही महानगरपालिका माझ्या मावळ या लोकसभा मतदारसंघात आहे.

खरे तर पुण्याचे हे उपनगर बघता बघता वाढत गेले आणि दि. ४ मार्च १९७० मध्ये येथे नगरपालिका झाली. ज्येष्ठ नेते अण्णासाहेब मगर यांच्या पुढाकाराने ही नगरपालिका स्थापन झाली. वाढता औद्योगिक विस्तार आणि खेड्यापाड्यातून नोकरी शोधत येणारे बेरोजगारांचे लोंढे यामुळे पिंपरी चिंचवड परिसर वेगाने विस्तारात गेला आणि सन १९८२ साली या नगरपालिकेचे रूपांतर महानगरपालिकेत झाले. नगरपालिका असताना केवळ ८२ चौरस कि.मी. क्षेत्रफळ असणारा पिंपरी चिंचवड परिसर महानगरपालिका झाली तेव्हा तब्बल १८१ चौरस कि.मी. इतका अवाढव्य वाढला. आज या महानगरपालिकेच्या क्षेत्रात तब्बल २५ लाखाहून अधिक लोक वास्तव्य करत आहेत. संपूर्ण पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातून दरवर्षी लाखो लोक पिंपरी-चिंचवडमध्ये नोकरीसाठी आणि कायमचे वास्तव्य करण्यासाठी येत आहेत. दरवर्षी सरासरी ६% दराने लोकसंख्या वाढत आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे या भागात झालेले औद्योगिक विस्तारीकरण!

महापालिकेचे प्रथम महापौर मा. ज्ञानेश्वर लांडगे, कै.प्रा. रामकृष्ण मोरे व मा. अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवड शहराचा पाया रोवला.

पिंपरी चिंचवडमधील उद्योगक्षेत्राची मुहूर्तमेढ रोवली गेली ती १९५४ मध्ये. तत्कालिन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते उद्‌घाटन होऊन देशातील पहिल अँटिबायोटिक्स कारखाना याच पिंपरीमध्ये उभारला गेला. यासाठी राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण आणि अण्णासाहेब मगर यांचे मोलाचे योगदान आहे. हळूहळू येथे अनेक छोटे मोठे कारखाने आले अन् बघता बघता हे शहर निम्म्या महाराष्ट्राचे पोशिंदे कधी बनले ते कळलेच नाही. सुरूवातीला 'क' वर्गात असणारी महानगरपालिका पुढे 'अ' वर्ग झाली. आशिया खंडात सर्वात वेगाने वाढणारी महानगरपालिका म्हणून या महानगरपालिकेची गणना होते. सुरूवातीला केवळ पिंपरी चिंचवड, आकुर्डी आणि भोसरी या गावांचा समावेश असलेल्या या महानगरपालिकेत आता आणखी १७ गावांची भर पडली आहे. त्यामध्ये आसपासच्या सांगवी, वाकड, रावेत, मोशी, मामुर्डी, बोपखेल, पूनावळे, पिंपळे गुरव, निगडी, दिघी, दापोडी, थेरगाव, ताथवडे, तळवडे, चिखली, चऱ्होली आणि किवळे गावांचाही समावेश

झाला आहे. साधी ग्रामपंचायत असणारी ही गावे आपले रूप पालटून टोलेजंग इमारती असलेले शहर बनले आहे. या परिसरात अनेक मोठ्या शिक्षणसंस्था आहेत. शहरात उत्तम उद्याने, क्रिडांगणे, हॉस्पिटल्स्, स्वच्छ आणि रूंद रस्ते आहेत. या महानगरातील नागरीकांसाठी पिण्याचे पाणी आणि सांडपाण्याची व्यवस्था याबाबतीतही महानगरपालिकेने आपली प्रतिष्ठा निर्माण केली आहे. उत्पन्न आणि खर्चाचा ताळमेळ राखताना ही महानगरपालिका रू.५००० कोटी रूपयांचा अंदाजपत्रकापर्यंत पोहोचली आहे. या महानगरपालिकेत १२८ सदस्य (नगरसेवक) आहेत. या प्रत्येकांनी आपआपल्या परीने शहराच्या विकासात भर टाकण्याचा प्रयत्न केला आहे. या महानगरपालिकेचे नवीन रचनेनूसार ३२ प्रभाग असून प्रत्येक प्रभागातून ४ नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे नगरसेवकांची संख्या १२८ इतकी आहे. हे सर्व शहर स्वच्छ व सुंदर कसे राहील यासाठी हे सर्वजण झटत असतात.

• • •

# पनवेल महानगरपालिका



पनवेल हे शहर नवी मुंबईला जोडून असलेले शहर आहे. त्यामुळे त्याला मुंबईचे प्रवेशद्वार म्हणतात. तथापि पनवेल शहर हे रायगड जिल्ह्यात असून या जिल्ह्यातील ती एकमेव महानगरपालिका आहे. रायगड जिल्ह्यातील पनवेल, उरण, कर्जत आणि खालापूर हे चार तालुके मावळ लोकसभा मतदारसंघात येतात. त्यामुळे मावळ लोकसभा मतदासंघात आता पिंपरी-चिंचवड आणि पनवेल अशा दोन महानगरपालिका आहेत. त्या दोन्ही महानगरपालिका मुंबई-पुणे महामार्गावर वसलेल्या आहेत.

पनवेल महानगरपालिकेची स्थापना अलिकडेच म्हणजेच सन २०१६ मध्ये झाली आहे. तत्पुर्वी ती नगरपालिका होती. महाराष्ट्रातील पहिली नगरपालिका म्हणून पनवेल नगरपालिकेची गणना होते. या नगरपालिकेची स्थापना दि. २५ ऑगस्ट १८५२ मध्ये इंग्रज सरकारने केली. सन १९१० मध्ये नगरपालिकेची पहिली निवडणूक झाली. पहिला नगराध्यक्ष होण्याचा मान युसूफ नूर मोहम्मद यांना मिळाला. त्यानंतर अनेकांनी नगरपालिकेच्या विकासासाठीआपले योगदान दिले. शेतकरी-कष्टकऱ्यांसाठी आयुष्यभर झटणारे जेष्ठ नेते दि. बा. पाटील यांनीही पनवेल नगरपालिकेचे नगराध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे.

पनवेल नगरपालिका मुंबईला लागून असल्यामुळे भरमसाठ विस्तारत गेली. अनेकदा ती महानगरपालिका व्हावी म्हणून प्रयत्न झाले परंतू यश आले

नाही. शहराचा विस्तार मात्र वाढतच होता. त्यामुळे अखेर शासनाने सन २०१६ मध्ये नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रूपांतर केले. रायगड जिल्ह्यातील ती पहिलीच महानगरपालिका असून राज्यातील ती २७ वी महानगरपालिका आहे.

पनवेल महानगरपालिकेत या तालुक्यातील २९ गावांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये तळोजा, खारघर, कळंबोली, कामोठे आणि तुर्भेचाही समावेश आहे. या महापालिका हद्दीचे क्षेत्रफळ सुमारे ११० चौरस कि.मी.इतके आहे. पनवेल महानगरपालिकेची पहिली निवडणूक दि. २४ मे २०१७ रोजी झाली असून पहिला महापौर होण्याचा मान डॉ.कविता चौथमल यांना मिळाला आहे. पहिले आयुक्त होण्याचा मान मा. सुधाकर शिंदे यांना मिळाला आहे.

पनवेल महानगरपालिका खाडीच्या किनाऱ्यावर पसरलेली असून अतिशय दाट लोकवस्ती असलेली ही महानगरपालिका आहे. पनवेल हे तालुक्याचेही ठिकाण असून त्यामध्ये १७७ गावांचा समावेश आहे. पूर्वी पनवेलच्या विकासाची सुत्रे सिडकोकडे होती. आता सिडकोबरोबरच महानगरपालिका देखील काम पाहात आहे. या शहराचा इतिहास खूप जुना असून मुघल काळातील घटनांमध्ये या गावाचा उल्लेख आढळतो. एकेकाळी तांदळाची मोठी बाजारपेठ म्हणून पनवेलचा नावलौकीक होता.

पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये औद्योगिकीकरण देखील मोठ्या प्रमाणावर झाले आहे. त्यामध्ये तळोजा एमआयडीसीचा समावेश होता. या शहराला लागूनच पाताळगंगा औद्योगिक वसाहतही आहे. यामध्ये रिलायन्स, लार्सन अँड टर्बो, ओ.एन.जी.सी., आय.पी.सी.एल. आणि हिंदुस्तान ऑर्गेनिक केमिकल्स या कंपन्यांचा समावेश आहे. या कंपन्यामध्ये काम करणारे हजारो कामगार पनवेल महानगरपालिका हद्दीमध्येच राहतात. जागतिक किर्तीचे जे.एन.पी.टी. हे बंदर देखील पनवेल महानगरपालिका हद्दीलागून उरण येथे आहे.

स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतीकारी स्वातंत्र्ययोद्धा आद्यक्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके यांचे जन्मगाव शिरढोण हे पनवेल पासून हाकेच्या अंतरावर आहे. पनवेल हे रेल्वेचे जंक्शन स्टेशन आहे आणि ते कोकणशी जोडले गेले आहे. त्याचप्रमाणे दक्षिण भारतीय रेल्वेही पनवेल मार्गे येतात. यापुढे पनवेल महानगरपालिका आणखी जास्त वेगाने विकसित होणार आहे.

● ● ●

# नगरपालिका/नगरपरिषद

## लोणावळा, तळेगाव दाभाडे, कर्जत, माथेरान, खोपोली, उरण





मावळ लोकसभा मतदारसंघात मावळातील दोन तर कोकणातील म्हणजे रायगड जिल्ह्यातील तीन नगरपरिषदांचा समावेश होतो. यातील काही नगरपरिषदा खूप जुन्या आहेत तर काही अलिकडे वाढत्या नागरिकीकरणामुळे नव्याने निर्माण झाल्या आहेत. तळेगाव दाभाडे ही नगरपरिषद फार जुनी आहे. ती 'ब' वर्गात मोडणारी नगरपरिषद असून या परिषदेचा कारभार वाढत्या लोकसंख्येमुळे वाढत चालला आहे. या भागातील औद्योगिक वाढ लक्षात घेता तळेगाव दाभाडे ही पुणे जिल्ह्यातील एक मोठी नगरपरिषद बनली असून ती लवकरच 'अ' वर्गाकडे वाटचाल करीत आहे. मावळातील दुसरी एक मोठी नगरपरिषद 'ब' वर्गात असून ती लोणावळा ही आहे. लोणावळा हे शहर थंड हवेचे ठिकाण (हिल स्टेशन) म्हणून प्रसिद्ध आहे. या शहराची स्थापना सन १८११ साली झाली असली तरी लोणावळा प्रसिद्धीच्या झोतात आले ते सन १९२० नंतरच. येथील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून शहराचा विस्तार झपाट्याने होत आहे. लोणावळा नगरपरिषदेत सद्या २६ सदस्य असून तळेगाव दाभाडे नगरपरिषदेमध्येही तितकेच

सदस्य आहेत.

रायगड जिल्ह्यातील कर्जत, खोपोली आणि उरण या नगरपरिषदा असून ही सारे शहरे मुंबईला लागून असल्याने ती मुंबईची उपनगरेच समजली जातात. जरी ही मुंबईची उपनगरे समजली जात असली तरी ती मावळ लोकसभा मतदारसंघात येतात.

कर्जत तालुक्यातील माथेरान नगर परिषद सर्वात कमी लोकसंख्या असलेली नगर परिषद आहे. माथेरान नगरपालिकेचे एकूण भौगोलिक क्षेत्र ७ कि.मी. आहे. शहराची लोकसंख्या घनता प्रति किलोमीटर २,६०७ व्यक्ती आहे. शहरात १७ वार्ड आहेत, त्यापैकी माथेरान वार्ड नं. २ मध्ये सर्वाधिक लोकसंख्येचा वार्ड असून ४८३ लोकसंख्या आहे आणि वार्ड नं.६ मध्ये सर्वात कमी लोकसंख्येचा वार्ड असून १०६ लोकसंख्या आहे.

शहराच्या आत असलेले माथेरान हे सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन आहे. कर्जत हे उपजिल्हा मुख्यालय आहे आणि ते शहरापासून १९ किलोमीटर अंतरावर आहे. शहराच्या जिल्हा मुख्यालयापासून अलिबाग ९० किमी दूर आहे. बृहन्मुंबई हे शहराचे मुख्य मुख्यालय आहे आणि ते येथून १०० किमी लांब अंतरावर आहे.

● ● ●

# नगरपंचायत

## वडगाव , खालापूर



मावळ तालुक्यात तळेगाव व लोणावळा नगर परिषद आहे. तालुक्याचे मुख्यालय असलेल्या वडगाव-कातवी ग्रुप ग्रामपंचायतीची आता नगरपंचायत जाहीर झाली आहे. नगरपंचायत जाहीर झाल्यामुळे पुणे-मुंबई या दोन महानगरांच्या मध्यवर्ती असलेल्या वडगाव शहराच्या विकासाला वेग मिळणार आहे.

तसेच रायगड जिल्ह्यातील खालापूर हि सुद्धा एक नगरपंचायत आहे. मेक इन इंडिया अंतर्गत खालापूर शहराचा विकास आराखडाही तयार करण्यात आलेला आहे.

● ● ●

# मावळ लोकसभा मतदारसंघातील औद्योगिक वसाहती

# पिंपरी-चिंचवड एम.आय.डी.सी.




पिंपरी चिंचवड औद्योगिक वसाहत ही देशातील मोठ्या वसाहतींपैकी एक असून अनेक नामांकित राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्या या ठिकाणी कार्यरत असून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो लोक रोजगारासाठी या भागात स्थिरावले आहेत. एवढेच नव्हे तर देशभरातूनही अनेक कौशल्य प्राप्त लोक या ठिकाणी नोकरी निमित्ताने आलेले आहेत. पिंपरी-चिंचवडची औद्योगिक वसाहत ही या भागाच्या भरभराटीस कारणीभूत ठरली आहे.

या पिंपरी चिंचवड औद्योगिक विकासाची मुहूर्तमेढ तत्कालिन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते रोवली गेली आहे. या एमआयडीसीचे भाग्यविधाते अण्णासाहेब मगर आणि यशवंतराव चव्हाण हेच आहेत. त्यांच्या तळमळीच्या प्रयत्नामुळे ही एमआयडीसी येथे आली. सन १९५४ मध्ये देशातील पहिल्या हिंदुस्तान अँटीबायोटिक्स या कंपनीचे भूमिपूजन त्यांनी करून या उद्योगनगरीचा श्रीगणेशा केला. त्यानंतर या नगरीने मागे वळून पाहिलेच नाही. अल्पावधीच हा औद्योगिक परिसर ॲटोमोबाईल कंपन्यांचे माहेरघर बनला. प्रतिष्ठीत अशा प्रिमियर, महिंद्रा, बजाज, टाटा मोटर्स, कायनेटिक, फोर्स डायमलर क्रिस्लर, थरमॅक्स या कंपन्यांनी ॲटोमोबाईलच्या क्षेत्रात पिंपरी चिंचवडचे नाव जगभरात पोहोचवले. त्यापाठोपाठ अन्य क्षेत्रातल्या मोठ्या कंपन्या या भागात आल्या. त्यामध्ये स्वीडिश बेअरींग कंपनी अर्थात एसकेएफ,

जर्मनीची के.एस.बी. पंप्स्, अल्फा लावल, सँडविक, जिया इकोफ्लेक्स, थायसनकप आणि फोर्बस्-मार्शल या कंपन्यांनी देखील या परिसराच्या औद्योगिक विकासात भर घातली आहे. या कंपन्यांमध्ये सुमारे २ लाखाहून अधिक लोकांना रोजगार मिळाला असून त्यांचे जीवनमान उंचावले आहे.

अलिकडे या परिसराने ऑटोमोबाईल उद्योगाबरोबरच आधुनिकतेची कास धरून आयटी (इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) क्षेत्रातही उंच भरारी घेतली आहे. देशातील सर्वात मोठा आयटी पार्कसाठी बंगळुरू नंतर पुण्याचाच क्रमांक लागतो. त्यातल्या त्यात मावळ लोकसभा मतदारसंघाशेजारी असणाऱ्या हिंजवडी परिसराचा मोठा सहभाग आहे. पिंपरी चिंचवड औद्योगिक परिसरातही आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या आयटी कंपन्या आल्या आहेत. त्यामध्ये बेंबलकर मोबिटेक, जी.इ. इंडिया, लॉजिक बिट्स, डिलीझंट सिस्टिम, आरके इन्फासॉफ्ट, विन्झनेट, सायनर्जो या कंपन्यांचा समावेश आहे. याशिवाय एक्साइड बॅटरी, शिर्के इंजिनियरींग, हेवी इंजिनियरींग, मिल्कॉन या मोठ्या कंपन्याही या एमआयडीसी परिसरात आहेत. त्याचबरोबर सेंच्यूरी एन्का, फिनोलेक्स, ग्रीव्हज कॉटन, ॲटलस कॅप्को, ॲमफोर्ज, गरवारे, बीव्हीजी इंडिया, सीपी पॉलियुरेधान्स, हिंदुस्थान प्रेसिंग, इंडस्ट्रियल टूल्स, टीएएल मॅन्युफॅक्चरिंग, इंडियन कार्ड क्लोरिंग, अँफेनॉलू या प्रतिष्ठीत कंपन्याही पिंपरी चिंचवड या भागात असून त्यामुळे या परिसराचे नाव देशभरात पोहचले आहे.

या परिसरात ऑटोमोबाईल, रासायनिक, आयटी, मॅन्यूफॅक्चरींग आणि इंडस्ट्रियल कंपन्यांचा समावेश आहे. सुमारे २५०० हून अधिक कंपन्या या भागात कार्यरत असून २ लाखाहून अधिक लोकांना यामध्ये रोजगार मिळाला आहे. परिणामत: लोकवस्तीही झपाट्याने वाढत आहे.

# तळेगाव दाभाडे एम.आय.डी.सी.



तळेगाव दाभाडे हे मावळमधील सर्वात वेगाने विकसित होणारे शहर ठरत असून, याला मुलभूत कारण आहे ते येथील औद्योगिकीकरण. अतिशय झपाट्याने येथील औद्योगिक विकास घडत आहे. पुरेश्या पाण्याची उपलब्धता आणि दळणवळणासाठी महामार्ग आणि रेल्वेमार्ग अगदी जवळच असल्यामुळे उद्योगाची वाढ झपाट्याने होत आहे. त्यामध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्या, कृषी संबंधी कंपन्या, फ्लोरी कल्चर आणि कुकुटपालन या उद्योगांनी तळेगाव दाभाडे परिसर पुर्णपणे व्यापला आहे. मुंबईपासून १३५ कि.मी. तर पुणे शहरापासून ३५ कि.मी. अंतरावर हे ठिकाण असल्यामुळे अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्याही या भागाकडे आकर्षित झाल्या आहेत. त्यामुळे तळेगाव दाभाडे आता एक इंडस्ट्रियल हब बनले आहे. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे तळेगाव दाभाडेची लोकसंख्याही झपाट्याने वाढत असून शहरीकरणही वेग घेत आहे. त्यात हा भाग बऱ्याचशा प्रमाणात रेसिडेन्सियल झोन असल्यामुळे मोठ मोठ्या नामांकित बिल्डरांनी मोठ मोठे गृहप्रकल्प या ठिकाणी उभे केले आहेत.

या भागात आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या कंपन्या सुरू झाल्या असून त्यामुळे तळेगाव दाभाडेचे नाव जागतिक पातळीवर पोहचले आहे. जनरल मोटर्स, जेसीबी, महिंद्रा, फिनोलेक्स अशा मोठ्या कंपन्यांनी तळेगावचे नाव जगभर पोहचवले आहे. तळेगाव दाभाडे परिसर ऑटोमोबाईल हब म्हणून विकसित होत

आहे. याशिवाय इतरही छोट्या मोठ्या कंपन्या कार्यरत असून यामुळे सुमारे २५ हजाराहून अधिक लोकांना रोजगार मिळाला आहे. याशिवाय तळेगाव दाभाडे परिसराचे वातावरण फुलांच्या शेतीसाठी पोषक असल्यामुळे तळेगाव आणि आसपासच्या परिसरात गुलाबाची शेती नेटशेडमध्ये मोठ्या प्रमाणावर केली जात आहे. काही ठिकाणचे गुलाब परदेशात देखील निर्यात होत आहेत. त्याचबरोबर पोल्ट्री व्यवसायानेही मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध केला आहे. या भागातील पोल्ट्री व्यवसाय हा संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेत आहे.

तळेगाव दाभाडे परिसर आणि आसपासचे उर्से, टाकवे या भागातही एमआयडीसीचा विस्तार झाला असून येथे महिंद्रा स्टील, अनुराग इंडूरन्स, केएसपीजी, कायनेटिक, व्हेरॅक, इंडूराचे, सुप्रिम इंडलीग, जीपीके, मीटर व्हिल्स अशा अनेक कंपन्या ग्रामीण भागाचा देखील विकास करीत आहेत. या कंपन्यांमुळे आंदर मावळातील मागास भागही विकसित होत आहे. दरवर्षी या भागात अनेक नवीन कंपन्या येत आहेत.

• • •

# पाताळगंगा एम.आय.डी.सी.



पाताळगंगा औद्योगिक वसाहत ही महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या गणल्या जाणाऱ्या रासायनिक एम.आय.डी.सी.च्या वसाहतीपैकी एक आहे. रायगड जिल्ह्यातील कर्जत, पनवेल आणि खालापूर या तिन्ही तालुक्याच्या सीमा भागात ही औद्योगिक वसाहत वसली आहे. मुंबई-पुणे हायवेपासून अवघ्या ७ कि.मी. अंतरावर मोहपाडा या गावानजिक ही वसाहत आहे. ही औद्योगिक वसाहत पाताळगंगा नदीच्या तिरावर वसलेली असल्यामुळे तिला पाताळगंगा एमआयडीसी म्हणतात.

या औद्योगिक वसाहतीमध्ये सुमारे २५ मोठ मोठ्या रासायनिक कंपन्या असून त्यामध्ये नजिकच्या पनवेल, कर्जत, खालापूर आणि पेण या तालुक्यातील शेकडो तरूणांना रोजगार मिळाला आहे. या वसाहतीत नामवंत सिप्ला फार्मासिटिकल्स, हिंदुस्थान ऑरगॅनिक, आदित्य बिर्ला, जयसिंध डायस्टक, बिग कोला, बालाजी फार्मालिन, टिटान अँटोनी, कॅस्ट्रोल इंडिया, आयओजीएस, सत्यम फार्मा, इंडको रेमिडिज, इंडिया ॲल्युमिनीयम, परवीन इंडस्ट्रिज अशा नामवंत कंपन्यांचा समावेश आहे. या कंपन्यांमुळे रायगड जिल्ह्यातील पनवेल, कर्जत, खालापूर आणि पेण तालुक्यातील लोकांचे रोजगारामुळे जीवनमान उंचावले आहे.

जयसिंध या कंपनीतून टेक्सटाइल प्रिंटींगसाठी लागणारी सामग्री आणि

डिजीटल प्रिंटींगची शाई निर्माण केली जाते आणि ती देशभरात पुरविली जाते. या वसाहतीत रासायनिक आणि औषधे निर्माण करणाऱ्या कंपन्या जास्त आहेत. याशिवाय औद्योगिक कंपन्यांसाठी वापरले जाणारे ऑक्सीजन, नायट्रोजन सारखे गॅस निर्माण करणारी आयनॉक्स एअर ही कंपनी आहे. पाताळगंगा औद्योगिक वसाहतीतूनच कोकण रेल्वे जाते. रसायनी/आपटा हे छोटेसे रेल्वे स्टेशन आहेत. याशिवाय कर्जत व पनवेल रेल्वेस्टेशनही या एमआयडीसी पासून फार दूर नाहीत. सांताक्रुज विमानतळही अवघ्या ७५ कि.मी. अंतरावर आहे. त्याचप्रमाणे मुंबई–पुणे महामार्गावर असलेले व आधुनिक सुविधा असलेले धिरूभाई अंबानी हॉस्पिटल या औद्योगिक वसाहतीला लागूनच आहे. त्यामुळे कामगारांना आणि अपघातग्रस्तांना त्याची चांगली मदत होते.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने अर्थात एमआयडीसीने राज्यभरात ज्या मोठमोठ्या केवळ १३ रासायनिक कंपन्यांच्या वसाहती बसवल्या आहेत. त्यामधील अतिशय महत्वाची अशी ही पाताळगंगा औद्योगिक वसाहत आहे. विशेष म्हणजे हा औद्योगिक परिसर चारही बाजूंनी डोंगरांनी वेढलेला भूभाग आहे. मुंबई–पुणे महामार्ग आणि मुंबई–गोवा महामार्ग हे दोन्ही महामार्ग या वसाहतीशी जोडले गेले आहेत. कर्जत तालुक्यात असलेल्या आणि माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या मोरबे धरणाचे पाणी या औद्योगिक वसाहतीला पुरविण्यात आले आहे. याशिवाय पाताळगंगा नदीचे पाणीही वापरण्यात आले आहे.

या औद्योगिक वसाहतीत असणाऱ्या कंपनीची एक असोसिएशन असून त्यांनी या भागासाठी सामाजिक जबाबदारी म्हणून शाळा, कॉलेज, इंजिनियरींग कॉलेज, दूषित पाण्यावर प्रक्रीया करणारा प्रकल्प अशा अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

• • •

# तळोजा एम.आय.डी.सी.



तळोजा हे रायगड जिल्ह्यातील एक गाव आहे. जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर पनवेलच्या ९ किमी उत्तरेस व खारघरच्या ४ किमी पूर्वेस स्थित असलेल्या तळोजा येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामडळाचे मोठे संकूल आहे. सिडको ह्या सरकारी संस्थेने तळोजामधील पायाभूत सुविधा बांधण्याची जबाबदारी घेतली असून सध्या तळोजा नवी मुंबई भागातील वेगाने प्रगती करणाऱ्या निवासी क्षेत्रांपैकी एक आहे. तळोजा एमआयडीसी वेगाने वाढणारी आणि प्रगतीशील औद्योगिक क्षेत्र असून सीएसटीपासून फक्त ५० कि.मी. आणि पनवेलच्या ८ किमी अंतरावर आहे.

तळोजा मध्यवर्ती कारागृह हे महाराष्ट्रामधील एक मोठे कारागृह येथेच आहे. सध्या तळोजा भागातील तळोजा-पंचानंद व नावडे रोड ही दोन रेल्वे स्थानके दिवा-पनवेल ह्या मार्गावर स्थित आहेत. तसेच वाहतूकीसाठी एन.एम.एम.टी. ह्या बससेवेचे काही मार्ग तळोजामध्ये उपलब्ध आहेत. नवी मुंबई मेट्रो ह्या जलद परिवहन प्रणालीचे काम चालू असून भविष्यात मेट्रोद्वारे तळोजा ते सी.बी.डी. बेलापूर व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत प्रवास सुलभ होईल.

# मावळ लोकसभा मतदारसंघातील धरणे

# मोरबे धरण




मोरबे धरण हे रायगड जिल्ह्यातील एक महत्वाचे धरण आहे. हे धरण माथेरानच्या पश्चिमेकडील बाजूस पायथ्याशी आणि जुन्या मुंबई-पुणे महामार्गालगत चौक या गावाजवळ धावरी या छोट्या नदीवर बांधण्यात आले आहे. या धरणाच्या पाण्याचा पसारा खूप मोठा आहे. माथेरानच्या परिसरात खूप मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्याने या धरणाला पुरेसा पाणीसाठी उपलब्ध असतो.

मोरबे धरणाचे पाणी प्राधान्याने नवी मुंबई या शहराला पुरविले जाते. महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा आणि जलनि:सारण खात्याच्यावतीने या धरणाची निर्मिती करण्यात आली आहे. सन १९९९ पासून या धरणाचे पाणी पिण्यासाठी वापरण्यास सुरूवात झाली. या धरणामुळे ११ गावातील २८९७ लोक विस्थापित झाले होते. आता शासनाने हे धरण नवी मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात दिले आहे.

मोरबे धरण हे मातीचे धरण असून ते ग्रॅव्हिटी तत्वावर उभारण्यात आले आहे. या धरणाची उंची ५९.१ मीटर अर्थात १९४ फूट इतकी आहे. या धरणाची लांबी ३४२० मीटर असून त्याची क्षमता ४५७९.६९ घनमीटर इतकी आहे. या धरणाचा पसारा म्हणजे आकारमान ४३३६ क्युसिक मीटर इतके आहे. हे धरण सध्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात असून त्याचा देखभालीचा खर्चही तेच पाहतात.

• • •

# आंद्रा धरण



पुणे जिल्ह्यातील मावळ भागातील आंद्रा नदीवर हे धरण बांधण्यात आले. तळेगाव दाभाडे एमआयडीसी आणि नगरपरिषदेला तसेच आसपासच्या गावांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी या धरणाची निर्मिती करण्यात आली आहे. या धरणाची उंची ४०.४५ मीटर म्हणजे १३२.७ फूट इतकी असून त्याची लांबी ३३० मीटर (१०८० फूट) इतकी आहे. या धरणाचे आकारमान २०७.८६ घन कि.मी. अर्थात ९४९.८७ क्युसिक मीटर इतके मोठे आहे. या धरणाची साठवण क्षमता १९९८७ क्युसिक मीटर इतकी आहे.

या धरणाचे पाणी सन २००३ सालापासून वापरण्यास सुरूवात झाली. या धरणातील पाण्याचा सिंचनासाठी देखील वापर केला जातो. हे धरण मावळासाठी एक वरदान ठरले आहे. या धरणाकडे जाण्यासाठी जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील कान्हेफाटा येथून टाकवे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरून जावे लागते. पुढे टाकवेहून पुर्वेकडे जाणाऱ्या रस्त्यावरून जावे लागते. पावसाळ्यात तुडूंब भरलेले धरण आणि आजूबाजूच्या डोंगरावरील धबधबे पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी उसळते.

# भूशी धरण



पुणे जिल्ह्यातील लोणावळ्यात असलेले पर्यटकांचे अत्यंत आवडते ठिकाण म्हणजे भूशी डॅम होय. भूशी हे धरण इंद्रायणी नदीवर अगदी सुरूवातीच्या टप्प्यावर बांधण्यात आले आहे. लोणावळ्यात जेव्हा इंग्रजांनी रेल्वे सुरू केली तेव्हा वाफेवर चालणाऱ्या इंजिनमध्ये पाणी लागत होते. त्यासाठी सन १८६० मध्ये या धरणाची निर्मिती करण्यात आली. अलिकडे भारतीय रेल्वेने ते धरण ताब्यात घेतले असून आता त्याचा उपयोग स्टिम इंजिनसाठी होत नाही. परंतु ते एक उत्तम पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करण्याचा निर्णय रेल्वेने घेतला आहे. या धरणातून लोणावळा खंडाळा शहरांना आणि रेल्वेस्थानकांना पाणी पुरवठा केला जातो.

सन २०११ मध्ये लोणावळा येथे असलेल्या इंडियन नेव्हल स्टेशन (आयएनएस) शिवाजी ने ते धरण ताब्यात घेऊन तेथे प्रशिक्षण देण्याचा विचार केला होता. परंतू जर हा तलाव आयएनएसच्या ताब्यात गेला तर लोकांना येथे येण्यास बंदी होईल. असा पोलिसांनी इशारा दिल्याने ते थांबले. अलिकडे सन २०१२ मध्ये राज्य रस्ते विकास मंडळाने पर्यटकांच्या सोईसाठी मुंबई-पुणे हायवेपासून ते भूशी धरणाच्या पायथ्यापर्यंत एक बोगदा तयार करण्याचा निर्णय घेतला आहे.

भूशी धरण हे आता पर्यटकांचे केद्र बनले असून दर शनिवारी आणि रविवारी मुंबई-पुण्याचे असंख्य पर्यटक या ठिकाणी येत असतात. डोंगर, जंगल

आणि पाणी असा निसर्गाचा त्रिवेणी संगम येथे पहायला मिळत असल्यामुळे दिवसेंदिवस पर्यटकांची गर्दी वाढत आहे. विशेष करून पावसाळ्यात पर्यटकांची मोठी गर्दी असते. जुन्या मुंबई–पुणे महामार्गावरून लोणावळा शहरातील कुमार रिसोर्टपासून दक्षिणेकडे जो रस्ता जातो तो भूशी धरणाकडे जातो. या धरणाजवळ भारतीय नौदलाचे शिवाजी हे प्रशिक्षण केंद्र आहे.

● ● ●



पिंपरी चिंचवड महानगरपालिका




पनवेल महानगरपालिका




शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको)



प्रस्तावित – नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कोपर–पनवेल



संत तुकाराम महाराज गाथा मंदिर, देहू



देहू येथे संतश्रेष्ठ जगतगुरू श्री तुकाराम महाराज बीज सोहळा प्रसंगी



मोरया गोसावी मंदिर, चिंचवडगाव



मोरया गोसावी यांचे दर्शन घेताना...



बिर्ला गणपती, शिरगाव




गगनगिरी महाराज समाधी, खोपोली



वरद विनायक – महड



वरद विनायकाचे दर्शन घेताना



एकवीरा देवी कार्ले



एकवीरा देवीचे दर्शन घेताना



झुलेलाल मंदीर, पिंपरी



साईबाबा मंदिर, शिरगाव

# पवना धरण



पुणे जिल्ह्यातील मावळ भागात उगम पावणाऱ्या नदीवर काळे या गावाजवळ पवना धरण बांधण्यात आले. अतिशय निसर्गरम्य परिसरात डोंगरांनी वेढलेले आणि हिरव्यागार वनराईने नटलेले हे ठिकाण असल्यामुळे पवना धरण हे लोकांचे आवडते पर्यटन स्थळ बनले आहे. या धरणाकडे जाण्यासाठी तीन मार्ग आहेत. थेट पुण्यापासून येण्यासाठी पिरंगुट–पौंड–कोळवण मार्गे धरणापर्यंत पोहचता येते. दुसरा मार्ग जुन्या पुणे–मुंबई महामार्गावरून कामशेतपर्यंत येऊन दक्षिणेकडे वळल्यास बेडसे मार्गे धरणापर्यंत जाता येते. मुंबईकडून येणाऱ्यांनी लोणावळ्यातून भांगरवाडी मार्गे कुसगाव–ओंढेगाव–दुधीवरे–खिंडीतून प्रतिपंढरपूर पासून पुढे धरणाजवळ पोहोचता येते. या धरणाची निर्मिती सन १९७२ साली करण्यात आली आहे. या धरणाची उंची ४२ मीटर व रूंदी १३२५ मीटर आहे. हे धरण ११३ चौरस कि.मी.वर पसरलेले आहे. या धरणाची पाणी साठवण क्षमता १०.७६ टीएमसी इतकी आहे. या धरणाला ६ दरवाजे असून या धरणाचे पाणी हे नव्याने विकसित झालेल्या पिंपरी–चिंचवड शहराला पाणी पुरवठा करते. या धरणाच्या परिसरातच लोहगड, तुंग, तिकोणा आणि विसापूर हे किल्ले असल्याने येथे पर्यटकांची नेहमीच गर्दी असते. या ठिकाणी बोटींगची देखील सोय आहे. कायमची पाण्याची व्यवस्था झाल्याने या भागात फार्महाऊसचे प्रमाण वाढले आहे.

सन २०१५ सालापासून ते आजतागायत मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या प्रयत्नातून या धरणातून सुमारे ९७ मेट्रीक टन एवढा गाळ काढल्यामुळे पाण्याच्या साठवण क्षमतेत १ टीएमसी एवढी वाढ झाली असून धरणातून काढलेल्या गाळाचा शेतकऱ्यांनाही उपयोग झाला आहे.

● ● ●

# जाधववाडी धरण



तळेगाव दाभाडे येथून जवळच असलेल्या भंडाऱ्याचा डोंगराला लागूनच जाधववाडी हे छोटेखानी धरण आहे. हे धरण सुधा या नदीवर बांधलेले आहे. विशेष म्हणजे सुधा नदीच्या उगमाजवळच हे धरण बांधले आहे. धरणाच्या खाली ही सुधा नदी जांबोडे-सुदवाडी-सदुंबरे-येलवाडी मार्गे वाहत जाऊन देहू गाव येथे इंद्रायणी नदीस मिळते. नवलाख उंब्रे येथे या नदीला दुसरी एक छोटी बुधा नावाची नदी मिळते. या सुधा आणि बुधा नदीच्या किनाऱ्याजवळ बाराव्या शतकात बांधलेले राममंदिर आहे. सुधा नदीचे वैशिष्ट्ये असे आहे की या नदीला १२ महिने पाणी असते. त्यामुळे जाधववाडी धरणातही कायम पाणीसाठी असतो.

# वडीवळे धरण



पुणे जिल्ह्यातील नाणे मावळात असणारे वडीवळे हे धरण कुंडलिका नदीवर सन १९७८ साली बांधण्यात आले आहे. या धरणावर जाण्यासाठी मुंबई–पुणे महामार्गावरील कामशेत येथून जाता येते. या धरणाची पाणी साठवण क्षमता ४०.८७ दशलक्ष घनमीटर इतकी आहे. या धरणामुळे नाणे मावळ परिसरातील शेतकऱ्यांचे जीवन उज्वल झाले. या धरणातील पाण्यामुळे या क्षेत्रातील सुमारे ६००० हेक्टर जमीन ओलिताखाली आली आहे. तसेच आजूबाजूच्या आठ ते दहा गावांना पिण्याच्या पाण्याची देखील सोय झाली आहे. आजूबाजूच्या गावांसाठी पाणीपुरवठा करण्यासाठी कालव्यांचा उपयोग केला जातो. या धरणामुळे नाणे मावळच्या सौंदर्यात देखील चांगलीच भर पडली आहे.

• • •

# तुंगार्ली धरण



लोणावळा-खंडाळा या हिल स्टेशनपासून उत्तरेकडील बाजूस काही अंतरावर तुंगार्ली धरण हे पर्यटकांचे खास आकर्षण आहे. अतिशय शांत आणि निसर्गरम्य वातावरण असलेला हा भाग असल्यामुळे येथे पर्यटकांची सतत गर्दी वाढत जाते. तुंगार्ली धरणाची निर्मिती इंग्रज राजवटीतच सन १९३० साली झाली आहे. या धरणाचे पाणी शेतीसाठी आणि पिण्यासाठी वापरले जाते. या धरणातील पाणी आणि त्या भोवतालची हिरवळ पर्यटकांना आकर्षित करते. येथून राजमाची किल्ला आणि लोणावळा-खंडाळा ही पर्यटन ठिकाणे एका दृष्टिक्षेपात दिसतात.

# पळसदरी धरण



रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात खोपोली आणि कर्जत शहरादरम्यान हे छोटेखानी धरण आहे. या धरणाला लागूनच पळसदरी रेल्वे स्टेशन आहे. मुंबईहून थेट उपनगरीय रेल्वेने (लोकल) येथे उतरता येते. एका बाजूला बोरघाटाचा डोंगर आणि दुसऱ्या बाजूला पळसदरी गावचा डोंगर, अशा दरीत हे धरण बांधले गेले आहे. कर्जत शहरापासून ५ कि.मी. अंतरावर हे धरण आहे. पळसदरी धरणाची निर्मिती भारतीय रेल्वेने सन १९२० च्या दरम्यान केली आहे. मुंबई-पुणे रेल्वे मार्गावरील कर्जत हे महत्वाचे स्टेशन आहे. या स्टेशनवर प्रत्येक रेल्वे थांबते. पूर्वी वाफेवर चालणारी रेल्वे इंजिन होती. त्यासाठी इंजिनमध्ये पाणी भरण्यासाठी कर्जतला थांबा होता. वाफेच्या इंजिनमध्ये पाणीभरण्यासाठी पळसदरी या धरणाची बांधणी करण्यात आली आहे. अलिकडे या धरणातून आसपासच्या गावांना पिण्यासाठी पाणी पुरवले जाते. तसेच हे धरण आता पर्यटकांचे आवडते ठिकाण म्हणून विकसित होत आहे. या धरणाच्या आसपास निसर्गरम्य वातावरण असल्याने फार्महाऊस वाढत आहेत.

• • •

# ठोकळवाडी धरण




मावळातील जुन्या धरणांपैकी एक ठोकळवाडी हे धरण आहे. आंदर मावळमध्ये उगम पावणाऱ्या आंद्रा नदीवर सन १९२० साली बांधण्यात आलेले हे मातीचे धरण आहे. या धरणाचे पाणी सह्याद्रीच्या पश्चिम घाटातील उतारावरून घाटाच्या पायथ्याशी असलेल्या भिवपुरी येथील वीज निर्मिती केंद्रात नेले जाते. या धरणाची जबाबदारी वीज निर्मिती करणाऱ्या टाटा पॉवर या कंपनीकडे आहे. त्यामुळे याला टाटाचे धरण असेही म्हणतात. या धरणामुळे आंदर मावळात सर्वदूर पाणीच पाणी झाले आहे. डोंगरदऱ्या आणि त्यामध्ये साचलेले धरणाचे पाणी यामुळे हा परिसर अतिशय रमणीय दिसतो. या धरणाच्या पाण्यामुळे जमिनीचे अनेक सुळके पाण्यात गेल्यामुळे बेटे तयार झाली आहेत. शेती आणि पर्यटनाला यामुळे चांगली चालना मिळाली आहे. सन १९२० साली इंग्रज राजवट असताना या मातीच्या धरणाची निर्मिती झाली. या धरणाची उंची ५९.४४ मीटर (१९५ फूट) इतकी असून लांबी ७४१ मीटर (२४३१ फूट) इतकी आहे. या धरणाचे आकारमान २१२ घन कि.मी. इतकी आहे. या धरणाची साठवण क्षमता ०.३६३ घन कि.मी. इतकी आहे. या धरणाच्या पाण्याचा उपयोग प्राधान्याने वीज निर्मितीसाठी होत असला तरी शेतीसाठी देखील शेतकरी त्याचा उपयोग करून घेत असतात.

पावसाळ्यात या परिसरातील डोंगरावरून कोसळणारे धबधबे पाहण्याची काय औरच मजा असते. ठोकळवाडी धरणाजवळ असलेला धबधबा, पुणे-मुबईच्या पर्यटकांचे खास आकर्षण बनला आहे. दर शनिवारी आणि रविवारी पावसाळ्यातील पिकनिकसाठी हा नवा पॉईंट बनला आहे.

• • •

# वळवण धरण



मुंबई–पुणे एक्सप्रेस वे वरून पुण्याकडे जाताना कुसगाव नाक्यापूर्वी रस्त्याच्या डावीकडे डोंगरात एक धरणाची भिंत दिसते. ती वळवण धरणाची आहे. लोणावळा शहरापासून साधारणपणे ३ ते ४ कि.मी. अंतरावर हे धरण आहे. हे धरण टाटांनी वीज निर्मिती करण्याच्या उद्देशाने बांधले आहे. लोणावळ्याच्या ईशान्य भागातील सह्याद्रीच्या रांगांमध्ये भरपूर पाऊस पडतो. हे पाणी अडवून त्यापासून वीज निर्मिती केली जाते. या धरणाचे पाणी कालव्याद्वारे लोणावळा–खंडाळा येथे नेऊन तेथील डोंगराच्या उतारावरून मोठ्या लोखंडी पाइपाच्या माध्यमातून ते खोपोली येथे नेले जाते आणि त्या ठिकाणी वीज निर्मिती केली जाते. ती वीज मुंबईला पुरविली जाते. तसेच लोणावळा आणि खंडाळा शहरांना पिण्यासाठी पाणीही येथून पुरविले जाते. मातीचे वळवण धरण हे इंद्रायणी नदीवर बांधण्यात आलेले आहे. या धरणाची उंची २६.३६ मीटर (८६.५२८) इतकी आहे. त्याची लांबी १३५६ मीटर इतकी असून १८२००० घनमीटर इतके आकाराचे आहे. या धरणाची साठवण क्षमता ७२,५००,००० घनमीटर इतकी आहे.

वळवणचे धरण डोंगर दऱ्याच्या खोऱ्यांमध्ये असल्यामुळे अतिशय रमणीय असे दृष्य दिसते. विस्तीर्ण पाणीसाठा, आजूबाजूला डोंगर, जंगल, धरणाच्या कडेला सुंदर गार्डन यामुळे हे धरण पाहण्यासाठी हजारो पर्यटक भेट देतात. या धरणाला वळवण तलाव असेही म्हणतात. या ठिकाणची सुंदर बाग पाहण्यासाठी

मुंबई–पुण्याचे पर्यटक विकएंडला येत असतात. फोटोग्राफीचे सुंदर ठिकाण म्हणूनही त्याकडे पाहिले जाते. विशेष करून पावसाळ्यात या भागाची सौंदर्य अगदीच खुलून दिसते. कौटूंबिक सहलीचे ठिकाण म्हणून याकडे पाहिले जाते. येथून जवळ कार्ला लेणी, एकविरा आई, डेल्या अ‍ॅडव्हेंचर्स आणि नारायणी धाम मंदिर ही ठिकाणे २ ते ३ कि.मी.च्या अंतरावर आहेत.

• • •

# मावळ लोकसभा मतदारसंघातील प्रेक्षणीय स्थळे

# लोणावळा-खंडाळा हिल स्टेशन



लोणावळा हे राष्ट्रीय पातळीवरचे सुप्रसिद्ध असे हिल स्टेशन आहे. डोंगरदऱ्या आणि वनराईने नटलेले सौंदर्यवान लोणावळा हे लाखो पर्यटकांचे आवडते पर्यटनस्थळ आहे. पुण्यापासून पश्चिमेकडे ६४ कि.मी. अंतरावर आणि मुंबईहून पुण्याच्या दिशेने ९६ कि.मी. अंतरावर हे ठिकाण वसलेले आहे. सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर असल्यामुळे येथील हवामान थंड आणि आल्हाददायक आहे. पुणे येथून दर तासाला उपनगरीय रेल्वे नेहमी सुरू असते. तर मुंबई-पुणे रेल्वे मार्गावरील हे महत्वाचे रेल्वे स्टेशन असल्यामुळे सर्व सुपरफास्ट गाड्या येथे थांबतात. त्याचप्रमाणे मुंबई-बंगळुरू महामार्गही या लोणावळा शहरातून जातो. त्यामुळे रोडमार्गेही लोणावळ्याला पोहचता येते. अलिकडे मुंबई पवना धरण (लोणावळा) अशी सी प्लेन विमानसेवा सुरू झाली आहे. अशाप्रकारे कोणत्याही मार्गाने लोणावळ्याला पोहचता येते. लोणावळा हे शहर ऐतिहासिक काळापासून प्रसिद्ध आहे. यादव कालिन असलेले हे शहर त्याच्या भौगोलिक कारणामुळे ते प्रत्येक सत्ताधाऱ्याने आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. यादवानंतर ते मुघलांच्या ताब्यात होते. पुढे या भागात असलेले महत्वाचे किल्ले आणि लढवय्ये मावळे यांनी या भागात इतिहास घडविला आहे. परंतू खरे हिल स्टेशन म्हणून मान्यता मिळाली ती इंग्रजांचे मुंबईचे गव्हर्नर एलिफन्स्टन यांच्या काळातच. उन्हाळ्यात मुंबईत जो उकाडा असतो त्यापासून वाचवण्यासाठी

त्यांनी १८७१ मध्ये लोणावळा आणि खंडाळा हिल स्टेशन शोधली. तेव्हापासून ही दोन्ही ठिकाणे हिल स्टेशन म्हणून जगभर प्रसिद्ध आहेत. लोणावळ्यात पर्यटकांना पर्यटन स्थळे म्हणून सुखावणारी अनेक ठिकाणे आहेत. विशेषत: पावसाळ्यात तर अक्षरश: स्वर्ग धर्तीवर उतरत आहे असे वाटते. हिरवीगार वनराई, धो-धो कोसळणारा पाऊस, डोंगरावरून कोसळणारे धबधबे आणि तुडूंब भरलेली धरणे यामुळे येथे नेहमीच पर्यटकांची रिघ लागलेली असते.

लोणावळा शहरापासून ६ कि.मी. अंतरावर राजमाची हा शिवछत्रपतींचा किल्ला असून येथून डोंगरदरीचे नयनरम्य दृश्य पहाता येते. शहरालगतच रायगड पॉईंट असून या ठिकाणी उभे राहून ६५० मीटर खोल दरीत डोकावून पहाणे एक विलक्षण थरार अनुभवणारी घटना असते. दररोज हजारो लोक या ठिकाणी भेट देतात. लोणावळ्यापासून पुण्याच्या दिशेने ५ कि.मी. अंतरावर कार्ला हे गाव असून येथील डोंगरावर असलेली एकविरा देवी असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान आहे. याच ठिकाणी बौद्ध लेणी असून त्याची निर्मिती ख्रिस्तपूर्व दुसऱ्या आणि तिसऱ्या शतकात झाली आहे. लोणावळ्यापासून पुण्याच्या दिशेने एक रेल्वे स्टेशन पुढे गेले की मळवली हे उपनगरीय रेल्वे स्टेशन लागते. येथून जवळच शिवाजी महाराजांचा लष्करी तळ असलेला लोहगड आहे. त्याच्याच बाजूला विसापूर अर्थात संबळगड हा किल्ला आहे. त्याचप्रमाणे शहराच्या दक्षिणेला भूशीडॅम नावाचे धरण असून ते तरूणाईमध्ये अतिशय लोकप्रिय आहे. शनिवारी-रविवारी या ठिकाणी अक्षरश: जत्रेसारखी गर्दी असते. या धरणापासून जवळच आयएनएस शिवाजी हा नाविक दलाचा तळ आहे. अशी अनेक पर्यटकांसाठी महत्वाची आणि प्रेक्षणीय स्थळे असून दोन दिवसाच्या विकएंड ट्रिपमध्ये ती पूर्ण होऊ शकतात. लोणावळ्यात राहण्यासाठी अनेक हॉटेल्स उपलब्ध आहेत. मादाम तुसाच्या धर्तीवर मेणाचे पुतळे असलेले संग्रहालयही लोणावळ्याचे आकर्षण बनले असून त्यात नरेंद्र मोदींपासून ते अण्णा हजारे यांच्या पर्यंत अनेक माननीय व्यक्तींचे मेणाचे पुतळे आहेत. हे एक चांगले प्रेक्षणीय स्थळ बनले आहे. याशिवाय देशभर प्रसिद्ध असलेले मन:शांती केंद्र देखील याच लोणावळा शहरानजीक असून दरवर्षी हजारो लोक याठिकाणी उपचारासाठी आणि मन:शांतीसाठी येत असतात. लोणावळ्याचे दुसरे वैशिष्ट्ये असे की येथील चिक्की सर्वदूर प्रसिद्ध आहे. मुंबई-पुणे रेल्वेचे काम सुरू असताना खंडाळा

घाटातील बोगद्याचे काम मजुरांमार्फत डोंगरभागात केले जात असे. त्यावेळी तिथे खाण्या-पिण्याच्या वस्तू सहजा सहजी मिळत नसत. त्यावेळी मजूरांना जास्त पौष्टिक खाद्य मिळण्यासाठी इंग्रजांनी गुळ आणि शेंगदाण्याचे मिश्रण करून खायला द्यायला सुरूवात केली. त्याचेच पुढे चिक्कीत रूपांतर झाले. आता ती चिक्की लोणावळ्याची ओळख झाली आहे.

लोणावळ्याला जोडूनच खंडाळा हे ठिकाण असून ते अगदी घाटाच्या कड्यात बसलेले आहे. समुद्र सपाटीपासून साधारणपणे ६२५ मीटर उंचीवर असलेले हे थंड हवेचे ठिकाण आहे. सह्याद्रीच्या बाह्यांगावर धो-धो कोसळणारे धबधबे पाहण्यासाठी पुणे-मुंबईचे पर्यटक शनिवारी रविवारी गर्दी करतात. खंडाळा हा घाट असून या घाटातून रेल्वे आणि महामार्ग हे दोन्ही मार्ग वेडीवाकडी वळणे घेत जातात. विशेषत: रेल्वे प्रवास करतांना जेव्हा रेल्वे डोंगर पोखरून केलेल्या बोगद्यातून जाते, तेव्हा अतिशय मजा वाटते. अशा सुमारे २६ बोगद्यातून रेल्वे जाते. हा अनुभव देखील रोमांचकारी असतो. याशिवाय खंडाळ्याच्या कड्यावरून पायथ्याशी असलेल्या खोपोली शहराचे जे विहंगमय दर्शन घडते ते डोळ्यात पारणे फेडते. पावसाळ्यात प्रचंड मोठ्या प्रमाणावर येथे पाऊस पडतो. दाट धुके आणि मुसळधार पाऊस याचा आनंद घेण्यासाठी पर्यटक खंडाळ्याला येतात. खंडाळा घाटातून रस्ता कसा काढावा याचे मार्गदर्शन इंग्रजांना करणारा शिंग्रु धनगर याचे मंदिर देखील घाटाच्या मध्यावर आहे. लोणावळा म्हणजे विकएंड मेजवाणीच ठरते.

• • •

# निसर्गरम्य माथेरान (गिरीस्थान)



निसर्गरम्य माथेरान हे एक राष्ट्रीय पातळीवरचे थंड हवेचे ठिकाण आहे. महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील अर्थात मावळ लोकसभा मतदार संघात येते. मुंबई-पुणे रेल्वे मार्गावर नेरळ हे रेल्वे स्टेशन आहे. तेथे उतरून माथेरानला टॅक्सीने किंवा मिनी ट्रेनने जाता येते. शासनाची बससेवा ही उपलब्ध आहे. दरवर्षी लाखो पर्यटक माथेरानला भेट देतात. पश्चिम महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या रांगात माथेरानचा डोंगर असून समुद्र सपाटी पासून सुमारे २६२५ फुट उंचीवर हे ठिकाण आहे. हे ठिकाण मुंबई आणि पुणे या दोन शहरांपासून जवळजवळ समान आंतरावर आहे. या हिल स्टेशनचे खास वैशिष्ट्ये म्हणजे या ठिकाणी कुठल्याही प्रकारच्या पेट्रोल व डिझेल वाहनांना बंदी आहे. प्रवासी माथेरानच्या प्रवेशद्वारापर्यंतच जाऊ शकतात. त्यापुढचा प्रवास मात्र त्यांना एक तर पायी चालत किंवा घोड्यावरून करावा लागतो. त्यामुळे अतिशय थंड आणि शांत परिसर असलेले हिल स्टेशन असंख्य लोकांचे विक एंड साजरा करण्याचे ठिकाण बनले आहे. राज्य शासनाने हा भाग इको सेंसेटिव्ह झोन म्हणून जाहिर केला आहे.

माथेरान हे एक महत्त्वाचे हिल स्टेशन असून या ठिकाणी पर्यटकांना बघण्यासारखे वेगवेगळे ३८ पॉईंट असून या ठिकाणाहून लोकांना ३६० डिग्रीतून लोकांना आजूबाजूचा परिसर न्याहाळता येतो. पायथ्याशी असलेले नेरळ गावही येथून दिसते. या ठिकाणाहून सकाळचा सूर्योदय आणि संध्याकाळचा सुर्यास्त पाहण्यासाठी खुप गर्दी असते. लुईसा नावाचा जो पॉईट आहे. तेथून प्रबळगड हा

किल्ला अगदी स्पष्ट दिसतो. या इथे बघण्यासारखे पॉइंटस म्हणजे वनट्री पॉईंट, हर्ट पॉईंट, मंकी पॉईंट, पर्क्युपाईन पॉईंट, रामबाग पॉईंट, हनीमून पॉईंट आणि इको पॉईंट असे ३८ पॉईंट आहेत. तसेच कार्लोट लेक, रखरखत्या उन्हाळ्यात या थंड हवेच्या ठिकाणी मुक्काम करण्याचा मोह कुणालाही आवरता येत नाही. त्यासाठी असंख्य हॉटेल्स आणि पारसी बंगले आहेत. ते भाड्याने मिळतात. माथेरानचे रस्ते डांबरीकरण केलेले नाहीत तर तिथे नैसर्गिकरित्या असलेल्या लाल मातीपासून बनवलेले आहेत.

माथेरानचे एक वैशिष्ट्य म्हणजे येथील मिनी ट्रेन. तिला फुलराणी या नावाने सन्मानीत केलेले आहे. माथेरान मिनी ट्रेनचे २ फुट रूंदीचे काम हे सन १९०७ साली झाले. त्यानंतर सन २००० साली सर आदमजी पीरभॉय यांनी २० कीमी लांब व २ फुट रूंद अशी रेल्वे ट्रॅकची निर्मिती केली. सध्या रेल्वेचे ४ ट्रॅक सुरू आहेत. पावसाळ्यात मात्र हि रेल्वे बंद ठेवण्यात येते. मध्यंतरी या ट्रॅकवर ट्रेनचा अपघात झाल्यामुळे हि माथेरानची फुलराणी बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता परंतु मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी संसदेत या विरोधात आवाज उठविला. संसदेत आप्पांनी मुद्दा उपस्थित केला की, रेल्वेचा अपघात झाला म्हणून रेल्वे बंद करणे हा त्यावर उपाय नाही. या प्रश्नावर लोकसभेत रेल्वेमंत्र्यांनी उत्तर दिले की, माथेरान रेल्वे बंद न करता ती चालू करण्यासाठी प्रयत्न करणार. नंतर आप्पांनी संबंधित सर्व अधिकाऱ्यांना दिल्लीला बोलविले. संबंधित अधिकाऱ्यांना केंद्रिय मंत्र्यांना तांत्रिक गोष्टी सांगायला सुरूवात केली की, तेथील रेल्वे रूळ व्यवस्थित नाहीत, तेथे बॅरीगेट्स नाहीत, डोंगरभाग खचतोय, रेल्वे इंजिनाला जून्या टाईपचे हँडब्रेक आहेत एअर ब्रेक नाहीत. हे सर्व ऐकून घेतल्यानंतर रेल्वेमंत्र्यांनी बजेटमध्ये माथेरान रेल्वे साठी रू.१२.५० कोटी रूपये तरतूद केली. नंतर त्या कामाच्या निविदा काढल्या. या रेल्वेला दोन नवीन इंजिने दिली. रेल्वे रूळाचे काम केले आणि आता ती रेल्वे चालू झाली. थोडक्यात रेल्वे विभागाने माथेरान रेल्वे बंद करण्याचा घेतलेला निर्णय त्यांना बदलायला भाग पाडून रेल्वे मंत्री आणि अधिकाऱ्यांकडे योग्य तो पाठपुरावा करून आप्पांनी माथेरान रेल्वे पुन्हा चालू केली.

माथेरान येथे मिनी ट्रेनचा प्रवास आणि घोडसवारी यासाठी खास पर्यटक या हिल स्टेशनला भेट देतात.

# कर्नाळा पक्षी अभयारण्य




कर्नाळा पक्षी अभयारण्य हे मुंबई–गोवा महामार्गावर पनवेलपासून १२ कि.मी. अंतरावर वसलेले आहे. कर्नाळा किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या घनदाट झाडीमध्ये हे अभयारण्य विस्तारले आहे. मुंबईपासून थोड्याच अंतरावर असणाऱ्या अभयारण्यापैकी एक आहे. संजय गांधी नॅशनल पार्क आणि तुंगारेश्वर अभयारण्यानंतर याचा क्रमांक लागतो. कर्नाळा पक्षी अभयारण्य हे आकाराने तसे लहानच आहे. सुमारे १२.५ चौरस कि.मी. इतके क्षेत्रफळ असून यामध्ये सुमारे २५० हून अधिक वेगवेगळ्या प्रकारचे पक्षी अधिवास करत आहेत. बाकीचे पक्षी ऋतुनुसार स्थलांतर करतात. काही परदेशी पक्षी देखील हिवाळ्यात या अभयारण्यात वास्तव्य करण्यासाठी येत असतात.

कर्नाळा पक्षी अभयारण्य हे पक्षी निरिक्षक आणि पर्यटकांसाठी आवडते ठिकाण आहे. दाट झाडी थंडगार हवा आणि पक्ष्यांचा गुंजारव यामुळे येथे येणारा पर्यटक मंत्रमुग्ध होतोच, वेगवेगळया २५० प्रकारचे पक्षी तर येथे आहेतच याशिवाय ११४ जातींची रंगीबेरंगी फुलपाखरे देखील आहेत. जंगल सुरक्षित असल्याकारणाने काही जंगली प्राणीही या ठिकाणी वास्तव्य करीत असतात. एका दिवसाच्या पिकनिकसाठी हे अतिशय रमणिय असे ठिकाण आहे. या ठिकाणी पोहोचण्यासाठी रेल्वेने पनवेल पर्यंत पोहोचता येते. तेथुन दर आर्ध्या तासाला या ठिकाणी जाणाऱ्या गाड्या आहेत. कोकणात अलिबाग, पेण, महाड, रत्नागिरीकडे जाणाऱ्या बसेस याच अभयारण्यातून जातात. याशिवाय कर्जतहून देखील या ठिकाणी जाता येते.

सकाळी सुर्योदयापासून ते संध्याकाळी सुर्यास्तापर्यंत हे पक्षी अभयारण्य पर्यटकांसाठी आणि पक्षी निरिक्षकांसाठी खुले असते. या ठिकाणी वाढणारी पर्यटकांची वाढती संख्या पाहता अनेक हॉटेल्स आणि रिसॉर्टस या ठिकाणी उपलब्ध आहेत. या अभयारण्य अंतर्गत शासनाची दोन विश्रामगृहदेखिल उपलब्ध आहेत.

या ठिकाणी सकाळी आणि संध्याकाळी मोठ्या प्रमाणावर पक्षी निरिक्षकांची गर्दी पहायला मिळते. या अभयारण्यात साधारणपणे वेगवेगळ्या जातीची आणि वेगवेगळ्या रंगाची कबुतरे मोठ्या प्रमाणावर बघायला मिळतात. ही कबुतरे पश्चिम घाटातील वेगवेगळ्या ठिकाणी बघायला मिळतात. आणि ती या अभयारण्यात आश्रयाला येतात. साधारणपणे आठ प्रकारची कबुतरे येथे बघायला मिळतात. याशिवाय विशिष्ट जातीचा किंगफिशर, ससाणा, गरूड, बगळे इ. प्रकारचे पक्षी बघायला मिळतात. अभयारण्याचे जंगल घनदाट असल्यामुळे कधी कधी चित्ता व बिबट्याचे दर्शनदेखील या ठिकाणी घडते. हे पाहण्यासाठी शनिवार, रविवारी पुणे आणि मुंबईहून मोठ्या प्रमाणावर पर्यटक येथे येत असतात.

● ● ●

# निसर्गाचा अविष्कार
# मावळ



पुणे जिल्ह्याच्या पश्चिमेकडील भागामध्ये ज्या सह्याद्रीच्या रांगा पसरलेल्या आहेत. त्यातील खोऱ्यांना मावळ म्हणतात. मावळ हा शिवछत्रपतींच्या इतिहासात वाचायला मिळतो. ही भूमी त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली आहे. शिवरायांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात ज्या ज्या सवंगड्यांनी त्यांना साथ दिली त्यातले काहीजण मावळ भागातील होते. मावळात राहणाऱ्या तरूणांना मावळे म्हटले जायचे. शिवरायांचे सहकारी कान्होजी आंग्रे, तानाजी मालुसरे, नेताजी पालकर, बाजी पासलकर, बाजीप्रभू देशपांडे, मुरारबाजी, हंबिरराव मोहिते इत्यादी मावळे स्वराज्य स्थापनेच्या रणसंग्रामात महाराजां सोबत होते. त्यामुळे मावळ ही ऐतिहासिक भूमी आहे. मावळचे बारा वेगवेगळे विभाग आहेत.

आंदर मावळ, कोरबारसे खोरे मावळ, गुंजन मावळ, नाणे मावळ, पवन मावळ, कयात मावळ, मुठा खोरे मावळ, मुशी खोरे मावळ, रोहिड खोरे मावळ, वळवंड खोरे मावळ आणि हिरडस खोरे मावळ असे बारा मावळ आहेत. पावसाळ्यात मावळात सर्वात जास्त पाऊस पडतो. त्यामुळे बऱ्याचशा छोट्या मोठ्या नद्यांचे उगम मावळात झालेले दिसून येतात. त्या नद्यांच्या खोऱ्यांच्या नावावरून बारा मावळची नावे पडली आहेत. मावळ हा पुणे जिल्ह्यात एक महत्त्वाचा तालुका असून त्याचे मुख्यालय वडगाव (मावळ) येथे आहे.

दरवर्षी पावसाळ्यात भरपूर पाऊस या ठिकाणी पडतो. महाराष्ट्रातील सर्वांत जास्त पाऊस पडण्याचे हे ठिकाण असल्यामुळे हे महाराष्ट्राची चेरापुंजी असे मावळचे वर्णन केले जाते. भरपूर पाऊस पडत असल्यामुळे धरणांची संख्या देखील येथे जास्त आहे.

मावळ तालुक्यात छोटी मोठी पाच ते सहा धरणे आहेत. त्यापैकी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि आसपासच्या परिसरात पाणीपुरवठा करणारे पवना धरण हे पवना नदीवर काळे या गावाजवळ बांधण्यात आले आहे. डोंगरदऱ्यांनी नटलेल्या सह्याद्रीच्या कुशीत असलेले पवना धरण पर्यटकांचे आकर्षण ठरले आहे. याच तालुक्यातील दुसरे एक धरण जे टाटा यांचे धरण म्हणून प्रसिद्ध आहे. टाटांनी हे धरण वीज निर्मितीच्या उद्देशाने आठराव्या शतकात आंदर मावळात बांधले. त्या धरणाने या भागातील लोकांच्या जीवनात समृद्धी तर आलीच या शिवाय आंदर मावळ हे पर्यटकांचे नवे आकर्षण म्हणून विकसित झाले आहे. स्वच्छ मोकळी हवा, भरपूर पाण्याचे धरणांचे साठे, सह्याद्रीच्या डोंगररांगा आणि या डोंगरावरून पावसाळ्यात कोसळणारे धबधबे यामुळे हे लोकप्रिय असे पर्यटन स्थळ तयार झाले. अनेक मान्यवर आणि प्रतिष्ठीत लोकांनी आणि सिने कलाकारांनी या परिसरात फार्म हाऊस बांधले आहेत. वातावरण पोषक असल्यामुळे गुलाबांच्या फुलांची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जात आहे. या ठिकाणी तयार झालेले गुलाब राष्ट्रीय पातळीवरील बाजारपेठांमध्ये जात आहेत.

मावळ तालुका अलिकडे औद्योगिक केंद्र म्हणून देखील विकसित होत असून राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कंपन्यांची या ठिकाणी कारखाने सुरू आहेत. डी.वाय.पाटील आणि सिंहगड सारख्या शैक्षणिक संस्थांनी शैक्षणीक जाळे देखील विणले आहे. सुप्रसिद्ध आणि वैष्णवांचे श्रद्धास्थान असलेली इंद्रायणी नदी याच मावळातून उगम पावून देहू - आळंदी मार्गे पंढरपूरला जाते. तिथे तिला चंद्रभागा असे म्हणतात. मावळ आणि पिंपरी चिंचवडची भाग्यविधाती ठरलेली पवना नदी याच मावळातून उगम पावते. याच नदीवर पवना धरण आहे. या शिवाय आंदर मावळात आंद्रा नदी वाहते. त्यावर देखील धरण आहे. या धरणांनी मावळच्या नैसर्गिक संपत्तीत भर घातली आहे. मावळात भाताचे पीक हे मुख्य पीक आहे. इंद्रायणी या जातीचे भात सुप्रसिद्ध आहे. मावळ तालुक्यात असलेले

लोहगड, विसापूर, तुंग, तिकोणा आणि राजमाची हे किल्ले आणि भाजे कार्ला या लेण्या प्रसिद्ध आहे. लाखो लोक पर्यटनासाठी या ठिकाणी येत असतात. जगप्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण खंडाळा आणि लोणावळा हे मावळ तालुक्यातच आहेत. त्यामुळे मावळ हा तालुका राज्यातच नाही तर देशात आणि विदेशात प्रसिद्ध आहे.

• • •

# मावळचा गुलाब



पूर्वी गुलाब म्हटले की काश्मिरची आठवण यायची. कारण काश्मिरचा गुलाब जगभरात प्रसिद्ध होता. परंतू त्याची जागा आता पुणे जिल्ह्यातील मावळ भागाने घेतली आहे. या परिसरातील वातावरण गुलाबाच्या फुलांसाठी पोषक असून नेटशेडचे नवीन तंत्रज्ञान वापरून गुलाबाची शेती मोठ्या प्रमाणावर घेतली जात आहे. तळेगाव दाभाडे औद्योगिक परिसरात या गुलाबाच्या फुलांच्या उत्पादनासाठी खास झोन उभारण्यात आला असून या ठिकाणी उत्पादीत झालेले गुलाब साता समुद्रापार गेले आहेत. काश्मिरपेक्षाही जास्त मागणी मावळच्या गुलाबाला येऊ लागली आहे. मावळातील तळेगाव दाभाडे, आंदर मावळ आणि पवन मावळ या भागातील सुमारे ६०० एकरहून अधिक जमिनीवर निरनिराळ्या गुलाबाची लागवड करण्यात आली असून दरवर्षी ८० ते १०० कोटी रूपयांची उलाढाल या गुलाबाच्या शेतीतून होत आहे. दरवर्षी केवळ फेब्रुवारी महिन्यात व्हॅलेंटाईन डे च्या निमित्ताने एक ते दिड कोटी गुलाब या भागातून जपान, हॉलंड, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, संयुक्त अरब राष्ट्रे या देशांमध्ये निर्यात होते. याचा हिशोब केला तरी रू. १५ कोटींची उलाढाल अवघ्या फेब्रुवारी महिन्यात होते. तसा गुलाबाचा हंगाम बारमाही सुरू असतो. त्यामुळे नक्कीच या गुलाबाच्या शेतीमुळे मावळातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थीती सुधारण्यास मदत झाली आहे. स्थानिक बाजारपेठांमध्येही मोठी मागणी आहे. त्यामुळे हळूहळू मावळचा गुलाब जगप्रसिद्ध होऊ लागला आहे.

मावळ भागात खास गुलाबाची शेती करण्यासाठी काही कंपन्या ही स्थापन झाल्या असून त्यामध्ये इस्सार, इलिगंड, सोयाक्स, ओरियन एक्सपोर्ट, साई रोजेस, समृद्धी, जय अंबे अशा काही कंपन्यांचा समावेश आहे. पवन आणि आंदर मावळातील काही शेतकऱ्यांनी फूल उत्पादक संघ तयार करून गुलाबाची शेती तयार केली असून परदेशातही गुलाब निर्यात केला आहे. मावळात तयार होणाऱ्या 'टॉप सिक्रेट' या गुलाबाला सर्वात जास्त मागणी आहे. निर्यात होणाऱ्या गुलाबापैकी ७५ टक्के गुलाब या जातीचा असल्याचे दिसून येते.

• • •

# ऐतिहासिक वडगाव (मावळ)



वडगाव (मावळ) हे ऐतिहासिक गाव जुना पुणे-मुंबई महामार्गावर आहे. पुणे शहरापासून ४० कि.मी. अंतरावर हे गाव आहे. मावळ तालुक्याचे मुख्यालय असलेले गाव आहे. या ठिकाणी ग्रामपंचायत असली तरी या गावाची लोकसंख्या १३०० पेक्षाही जास्त आहे. त्यामुळे पुणे जिल्ह्यातील सर्वात मोठ्या ग्रामपंचायती पैकी ही एक ग्रामपंचायत आहे. वडगाव हे ऐतिहासिक ठिकाण आहे हे अनेकांना ठावूक नाही. इंग्रज आणि मराठे यांच्यामध्ये जी लढाई झाली त्यात इंग्रजी फौजेला धूळ चारत मराठा सेनापती महादजी शिंदे आणि तुकोजी होळकर यांनी विजय मिळवला. त्यावेळी युद्धाचे नेतृत्व महादजी शिंदे यांनी केले होते. याबाबतचा थोडक्यात इतिहास असा की नारायणराव पेशवेंचा खून झाल्यावर पेशवेपद आपणास मिळावे अशी त्यांचे काका रणघूनाथराव यांची इच्छा होती. परंतु नाना फडणविसांनी ती पूर्ण होऊ दिली नाही. त्यामुळे रघुनाथराव चिडले आणि त्यांनी इंग्रजांशी हात मिळवणी केली. मुंबईहून इंग्रजांचे ६०० आणि रघुनाथरावांचे ३५०० असे एकूण ४१०० सैन्य पुण्यावर चाल करण्याच्या उद्देशाने कर्जत, लोणावळा मार्गे येऊ लागले. त्यावेळी महादजी शिंदे आणि तुकोजी होळकर आपल्या फौजफाट्यासह मावळातच होते. इंग्रजांची फौज लोणावळयाला येताच मराठे सैन्यांनी त्यांच्याशी गनिमी पद्धीतीने हल्ला करण्यास सुरूवात केली. लोणावळ्याच्या आसपासची खेडी ओस केली. पिके जाळून टाकली आणि पाणवाड्यामध्ये विष टाकले जेणे करूनी इंग्रजी फौजांना अन्न

पाणी मिळू नये. अशा परिस्थीतीमध्ये ही इंग्रजांच्या फौजा पुढे सरकत होत्या. त्यांना प्रथम तळेगाव काबिज करायचे होते. परंतु महादजी शिंदे यांनी या फौजेचा प्रमुख जेम्स स्टुअर्ट याला कार्ला येथेच गाठून ठार केले. त्यामुळे इंग्रजी फौज डळमळली तरीदेखील त्यांनी पुण्याच्या दिशेने आगेकूच थांबवली नाही. मग मात्र महादजी शिंदे आणि त्यांच्या फौजांनी इंग्रजांना अन्न पाणी (रसद) मिळू नये म्हणून यासाठी काटेकोरपणे योजना आखली. इंग्रजी सैन्य सैरभैर झाले अखेर वडगाव मावळ येथे इंग्रज फौज आणि मराठा सैन्य यांच्यात रात्रभर घनघोर लढाई झाली सकाळी सुर्योदयापूर्वीच इंग्रजी सैन्यांनी बेजार होऊन पांढरे निशान फडकावले आणि हार मान्य केली. त्यानंतर महादजी शिंदे आणि नाना फडणवीस यांनी त्यांच्याशी तह करून सहा वर्षात इंग्रजांनी ताब्यात घेतलेला भूभाग परत मिळवला आणि वडगावची लढाई इतिहासात अजरामर झाली. या विजयाचे शिल्पकार सेनापती महादजी शिंदे यांचा पुतळा आजही वडगावात पहायला मिळतो. इतिहासात इंग्रज आणि मराठे यांच्यात तीन लढाया झाल्या. त्यापैकी वडगावची एक लढाई होती. अशा प्रकारे वडगाव हे ऐतिहासिक ठिकाण आहे.

पोटोबा महाराज हे वडगाव गावातील लोकांचे ग्रामदैवत आहे. वडगावपासून जवळच केंद्रीय राखीव पोलीस दलाचे केंद्र आहे. त्याच बरोबर राष्ट्रीय पातळीवरचे फळे आणि फुलांच्या शेतीचे प्रशिक्षण देणारे केंद्र वडगाव जवळच पुणे महामार्गालगत आहे.

• • •

# एन.डी. स्टुडिओ - खालापूर



मुंबई ही महामायानगरी आहे असे म्हटले जाते. येथील चित्रपट सृष्टी ज्याला बॉलिवूड म्हटले जाते ती जगभर प्रसिद्ध आहे. मुंबईत ठराविक फिल्मी स्टुडिओ आहेत. जागेअभावी नवीन स्टुडिओ होणे अशक्य आहे. अशा स्थितीत मुंबईपासून तासाभराच्या अंतरावर मोकळ्या जागेत आणि निसर्गाच्या सनिध्यात फिल्मी स्टुडिओ उभारणे गरजेचे होते. अशावेळी जेष्ठ दिग्दर्शक – निर्माता नितीन चंद्रकांत देसाई यांनी हे आव्हान स्विकारले आणि मुंबई – पुणे हायवेवर चौक गावापासून कर्जतकडे वळलेल्या रस्त्यावर एन.डी.स्टुडीओची स्थापना केली. देसाई यांनी २००५ साली या स्टुडिओची स्थापना केली. अलिकडे हा स्टुडिओ बीग एन.डी. स्टुडिओ म्हणून ओळखला जातो. यामध्ये स्वत: नितीन देसाई आणि रिलायन्स एंन्टरटेनमेंट याची भागीदारी आहे. या स्टुडिओ मध्ये चित्रपट, टी.व्ही. मालिका आणि काही रियालीटी शोचे चित्रिकरण होते. मुंबईपासून ९० मिनिटांच्या अंतरावर हा स्टुडिओ आहे. अलिकडे हे पर्यटकांचेही केंद्र बनले आहे.

एन.डी. स्टुडिओ हा कर्जत तालुक्यात येत असून तो मोरबे धरणाच्या खालच्या बाजूस आहे. सुमारे ५२ एकर जागेवर तो वसलेला आहे. या ठिकाणी इनडोअर आणि आऊटडोअर अशा दोन्ही चित्रीकरणाची सोय आहे. या ठिकाणी निर्मात्यांना वेगवेगळ्या प्रकारच्या सेवा स्टुडिओमार्फत पुरविल्या जातात. त्यामध्ये आर्टवर्क, प्रॉडक्शन, पोस्टप्रॉडक्शन, सेट डिझाईन, सेट प्रॉडक्शन या सेवांचा त्यात समावेश आहे. आत्तापर्यंत या स्टुडिओमध्ये किक (फिल्म), जोधा अकबर (सिरीअल), बिग बॉस (सिरीअल), राजा शिवछत्रपती (सिरीअल), बालगंधर्व (मराठी फिल्म), मराठी पाऊल पडते पुढे (टॅलेंट शो), स्लमडॉग मिलेनियर (फिल्म),

चित्तोड की राणी पद्मिनी का जोहर (सिरीयल), ताजमहल (सिरीअल), बाजीराव मस्तानी (फिल्म), प्रेम रतन धन पायो (फिल्म), प्यार की यह एक कहानी (फिल्म), चक्रवर्ती अशोक सम्राट (सिरीअल) या चित्रपट व मालिकांचे चित्रीकरण झाले आहे. हळूहळू मुंबईतील चित्रनगरी या एन.डी. स्टुडिओमुळे मुंबईहून कर्जतकडे वळू लागली आहे.

• • •

# शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा डांगे चौक, थेरगाव



थेरगाव येथील डांगे चौकामध्ये दि. १२ फेब्रुवारी २००४ रोजी खा. श्रीरंग आप्पा बारणे यांच्या प्रयत्नाने शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला. या पुतळ्याची निर्मिती नाशिक येथील श्री. मदन गर्गे यांनी केलेली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज हे युद्धाच्या रणभूमीत ज्या आवेशाने लढाईला जायचे त्याच आवेशात हे शिल्प उभारलेले आहे. आज अनेक ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांची अनेक शिल्प आहेत, परंतु ही संकल्पना घेवून साकारलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे पिंपरी-चिंचवड शहरातील हे एकमेव शिल्प आहे.

या शिल्पातील छायाचित्राचे दाखले अनेक ठिकाणी दिले जातात. यात छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिकृती ही आकाशाकडे झेपावत असतानाची आहे. हि अतिशय सुंदर अशी प्रतिकृती बनवलेली आहे. हे शिल्प पाहून अनेकांना स्फुर्ती मिळते. या ठिकाणी अनेक विद्वान लोक भेट देतात. तसेच अनेक विद्यार्थीसुद्धा महाराजांचे शिल्प पाहण्यासाठी या स्थळाला भेट देतात.

हे शिल्प मुख्य चौकात असल्यामुळे येथील परिसर हा अतिशय सुशोभित करण्यात आलेला आहे. याठिकाणी पुतळ्याच्या चहूबाजूने शिवरायांच्या जीवनावरील अनेक प्रसंग रेखाटण्यात येत आहेत.

# मावळ लोकसभा मतदारसंघातील धार्मिक स्थळे

# एकविरा देवी - कार्ला



मुंबई, पुणे आणि कोकणसह महाराष्ट्रभरातील लाखो हिंदू भाविकांचे कुलदैवत असलेली एकवीरा देवी ही रेणूका मातेचे एक रूप असून तिचे मंदिर पुणे जिल्ह्यातील मावळ भागात लोणावळ्या नजीक एका डोंगरावर आहे. ती परशूरामाची आई असल्याचे मानले जाते. कार्ला लेण्याजवळ हे एकविरादेवीचे मंदिर आहे. लेण्याच्या प्रवेशद्वारापाशीच असलेल्या खडकामध्ये या देवीची मुर्ती कोरण्यात आली आसून. त्याला लागूनच मंदिर उभारण्यात आले आहे. या भागात राहणाऱ्या कोळी आणि आगरी समाजाच्या लोकांची ही कुलदेवता आहे. त्याचबरोबर सीकेपी, दैवज्ञ ब्राह्मण आणि कुणबी समाजातील लोकांची देखील एकवीरा ही कुलदैवत मानली जाते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि आत्ता उद्धवजी ठाकरे यांनीही या मंदिराला भेटी दिल्या आहेत. दररोज शेकडो भाविक या ठिकाणाला भेट देत असतात. कार्ल्याची एकवीरा देवी एक जागृत देवस्थान म्हणून महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे.

कार्ला येथील लेणी आणि मंदिरातील मुर्तीची स्थापना इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात झाल्याचा उल्लेख येथील काही शिलालेखावरून आढळून येतो. अतिशय निसर्गरम्य अश्या डोंगरकड्यात हे मंदिर आहे. मुंबईहून पुण्याकडे जाताना लोणावळ्यापासून १२ कि.मी. अंतरावर रस्त्याच्या उत्तरेकडे डोंगरावर हे स्थान आहे. या डोंगराच्या पायथ्याशी वेहेरगाव हे छोटे गाव आहे. या गावामुळेच या देवीला वेहेरगावची यमाई देखील म्हणतात.

चैत्र आणि आश्विन या दोन महिन्यात देवीची यात्रा भरत असते. नवरात्रातही नऊ दिवस भाविकांची गर्दी येथे ओसांडून वाहत असते. असंख्य भाविक नवस फेडण्यासाठी वर्षभर या ठिकाणाला भेट देत असतात. या देवस्थानची व्यवस्था पाहण्यासाठी एकवीरा देवस्थान ट्रस्ट स्थापन करण्यात आले असून ते ट्रस्ट व्यवस्था पहात असते. येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून गडाच्या पायथ्याशी वाहनतळ, स्वच्छतागृहे, पायऱ्या आणि विजेची सोय, निवासी धर्मशाळा आणि पिण्याचे पाणी अशा सोई करण्यात आल्या आहेत. गर्दीच्या काळात भाविकांना सहज दर्शन व्हावे यासाठी एल.सी.डी. टीव्ही व मोठ्या स्क्रीनची व्यवस्था करण्यात आली आहे. रांगेत दर्शन घेता यावे यासाठी संरक्षक लोखंडी रोलींगही करण्यात आले आहे. रांगेत उभे राहून वृद्धांचे आणि लहान मुलांचे पाय दुखू लागतात म्हणून मध्ये बसण्याचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

या एकवीरा देवीच्या मंदिराला लागूनच कार्ला लेणीदेखील असल्यामुळे पर्यटन आणि धार्मिक सहल असा दुहेरी लाभ घेता येतो.

• • •

# महडचा अष्टविनायक गणपती



अष्टविनायकांपैकी एक असलेले वरद विनायकाचे मंदिर रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात महड या गावात आहे. महड हे गाव जुन्या मुंबई–पुणे महामार्गावर खालापूर पासून ३ कि.मी. अंतरावर आहे. महामार्गापासून अवघ्या १ कि.मी. अंतरावर हे मंदिर आहे. अठराव्या शतकात सन १७२५ मध्ये पेशवे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे सुभेदार रामजी महादेव बिवलकर यांनी या मंदिराची स्थापना केली आहे. महड येथील वरद विनायकाची मुर्ती ही स्वयंभू मानली जाते. कारण ती मुर्ती या गावात असणाऱ्या एका तलावात सन १६९० मध्ये सापडली आहे. त्यानंतर सन १७२५ मध्ये पेशव्यांचे सुभेदार रामजी बिवलकर यांनी त्या मुर्तीभोवती मंदिर उभारले.

आजही त्या मंदिराच्या बाजूला तो सुंदर तलाव आहे. या मुर्तीचे तोंड पुर्वेकडे असून वरद विनायकाची सोंड डाव्या बाजूला वळलेली आहे. या मंदिराचे वैशिष्ट्ये असे की याठिकाणी एक दिप सतत तेवत ठेवला जातो. त्याबद्दल असे सांगितले जाते की, सन १८९२ सालापासून एकदाही या मंदिरातील दिवा विझलेला नाही. अगदी वादळातही देखील. या मंदिरातच लागून मुबक (उंदीर) नवग्रह देवता आणि शिवलिंग या देवतांच्याही मुर्ती आहेत. मंदिराच्या चारही बाजूला चार हत्तीच्या प्रतिकृती रक्षक म्हणून उभारण्यात आल्या आहेत. श्रीगणेशाचे रूप असणाऱ्या या अष्टविनायकाच्या मंदिरात अगदी गाभाऱ्यापर्यंत पोहोचून लोक दर्शन घेऊ शकतात. वर्षभर गणेशभक्तांची रिघ लागलेली असते. अष्टविनायक दर्शन करणारे लोक दररोज शेकडोंच्या संख्येने याठिकाणी येत

असतात. परंतू माघ महिन्यातील चतुर्थीला येथे जत्रेसारखी गर्दी दिसून येते. या वरद विनायक मंदिराबाबतच्या अनेक आख्यायिका सांगितल्या जातात. त्यापैकी एक अशी आहे की याठिकाणी माघी चतुर्थीला जी यात्रा भरते, त्यावेळी या मंदिरातून जर नारळाचा प्रसाद मिळाला आणि तो प्रसाद मूल न होणाऱ्या दाम्पत्यांनी खाल्ला तर त्यांना अपत्य प्राप्ती होते. या आख्यायिकेवर अनेक भाविकांचा विश्वास असून अनेक नि:संतान लोक मुद्दामहून माघी चतुर्थीला हमखास वरद विनायकाच्या दर्शनाला जाऊन प्रसाद ग्रहण करतात.

या मंदिराचा कळस सुमारे २५ फूट उंच असून त्याचा वरचा भाग सोन्याने मढविला आहे. गाभारा आठ बाय आठ आकाराचा आहे. कळसाचा आकार नागाच्या आकारासारखा आहे. अलिकडे या मंदिराच्या ट्रस्टनी भाविकांसाठी चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. पार्किंगची व्यवस्था, दुकाने आहेत. एकंदरीत हे अष्टविनायकांपैकी एक असलेले ठिकाण रायगड जिल्ह्यातील आणि मावळ लोकसभा मतदारसंघात येणारे लोकप्रिय असे भाविकांचे श्रद्धास्थान आहे.

● ● ●

# चिरनेरचा महागणपती



रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात चिरनेर हे एक आगरी समाजाची वस्ती असलेले गाव आहे. याच गावात एक जागृत, ऐतिहासिक महागणपतीचं देवस्थान आहे.

उरण-चिरनेर गावचे हे मंदीर ऐतिहासिक नोंदीतले आहे. ह्या देवळाने इतिहास जोपासला आहे. यादव राजवटीच्या काळात महाराष्ट्रावर परकीयांचे आक्रमण झाले. यादवांचे राज्य अल्लाउद्दिनने १२९४ मध्ये उडविले. सुलतानशाही आणि पोर्तुगिजांच्या आक्रमणाने गणपतीच्या मुर्ती तळ्यात, विहिरीत आणि जमिनीत लपविण्यात आल्या. अशाच मार्गाने चिरनेरचा गणपतीही तळ्यात लपविण्यात आला होता अशी नोंद आहे.

चिरनेर येथील गणपतीच्या मंदिराची स्थापना नानासाहेब पेशवे यांच्या कारकिर्दित झाली. त्यांचे सुभेदार रामाजी महादेव फडके हे पेशव्यांप्रमाणेच गणेशभक्त होते. धर्मासाठी छळ करणाऱ्या पोर्तुगीजांचा पुढे पेशव्यांनी पराभव केला. नानासाहेब पेशव्यांनी उरण व पाली ही आंग्र्यांची ठिकाणे घेतली. सुभेदार व पेशवे सुभेदार रामजी फडके यांना चिरनेर गावच्या तळ्यातील गणपतीने दृष्टांत दिला की, मी तळ्यात उपडा पडलो आहे. वर काढून माझी प्रतिष्ठापना करा. मग तळ्यामध्ये मुर्तीची शोधाशोध सुरू झाली व गणेशमुर्ती तळ्यात सापडली. ह्या तळ्याला देवाचे तळे नाव पडले.

सुभेदार रामाजी फडके यांनी तळ्यातून काढलेल्या गणपतीचीच्या

मुर्तीची हेमाडपंथीय धाटणीच्या मंदिरात प्रतिष्ठापना करण्यात आली. या गणपतीला महागणपती संबोधण्यात येते. आता मंदीरावर बाहेरून प्लास्टरचे काम केले आहे.

चिरनेरच्या महागणपतीची मुर्ती तिळातिळाने वाढते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. हा गणपती नवसाला पावतो, अशी ह्याची ख्याती पुर्ण उरण-पनवेल परिसरात आहे. त्यामुळे आता इथे भक्तगणांची संख्या वाढली आहे. पुर्वी चिरनेर गावातील लोक न्यायनिवाडा करण्यासाठी गणपतीला कौल लावायचे. माघी गणेशोत्सव व संकष्ट चतुर्थीला गणेशमुर्तीला सजवण्यात येते. तिला चांदीचा मुकुट चढविण्यात येतो.

उरण-चिरनेरच्या या महागणपतीने स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेउन त्याचे चटकेही सोसले आहेत. त्यामुळे चिरनेरच्या महागणपतीच्या मंदीराची गणना भारताच्या ऐतिहासिक मंदीरामध्ये होते.

• • •

# चिंचवडचे
# मोरया गोसावी



पिंपरी चिंचवड परिसरात राहणाऱ्या अगदी लहान थोरांना मोरया गोसावी मंदिर माहित नाही असे होणारच नाही. कारण हे येथील लोकांचे ग्रामदैवत बनले आहे. मोरया गोसावींच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन झाली आहे. सोळाव्या शतकामध्ये पुणे जिल्ह्यातील मोरगावात जन्म झालेल्या मोरया गोसावी यांनी श्री गणेशाची अपरंपार भक्ती केली. त्यांची गणेश भक्ती एक ऐतिहासिक घटना मानली जाते. अशा या गणेश भक्त मोरया गोसावी यांनी मोरगाव येथे गणपतीची (मोरेश्वरची) स्थापना केली आहे. या भागातील हे एक अत्यंत जागृत देवस्थान मानले जाते. अष्टविनायकांपैकी ते एक आहे. आयुष्याच्या उत्तरार्धात मोरया गोसावी यांनी चिंचवड या ठिकाणी जीवंत समाधी घेतली. त्यानंतर त्यांच्या मुलाने या समाधीच्या ठिकाणी एक मंदिर बांधले. हे मंदिर ही असंख्य भाविकांचे गेल्या पाच शतकापासून श्रद्धास्थान बनले आहे. संत तुकाराम महाराज आणि संत रामदास स्वामी या महान संतांनी देखील या मोरया गोसावी मंदिराला भेटी दिल्या असल्याचे सांगितले जाते.

सुरूवातीला मोरया गोसावी हे मोरगाव सोडून चिचंवड जवळच्या केजूदेवीच्या जंगलात आले. एकांतात ध्यानधारणा करू लागले. पण चिंचवडकरांनी त्यांना गावात आणले. आजचा वाडा आहे त्या ठिकाणी त्यांना झोपडी बांधून दिली. त्यात राहून मोरया गोसावी सेवा करू लागले.

प्रत्येक महिन्याच्या प्रतिपदेला ते चिंचवड वरून मोरगावला जात. चतुर्थीला मोरयाची पूजा करत. पंचमीला पारणे करून चिंचवडला परत येत. हळूहळू चिंचवडचा पसारा वाढला. अन्नदानाला ते फार महत्व देत. अन्नसत्र, सदावर्त, यात्रा, उत्सव, पूजा-अर्चा यामुळे चिंचवड सदा गजबजू लागले. मंगलमूर्ती मोरयाचा घोष करत सन १५६१ मार्गशीर्ष वद्य षष्ठी या दिवशी चिंचवडला पवनेच्या काठी त्यांनी समाधी घेतली. पवनेचा काठ पवित्र झाला. मोरया गोसावी यांचे समाधी स्थान हे जागृत आहे.

मोरया गोसावी यांच्या समाधी निमित्त प्रतिवर्षी मार्गशीर्ष वद्य तृतीया ते मार्गशीर्ष वद्य षष्ठी असे चार दिवस चिंचवड देवस्थान ट्रस्टचे वतीने भव्य महोत्सव साजरा करण्यात येतो. या सोहळ्यामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम, होम हवन याग, भजने, प्रवचने, आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे व भक्ती संगीत/ अभंग व नाट्य संगीताच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. श्रीमोरया गोसावी यांचे संजीवन समाधी सोहळ्याचे पूर्व संध्ये विविध क्षेत्रात काम केलेल्या काम केलेल्या एका मान्यवर व्यक्तीस 'श्रीमोरया जीवन गौरव पुरस्कार' हा सर्वोच्च मानाचा पुरस्कार देण्यात येतो. महोत्सवाच्या या चार दिवसात किमान २ लाख भाविक दर्शनासाठी येतात. षष्ठीला समाधी दिनी किमान पन्नास हजार मोरया भक्त भोजन प्रसादाचा लाभ घेतात.

आज मोरया गोसावी समाधी आणि गणेश मंदिर लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असून ते ग्रामदैवत ठरले आहे. दरवर्षी लाखो भक्त या मंदिर व समाधीला भेट देतात.

• • •

# देहूरोडचे बुद्धविहार



जुन्या पुणे-मुंबई महामार्गालगत देहूरोड येथे एक जुने बुद्धविहार असून या विहाराची स्थापना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली आहे. विशेष म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वत: ब्रम्हदेशातून रंगून आणलेली बुद्धमुर्ती या ठिकाणी आहे. त्यामुळे बौद्ध बांधवांच्या दृष्टीने त्याला तीर्थक्षेत्राएवढेच महत्व आहे. या विहाराची स्थापना दि.२५ डिसेंबर १९५४ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पत्नी माईसाहेब आंबेडकर यांच्यासोबत केली आहे. या विहारात मुर्तीची प्रतिष्ठापना करतांना बाबासाहेब म्हणाले होते की, आजचा हा प्रसंग इतिहासात सुवर्ण अक्षराने नोंदविला जाईल. कारण तब्बल बाराशे वर्षानंतर बुद्धाच्या मुर्तीची स्थापना करण्याचा मान आपणास मिळाला आहे. हे सारे श्रेय आपल्याच (भारतीय जनतेला) आहे. याबद्दल आपण धन्यवाद मानले पाहिजेत.

दरवर्षी २५ डिसेंबरला बौद्ध बांधव मोठ्या संख्येने या ठिकाणी जमतात आणि सामुदायिक बुद्ध वंदना घेतात. समाजातील एकी जपण्याचे ते एक पवित्र ठिकाण झाले आहे.

स्वत: डॉ.बाबासाहेबांनी या विहाराची स्थापना केली असल्यामुळे हे एक ऐतिहासिक विहार बनले आहे. ते आता बौद्धांचे श्रद्धास्थान देखील झाले आहे. पूर्वी बुद्धविहाराची जागाही भारतीय लष्कराच्या ताब्यात होती. परंतू अलिकडे ही जागा लष्कराने मालकी हक्काने दिली आहे. सुमारे २०००० चौरस फूटावर त्या

ठिकाणी भव्यदिव्य अशा विहाराचे निर्माण करण्याची संकल्पना आहे. यासाठी मा. आप्पा बारणे यांनी लोकसभेत प्रश्नही उपस्थित केला होता. परंतू काही तांत्रिक कारणामुळे त्यास विलंब होत आहे. लवकरच या ठिकाणी भव्यदिव्य असे विहार व्हावे, ही जनतेची अपेक्षा आहे.

• • •

# बिर्ला गणपती/प्रतिशिर्डी





पुणे शहरापासून साधारणपणे ४० कि.मी. अंतरावर जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर सोमाटणे फाटा नावाचा थांबा आहे. या थांब्यावर उतरल्यावर दक्षिणेकडील डोंगराकडे पाहिले असता डोंगराच्या माथ्यावर भव्य-दिव्य महाकाय अशी गणेश मूर्ती दिसते. खूप लांब अंतरावरून ही मूर्ती दिसते. तीच बिर्ला गणपती मूर्ती होय. या मूर्तीची उंची तब्बल ७२ फूट उंच आहे. ही मूर्ती शिरगाव या गावाच्या हद्दीत येते. ही महाकाय मूर्तीची स्थापना सरला बिर्ला यांनी केली आहे. या मूर्तीची देखभालीसाठी जयश्री चॅरिटी ट्रस्ट या ट्रस्टची स्थापना करण्यात आली असून या मूर्तीचे मूर्तीकार म्हणून मातुराम आणि नरेश वर्मा यांची नावे आहेत. ही ७२ फूट उंचीची गणेशमुर्ती २८ फूट बाय ५४ फूट चौरंग बनवून त्यावर बसवण्यात आली आहे. या मूर्तीचे वजन सुमारे १००० टन इतके आहे. ही मूर्ती तयार करण्यासाठी सुमारे २ वर्षाचा कालावधी लागला आहे. ही मूर्ती ज्या डोंगर पायथ्याशी आहे. त्याच्या पायथ्याशी वाहन तळ असून तेथून १८० पायऱ्या चढून मूर्तीपर्यंत जावे लागते. या ठिकाणाहून मावळातील निसर्गरम्य परिसर न्याहाळता येतो. तसेच या ठिकाणाहून मावळातील दिसणारा सुर्यास्त अतिशय विलोभनीय असतो. त्यामुळे अलिकडे वीकएंड पिकनिक पॉईंट म्हणून या स्थळाला भेट देणारांची संख्या झपाट्याने वाढत आहे.

या गणेशमूर्तीच्या दक्षिणेला डोंगराच्या बाजूने पुढे ४ कि.मी. गेल्यास प्रतिशिर्डी हे शिरगावच्या हद्दीत असलेले ठिकाण लागते. या ठिकाणी हुबेहुब

शिर्डीसारखेच साई मंदिर उभारण्यात आले असून या ठिकाणी भेट देणाऱ्या भक्तांची संख्याही लाखात आहे. ज्यांना शिर्डीला जाता येम नाही ते भाविक येथे भेट देतात. सकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत हे मंदिर दर्शनासाठी खुले असते.

• • •

# देहू - संत तुकाराम महाराज




जगतगुरू संत तुकाराम महाराज यांची जन्मभूमी आणि कर्मभूमी असलेले देहू हे गाव पुणे शहरापासून २५ कि.मी. अंतरावर असले तरी वाढत्या शहरीकरणामुळे ते आता पिंपरी-चिंचवड महानगराचाच भाग बनले आहे. संत तुकारामांच्या पदस्पर्शाने पावन झालेली देहू गावची भूमी लाखो वारकरी सांप्रदयाचे श्रध्दास्थान आहे.

संत तुकाराम हे इ.स. च्या सतराव्या शतकातील एक वारकरी संत आहे. पंढरपूरचा विठोबा हे तुकारामांचे आराध्यदेव होते. तुकाराम महाराज हे साक्षात्कारी, निर्भीड असे एक संत कवी होते. संत तुकारामांची भावकविता म्हणजे अभंग. अभंग म्हटला की तो फक्त तुकोबांचाच एवढी लोकप्रियता त्यांच्या अभंगांना मिळाली. त्यांचे अभंग खेड्यातील अशिक्षित लोकांच्याही नित्य पाठांत आहेत. त्यांनी सांप्रदायिक आभिनिवेश बाजूला ठेवून ऐक्यभाव, समता प्रस्थापित केली.

संत तुकारामांच्या अभंगाचा अनेकांनी अनेक अंगांनी अभ्यास करून त्यांच्या अभंगाचे सौंदर्य उलघडण्याचा प्रयत्न केला आहे.

देहू हे देशातील एक महत्वाचे तीर्थक्षेत्र म्हणून गणले जात आहे. पुण्याला आलेला कोणी धार्मिक वृत्तीचा माणूस देहु आणि आळंदीला भेट दिल्याशिवाय परत जात नाही. देशातील संत तुकाराम महाराजांचे मंदिर प्रसिध्द इंद्रायणी नदीच्या काठावर वसलेले आहे. या ठिकाणी विठ्ठल रखुमाईची स्वयंभू

मुर्ती आहे. हे मंदिर संत तुकारामांचे चिरंजीव नारायणबाबा यांनी सन १७२३ मध्ये बांधून पूर्ण केले. या मंदिराच्या बाजुला अन्यही मंदिरे आहे. अलिकडे भव्य आणि दिव्य असे गाथा मंदिरही या इंद्रायणी नदीच्या तीरावर बांधण्यात आले आहे.

नव्याने बांधण्यात आलेले गाथा मंदिर संगमरवरी दगडाने सुशोभित करण्यात आहे आहे. या गाथा मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळच संतश्री तुकाराम महाराज यांचा वीणाधारी पुतळा बसलेल्या अवस्थेत बसवण्यात आला आहे. या भव्य मंदिराच्या भिंतीवर महाराजांचे सुमारे ४००० अभंग कोरण्यात आले आहे. ज्या खडकावर संत तुकाराम महाराज बसून अभंग म्हणायचे किंवा ध्यानधारणा करायचे तो खडकही त्या ठिकाणी आहे. सत तुकाराम महाराज हे पंढरपूरच्या विठ्ठल रखुमाईचे नि:स्सीम भक्त होते. त्या भक्तीच्या मार्गाने जातानाच त्यांनी हजारो अभंगाची निर्मिती केली आहे. या अभंगाचा संग्रह म्हणजेच गाथा होय. संत तुकारामांची गाथा तत्कालीन विरोधकांनी इंद्रायणी नदीच्या डोहात बुडविली होती. तो डोह देखील तेथे आहे.

देहूचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे येथून दरवर्षी आषाढी वारीला पंढरपूरसाठी निघणारी संत तुकारामांची पालखी होय. ही पालखी देहू येथून निघून पायी चालत चालत एकादशी दिवशी पंढरपूरात पोहचते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक देहूला येतात आणि तेथे त्या पालखी सोहळ्यात सहभागी होऊन चालत पंढरपूरला जातात. त्यामुळे दरवर्षी लाखो लोक देहूमध्ये जमा होतात.

देहू गावातील मुख्य मंदिरातून समारेच एक मोठा डोंगर दिसतो तो म्हणजे भंडारा डोंगर. हा डोंगर देहू येथून ६ किमी अंतरावर आहे. भल्या पहाटे उठून तुकाराम महाराज आपली आध्यात्मिक साधना, भजन, लिखाण, चिंतन करण्यासाठी येथे जात असत. या डोंगरावर जगद्‌गुरू संत तुकाराम महाराजांनी साऱ्या विश्वाला मार्गदर्शक असणाऱ्या गाथेची निर्मिती केली होती. भंडारा डोंगरावर अनेक धार्मिक सोहळे होतात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक लोक या ठिकाणी गाथा पारायण सोहळा करण्यासाठी येतात.

भंडारा डोंगरावर तुकाराम महाराजांचे एक मंदीर असून काही वारकरी

मंडळी त्याची देखभाल करतात. मंदीरात संत तुकाराम महाराज, विठोबा-रखुमाई, गणपती, शिवलिंग अशा मुर्ती आहेत.

संत तुकाराम महाराजांच्या वास्तव्याने देहू गावाला आज तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाला आहे. भंडारा डोंगराचा समावेश तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात झाला असल्याने याही ठिकाणी विकासकामे सुरू आहे. महाराष्ट्र शासनाच्या तीर्थक्षेत्र विकास निधीतून या क्षेत्राला निधी मिळतो. भंडारा डोंगराच्या पश्चिम बाजूला जाधववाडी नावाचे छोटे धरण दिसते. तेथून जवळच सुधा नदीचे उगमस्थान आहे. ही नदी जांबवडे, सुदवडी, सदुम्बरे, येलवाडी मार्गे देहूतील इंद्रायणी नदीला जाऊन मिळते.

या डोंगराच्या नावाबाबत एक गोष्ट सांगितली जाते. एकदा छत्रपती शिवाजी महाराज तुकाराम महाराजांचे दर्शन घेण्यासाठी येथे आले. छत्रपतींच्या समवेत शेकडो मावळे वीर होते. एवढ्या माणसांना प्रसाद म्हणून जिजाबाईने आणलेल्या शिदोरीचे दोन दोन घास दिले तरीही ती शिदोरी संपली नाही. शेकडो मावळे छत्रपतींसह पूर्ण जेवून तृप्त झाले. जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराजांनी आपल्या ग्रंथातून जगापुढे आध्यात्मिक भांडार उघडून दिले. भंडारा डोंगरावरही भगवंताने जणू काही अन्नासाठी भांडारच उघडून दिले आहे. म्हणून या डोंगराला 'भंडारा' असे नाव दिले आहे.

• • •



जगतगुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे दर्शन घेताना खासदार श्रीरंग आप्पा बारणे

# खोपोलीचे गगनगिरी महाराज



अध्यात्मामध्ये खोपोलीच्या गगनगिरी महाराजांचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. त्यांच्या दर्शनासाठी सर्व सामान्य लोकांची गर्दी तर असतेच. याशिवाय अनेक प्रतिष्ठित व्यक्ती, राजकारणी आणि अधिकारीही त्यांचे भक्त आहेत. खोपोली येथील त्यांचा मठ या भाविकांचे श्रध्दास्थान आहे. गगनगिरी महाराज हे चालुक्य सम्राट पहिल्या पुलकेशीच्या घराण्यातील होते असे सांगितले जाते. श्रीपाद बाळासाहेब पाटणकर (साळुंके) हे त्यांचे मूळ नाव. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यात असलेल्या मणदुरे येथे सन १९०६ मध्ये झाला. त्यांच्या आईचे नाव विठाबाई. महाराजांचे वय तीन वर्षे असतानाच त्यांचे आईचे व महाराज पाच वर्षाचे असतानाच वडिलांचे निधन झाले.

लहानपणापासूनच त्यांना ईश्वर प्राप्तीची ओढ होती. वयाच्या सहाव्या वर्षी त्यांनी घर सोडले. सुरूवातीपासूनच ते नाथ संप्रदायाच्या संपर्कात आले. नाथ सांप्रदायींबरोबर ते बत्तीस शिराळा येथे आले. तेथे वयाच्या सातव्या वर्षी नाथ सांप्रदयाची दीक्षा मिळाली. पुढे चित्रकूट पर्वतावर त्यांनी चित्रानंद स्वामी यांची भेट घेतली.

एकदा बद्रीनाथजवळील व्यासगुंफेत महाराज अतिशय दमून भागून पहुडले होते. तेव्हा पर्वतावरून एक कफनीधारी साधू आले. साधूंनी त्यांच्या कमंडलूतील पाणी श्रीपाद यांच्या तोंडावर शिंपडले व कमंडलूतील हिरवेगार

कोथिंबिरीसारखे गवत खायला दिले. त्या साधूंनी श्रीपाद यांना सांगितले आजपासून तुला सर्वसिध्दावस्था प्राप्त होईल. सर्व मानवांचे कल्याण तुझ्या हातून होईल. तू आता दक्षिणेकडे चालत रहावे. त्याप्रमाणे श्रीपाद हे त्या खोऱ्यातून चालत हाल अपेष्टा भोगत भोगत ऋषिकेशला येऊन पोहचले. नंतर त्यांनी सर्व भारतभर एकट्यानेच फिरण्याचे ठरवले त्याप्रमाणे त्यांनी प्रवास सुरू केला.

थोड्याचे दिवसांत श्रीपाद यांना लोक स्वामी किंवा महाराज या नावाने ओळखू लागले. महाराज हरिद्वारापासून दिल्लीपर्यंत पायी प्रवास करत आले. तसेच पुढे भोपाळपर्यंत पायी गेले. तेथे एका तलावाच्या काठी स्नान करून स्थिर बसले होते. त्या वेळी त्यांच्या जवळच कोल्हापूरचे राजे व काही सरदार येऊन थांबले होते. त्यांची मायबोली मराठी असल्याने हे बालयोगी (गगनगिरी महाराज) त्यांच्याबरोबर मराठीत बोलू लागले. कोल्हापूरचे महाराज बालयोगी (गगनगिरी महाराज) यांना कोल्हापूरला घेऊन आले. पुढे बालयोगींनी दाजीपूर येथे अनेक वर्षे तप केले.

सुरूवातीला महाराज एका धनगर वाड्याच्या कडेला थोड्या अंतरावर झोपडी बांधून राहिले. त्या अरण्यात कंदमुळे, झाडपाला, वनस्पती भरपूर असल्याने त्यांचे मन तेथे रमले. पुढे-पुढे ते झाडांच्या ढोलीत राहून तप करू लागले. भूतविद्या, जारण-मारण-उच्चाटण विद्या अशा नाना प्रकारच्या विद्यांचे शोध व तप करू लागले. या तपात त्यांनी झोपण्यासाठी जी गवताची गादी केली होती, ती झाडासारखी वाढू लागली व त्यांला अंकुर येऊ लागले. त्यामुळे त्यांना विद्या पक्क्या झाल्याचा अनुभव येऊ लागला. त्या ठिकाणी पुन्हा पुन्हा कायाकल्प करून ते निरनिराळ्या विद्यांचे शोध लावू लागले व ते सिध्द होऊ लागले. महाराज त्या जंगलातच एका झाडाच्या ढोलीत निवारा बांधून राहत. पाऊस पडण्याअगोदर अंगावर वस्त्र निर्माण करण्यासाठी कुंभ्याच्या सालीचा वाक, आपट्याच्या सालीचा वाक व पळसाच्या पानाचे इरले करून पावसापासून बचावासाठी डोक्यावर चालते घर तयार करीत असते. वरील झाडांच्या वाकापासून लंगोट्या, टॉवेल, अंगावर घेण्याच्या साली, अंथरून, पांघरून अशा प्रकारची नवीन वल्कले धारण करून पावसाळ्याच्या दिवसात या इरल्याखाली रहायचे आणि तप करायचे असे जीवन जगणे त्यांना आवडत होते. पुढे भ्रमण करीत करीत महाराज गगनगडावर पोहचले. तिथे त्यांनी जलतपश्चर्या केली.

नाथ सांप्रदयातील महंताबरोबर ते संपूर्ण भारतभर फिरले. नेपाळ, भूतान, मानस सरोवर, गौरीशंकर, गोरखादरबार, गोरखपूर, पशुपतीनाथ येथून ते अल्मोडा येथे गेले. गंगा नदीचे खोरे, हिमाचल प्रदेश येथूनही त्यांनी आध्यात्मिक ज्ञान संपादनासाठी प्रवास केला.

गगनगिरी महाराजांना विश्वगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. महायोगी गगनगिरी महाराजांची इतर वैशिष्ट्ये सध्याच्या कलियुगामध्येही योगशास्त्रातील अनेकविध अवघड सिध्दी व चमत्कार प्रत्यक्ष आत्मसात केलेले असे ते महायोगी होते. योगशास्त्रातील विमलज्ञान, शिवयोग, उन्मनी विद्या गोरक्षनाथी विद्या अशा अनेक विद्या त्यांना आत्मसात होत्या. निसर्गाच्या सानिध्यात अनेक प्रकारची खडतर तपे करून त्यांनी हे अत्यंत अवघड व वैशिष्ट्यपूर्ण ज्ञान आत्मसात केले होते. प.पू. महाराजांनी योगसामर्थ्याचा संदेश सर्वत्र पोहचवला. प.पू. महाराजांनी हिमालय व गंगेचे खोरे येथेही तपश्चर्या केली. सन १९३२ ते सन १९४० सालापर्यंत महाराजांनी दाजीपूर येथील पाटाचा डंक या भागात राहून आरण्य निवासी तप केले. सन १९६५ पासून त्यांची किर्ती जगभर पसरली. निर्मनुष्य व अनेक श्वापदे असणाऱ्या गगनगडावरील ५२ तळी व सांगलीतील वाठार येथील ५ ते ६ डोहांत त्यांनी दिर्घकाळ जलतपश्चर्या केली. त्यासाठी ते पाण्याच्या तळाशी जाऊन योगिक क्रियांच्या सहाय्याने तेथे ध्यान लावून कित्येक तास बसत होते.

गगनगिरी महाराजांचे अनुयायी महाराष्ट्र, गुजरात, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, कर्नाटक अशा अनेक राज्यांमध्ये पसरले आहेत. संपूर्ण देशभरात, तसेच जगातही ठिकठिकाणी त्यांचे शिष्य व अनुयायी मोठ्या प्रमाणात आहेत.

**समाधी –**

सिध्दयोगी गगनगिरी महाराज यांनी रायगड जिल्ह्यातील खोपोली येथील गगनगिरी महाराज योगाश्रम पाताळगंगा तीर्थक्षेत्र आश्रमातील पर्णकुटी येथे ४ फेब्रुवारी २००८ रोजी पहाटे ३.३० वाजता देह सोडला. आज ते त्यांच्या भक्तांचे श्रध्दास्थान झाले आहे.

• • •

# केजुदेवी मंदिर - थेरगाव



थेरगाव येथे पवना नदीच्या तीरावर प्रसिद्ध असे केजू मंदिर आहे. श्री मोरया गोसावी चिंचवडला प्रथम आले त्यावेळी ते केजुदेवीच्या अभयारण्य परिसरात वास्तव्यास होते. त्यांनी पवना नदीतीरावर ध्यानधारणा केली. हे मंदिर अतिशय पुरातन असून पवना नदी पात्रालगतच आहे. पवना नदीला अनेक मोठे महापूर येवूनही या मंदिराला आजतागायत कुठलीही नैसर्गिक हानी पोहोचलेली नाही.

अनेक ऐतिहासिक दाखले या मंदिराबाबत दिले जातात. एक जागृत देवस्थान म्हणून या मंदिराकडे पाहिले जाते.

या परिसराचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या प्रयत्नातून सुशोभिकरण करण्यात आलेले आहे. यामध्ये सुंदर उद्यान व बोटक्लब उभारलेले आहे. या ठिकाणी दरवर्षी लाखो पर्यटक व भाविक या परिसराला भेट देतात. आजही या मंदिराच्या बाजूला दाट झाडी आहे. यात विविध जातीचे व रंगाचे पक्षी या ठिकणी पहायला मिळतात.

• • •

# मावळ लोकसभा मतदारसंघातील लेणी

# कार्ला लेणी



जुना-पुणे-मुंबई महामार्गावर लोणावळ्याच्या अगोदर ५ कि.मी.वर उत्तरेला डोंगरावर कार्ला लेणी आहेत. या लेणी वलुरक या नावानेही ओळखल्या जातात. शिवाय याच लेण्याजवळ एकविरा देवीचे मंदिर आहे. पुण्यापासून ६६ कि.मी. अंतरावर ही लेणी आहेत. ही मावळातील सर्वांत प्राचिन लेणी असल्याचे येथील शिलालेखावरून आढळून आले आहे. कार्ल्याची लेणी ही इसवी सन पूर्व पहिले शतक ते इसवीसन ५ व्या शतकापर्यंत म्हणजे ६०० वर्षे कोरली गेली आहेत. कार्ला लेण्यांमध्ये मोठा चैत्य सभागृह आहे.

कार्ले लेण्यामध्ये १६ लेणी आहेत. त्यात एक मुख्य चैत्यगृह तर इतर विहारे आहेत. मुख्य चैत्यगृह १२ फूट लांब, ४५ फूट रूंद व ४८ फूट उंच आहे. चैत्यगृहाच्या प्रवेशद्वाराजवळच सिंहस्तंभ कोरलेला आहे. असे सिंहस्तंभ सम्राट अशोकाच्या काळात कोरले गेले आहेत. त्यांच्या पायऱ्या वर्तुळकार आणि अंग सोळा कोनी आहे. या स्तंभाच्या शिरोभागी एक गोलाकार कळस आहे. त्यावर आम्लक हर्मिकेचा चौथरा आहे. त्या सर्वांकार चार सिंहाकृती कोरलेल्या आहेत. हा स्तंभ उभारणी करण्यासाठी महारठी अग्निमित्रणक यांनी दान केले असल्याचा उल्लेख तेथे कोरलेल्या ब्राम्ही भाषेतील लेखावरून कळते. चैत्यगृहातील एका खांबावर स्तंभ आणि चक्र असल्याचे दिसून येते. येथे सिंह आणि चक्र असलेले खांब असून त्यामध्ये स्तूप दिसतो. चैत्यगृहाबाहेर प्रशस्त सज्जा कोरलेला आहे. तेथे मिथून जोड्या, हत्ती, आणि गौतम बुध्दांचे त्यांच्या अनुयायांसह असलेले

शिल्पपट चैत्यकमाणी इत्यादी कोरलेले दिसून येते. येथे जे मिथून शिल्पाच्या जोड्या आहेत त्यातील स्त्रियांच्या डोक्यावर पदर घेतलेला असल्याचे दिसून येते. कमरेला शेला असल्याचे दिसते. पुरूष धोतर आणि डोक्याला मुंडासे बांधलेले दिसून येतात.

स्त्रियांच्या हातात बांगड्या, पायात तोडे, कंबरेवरच्या मेघला, गळ्यात मण्यांचे हार, कानात फुले, कपाळावर कुंकू अशी आभूषणे कोरण्यात आल्याचे दिसून येते. त्यावरून या कोरलेल्या मुर्ती या शिल्पकृतीस दान देणाऱ्या व्यक्तिंच्या असाव्यात असा अंदाज आहे. सज्जाच्या दोन्ही बाजुकडे अनेक मजली प्रसादांचे देखावे कोरलेले आहेत. त्यांच्या खालच्या बाजूस तीन हत्तींची शिल्पे असून एका हत्तींच्या पुढे गौतम बुध्दांच्या मुर्तीही कोरलेल्या आहेत.

कार्ले लेणीमध्ये केवळ शिल्पेच नाहीत तर दगडावर कोरलेले शिलालेखही या ठिकाणी आढळून येतात. ब्राम्ही भाषेत असलेले असे ३५ शिलालेख या ठिकाणी आढळून येतात. या लेखामधून त्या काळचा दानधर्म, समाज व्यवस्था, नातेसंबध, रूढी परंपरा, व्यापार, चलन या विषयी माहिती कोरलेली आहे. या मधील लेखातून काही गावांची नावे स्पष्ट होतात. त्यावेळचे धेनुकाकट म्हणजे आताचे डहाणू, सोपारक असाही उल्लेख आढळतो. तो आताच्या नाला सोपाराचा आहे. करिजक म्हणजे मावळातील करंजगाव, प्रभास म्हणजे काठेवाड, प्रभासतीर्थ वैजयंती म्हणजे आजचे कर्नाटकातील उत्तर कन्नड जिल्ह्यातील बनवास गाव होय. अनेक गावांचा उल्लेख येथील शिलालेखातून उघड होतो. चैत्यगृहाच्या व्हरंड्यातील एका लेखामध्ये मामलाहारे असा उल्लेख आढळतो. हे मामलाहरे म्हणजे मावळभाग आहे. यावरून मावळ भागातील ही सर्वांत प्राचिन लेणी असल्याचे सिध्द होत आहे. या शिलालेखाद्वारे प्राचिन लेणी असल्याचे सिध्द होते. सुतारकाम, सुगंधी द्रव्याचा वापर याचाही उल्लेख स्पष्ट होतो.

• • •

# भाजे लेणी



पुणे जिल्ह्यातील मावळात असलेल्या विसापूर (संबळगड) पायथ्याशी असलेल्या भाजे या गावानजिक डोंगरात बौध्द लेणी कोरलेली आहे. हीच ती भाजे लेणी होय. या ठिकाणी एकूण २२ कोरीव लेणी आहे. या लेण्यामध्ये असलेल्या मुख्य भाग म्हणजे चैत्यगृह. हे चैत्यगृह चापाकर असून त्यात दगडी स्तूप आहेत. बाजूला छोटे कक्ष कोरण्यात आले आहेत. या ठिकाणी पूर्वी बौध्द भिक्षूक रहात असत. या ठिकाणी शिल्पांमध्ये बारीक कोरीव काम केले आहे. ते अतिशय सुरेख आणि मनमोहक आहे. येथील जे सज्जे आहेत त्यावर कोरलेले जाळ्या आणि पडदे कोरीव कामाची दाद मिळवून देतात. वेदिका पट्टीवर असलेले नक्षीदार कोरीव काम आणि दगडात कोरलेल्या कड्या लक्ष वेधून घेतात. अनेक ठिकाणी स्त्री-पुरूष चित्रे कोरलेली आहेत. एका ठिकाणी एका स्त्रीने हातात धरलेले झाड स्पष्टपणे दिसते आहे. चैत्यकमान भल्या मोठ्या खडकात कोरलेली आहे. या कमानीवर सुमारे १७२ छिद्रे पाडलेली दिसून येतात. येथील चैत्यगृह खूपच विशाल असून त्याची लांबी १७.८ मीटर इतकी आहे. तर रूंदी ८.१३ मीटर आणि उंची ७.३७ मीटर इतकी भव्य आहे. त्यामध्ये २७ अष्टकोटी खांब कोरलेले असून त्याच्याबरोबर मध्यभागी स्तुप आहे. स्तुपाच्या पाठीमागे खांबावर बुध्दाची चित्रे कोरलेली दिसून येतात. या चैत्यगृहात जे २७ खांब आहेत त्या खांबावर कमळे आणि चक्रांची चिन्हे कोरली आहेत. एका ठिकाणी एक खुंटी असुन त्याला फुलांचा हार अडकवला असल्याचे शिल्प दिसते. या

चैत्यगृहात लाकडी फळ्यांचे छत्र आहे. या लाकडी फळ्यांवर ब्राम्ही लिपितील लेख आढळून येतात. चैत्यगृहांच्या दक्षिणेस स्वच्छ पाण्याचा झरा आहे. ही लेणी इसवी सनापूर्वी दुसऱ्या शतकात कोरण्यात सुरूवात होऊन ती पुढे आठशे वर्षे चालु राहिल्याचे तेथील लेखांवरून दिसून येते. येथील सुर्य लेणे खूप प्रसिध्द आहे. या प्रचंड मोठ्या असलेल्या शिल्पांमध्ये सुर्य आणि इंद्राचा देखावा कोरला आहे. पहिल्या शिल्पात चार घोडे असलेल्या रथावर सुर्य स्वार झालेला दिसतो. त्याच्या मागे पुढे त्याची पत्नी व दासी आहे. त्यातील एकीने सुर्यावर छत्र धरले आहे. तर दुसरी चवऱ्या ढाळताना दिसते. या रथाच्या चाकांखाली आसुर चिरडले गेल्याचे दाखवण्यात आले आहेत. चिरडला गेलेला राहू हा आसूर असल्याचे मानले जाते. या भाजेच्या एका शिल्पात एक स्त्री तबला वाजवितांना दाखविण्यात आलेली आहे. तर दुसरी नृत्य करतांना दाखवण्यात आली आहे. या शिल्पावरून तबला हे वाद्य सुमारे अडीच हजार वर्षापूर्वी भारतात होते आणि ती याच देशाची देणगी आहे असे मानले जात आहे. ही लेणी या देशातील सर्वांत पुरातन लेणी मानली जाते. या भाजे लेण्याचे आणखी एक वैशिष्टय आहे की येथे पाषाणातील कोरीव कामाबरोबरच लाकडातील कोरीव काम देखील दिसून येते. हे अन्य लेण्यांमध्ये दिसून येत नाही. या ठिकाणी भाजे लेण्यांमधील सहावे, नववे, बारावे आणि तेरावे लेणे महत्वाचे मानले जाते.

भाजे लेण्याकडे जाण्यासाठी लोणावळा येथे उतरून उपनगरीय लोकल ट्रेनने मळवली या स्थानकावर उतरावे लागले. तेथून दक्षिणेकडील बाजुस मुंबई-पुर्ण एक्सप्रेस वे आहे. त्यावरील पुल ओलांडून डावीकडे गेल्यास भाजेकडे जाणारा रस्ता लागतो. तेथून ३ ते ४ कि.मी. अंतरावर भाजे गाव आहे. या गावालगतच डोंगरात ही पुरातन लेणी पहावयास मिळतात.

● ● ●

# घारापूरी लेणी



मुंबईपासून पूर्वेला म्हणजे गेट वे ऑफ इंडियापासून पुर्व दिशेला समुद्रात १० कि.मी. अंतरावर एक छोटेसे बेट आहे. या बेटावर भव्य अशा पाषाणात घारापुरी लेणी कोरलेली आहेत. ही लेणी इतकी भव्य दिव्य आहेत की जागतिक पातळीवर त्याची दखल घेतली असून युनोस्कोने त्याला जागतिक वारशाचा दर्जा दिला आहे. पूर्वी या लेण्याच्या सुरूवातीलाच प्रचंड मोठ्या हत्तीची प्रतिकृती होती. त्यामुळे या लेण्याला एलिफंटा लेणी असेही म्हटले जाते. पोर्तुगीजांच्या काळात याचे एलिफंटा असे नामकरण झाले. घारापुरी लेणी साधारणपणे इ.स. ९०० ते १३०० च्या कालखंडात कोरली गेली आहेत. या बेटाचे प्राचीन नाव श्रीपुरी असे होते. परंतु मौर्यकाळात या बेटाचे नाव बदलून घारापुरी झाले असावे. हे महत्वपूर्ण बेट असल्यामुळे चाणक्य, राष्ट्रकुट, यादव आणि मोगल या सत्ताधिशांनी या बेटावर आपले वर्चस्व निर्माण केले होते. पुढे ते पोर्तुगीजांच्या ताब्यात काही दिवस होते. त्यानंतर शिवाजी महाराजांनी ते स्वराज्यात घेतले होते. महाराजांनतर पुन्हा ते इंग्रजांनी ताब्यात घेतले.

घारापुरी लेणी ही जगप्रसिध्द भव्य लेणी आहेत. या ठिकाणी पाच प्रमुख लेणी आहेत. येथे आढळणाऱ्या शिवमूर्ती मुळे ते शिल्पकाम शैव सांप्रदायाचे असावे असे मानले जाते. त्यामध्ये शिवपार्वती विवाह, गंगावतार, तांडवनृत्य, अंधकासूर वध असे शिवा संदर्भातील प्रसंग कोरलेले आहेत. एक मुख्य गुहा आहे. तिला महाकाय गुहा असे म्हणतात. ती २७ मीटरची आहे. या ठिकाणी

प्रशस्त असे दालन असून या दालनाच्या मध्यभागी ११ फूट उंचीची त्रिमुर्ती कोरलेली आहे. ही मूर्ती अतिशय सुंदर आणि सुरेख आहे. या त्रिमूर्ती म्हणजे ब्रह्मा-विष्णू व महेश आहेत. घारापुरीतील हीच प्रमुख लेणी आहे. याशिवाय दुसऱ्या एका लेण्यात कैलास पर्वतावर शिव-पार्वती बसलेले आहेत आणि रावण आपल्या वीस हातांनी तो पर्वत हलवित आहे असे चित्र कोरण्यात आले आहे.

या मूर्तीमध्ये शिवाच्या म्हणजे शंकराच्या मुकूटात चंद्रकला आणि प्रभा दाखवण्यात आल्या आहेत. शिवाची मुर्ती त्रिनेत्रधारी आहे. एका हाताने पार्वतीला आधार दिलेला दिसत आहे. तिसऱ्या एका लेण्यामध्ये शिव-पार्वती यांचा विवाह कोरला आहे. यामध्ये शिवपार्वतीसह लग्नाला उपस्थित असलेले देवदेवता आणि ऋषीमुनी यांचा देखावा कोरण्यात आला आहे. घारापुरीतील हे देखील अत्यंत देखणे शिल्प आहे. या व्यतिरिक्त मानवती पार्वती, गंगेचा जटेतून अवतार, शिवशक्ती अर्धनारी, महायोगी शिव, भैरव-महाबली मूर्ती अशाही भव्य मूर्ती पाषाणात कोरलेल्या बघायला मिळतात. या लेण्यापर्यंत पोहचण्यासाठी मुंबईला जावे लागते. तेथून गेट वे ऑफ इंडियापासून छोट्या बोटीतून जावे लागते. सकाळी ९ ते संध्याकाळी ४ वाजेपर्यंत बोटी आहेत. साधारणपणे १० कि.मी. समुद्रातून गेल्यानंतर घारापुरी हे बेट येते. हा प्रवास एक तासाचा प्रवास असतो. या प्रवासात समुद्रावर आलेले बगळ्यांसारखे पक्षी थव्या-थव्याने दिसून येतात. या पक्ष्यांचे वैशिष्टय असे की आपण खायला टाकले की ते वरचेवर झेलतात. त्याचप्रमाणे देश-विदेशातून आलेली मोठमोठी जहाजे खोल समुद्रात थांबलेली दिसून येतात. समुद्रात दूर गेल्यानंतर मुंबईतील उंच इमारती आणि किनारा न्याहाळता येतो. याशिवाय या प्रवासात ओएनजीसीचा प्रकल्प जेथे एलपीजी गॅस तयार केला जातो. तेही ठिकाण दिसते. तेथे चिमणीवर (धुराडे) सतत तेवत असणारा अग्नि दिसून येतो. तब्बल एक तासाचा समुद्र प्रवास म्हणजे एक रोमांचकारी आनंददायी घटना आहे. तिथे पोहचल्यानंतर या जगप्रसिध्द शिल्पकलेचा आस्वाद घेता येतो. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागातर्फे दरवर्षी येथे संगित नृत्य महोत्सव साजरा केला जातो. यामध्ये देशभरातील नव्हे तर परदेशातील कलाकारही भाग घेतात. घारापुरी म्हणजे भारतीय शिल्पकलेचे प्रतिक आहे.

• • •

# कोंढाणा लेणी



कोंढाणा लेणी ही रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात असलेल्या कोंदिवडे गावाजवळ आहेत. या गावापासून साधारणपणे १.५ कि.मी. डोंगर चढून गेल्यावर तेथे ही लेणी आहे. दुसऱ्या शतकात या लेण्याची निर्मिती झाली आहे. कोंढाणा लेण्यामध्ये एक मोठे चैत्यगृह आहे. त्याचप्रमाणे सात विहारे आणि दोन गुहा आहेत. विहाराच्या व्हरांड्यावरच्या छतावर अजिंठा लेणी प्रमाणे रंगीत चित्रे होती असे सांगतात. मात्र सध्या ती चित्रे दिसत नाहीत. मुख्य चैत्यगृह जे आहे ते नऊ मीटर उंचीचे आहे. तेथे पिंपळाच्या पानाच्या आकाराच्या कमानी कोरल्या आहेत. या कमानी भोवती बारीक कोरीव काम केल्याचे दिसून येते. याच विहारांच्या भिंतीवर चैत्यआकार, गवाक्ष, वेदिकापट्टी, नक्षीदार जाळी, नृत्य करणारे कलाकार इत्यादी शिल्पकार बघायला मिळातात. यातील काही कलाकारांच्या हाती धनुष्यबाण असलेले दिसून येतात. त्याचप्रमाणे त्याकाळची वेगवेगळी वेशभूषा आणि केशभुषाही या शिल्पातून बघायला मिळते. शिल्प पटांच्या खालच्या बाजूस पक्षांची मोठी शिल्प कोरलेली दिसतात. मोडकळीस आलेल्या पक्षांच्या मूर्तीस खांद्याजवळ ब्राम्ही लिपीमध्ये लिहिलेले शिलालेख दिसून येतात. यामध्ये कन्हस अंतबासिन बालकेन कन असे लिहिले असल्याचे दिसते. याचा अर्थ कन्हाचा शिष्य बालुक याने हे काम केले असा होतो. कलते खांब, झुकत्या भिंती आणि खोदकामात केलेला अर्ध उठावाचा वापर येथे दिसतो. या गृहाला आधार म्हणून मूळ दगडातील २८ खांब कोरले गेले होते. परंतू

काही परकीय आक्रमकांनी त्याचा विध्वंस केला.

चैत्यगृहाच्या बरोबर मध्यभागी दहाफूट व्यासाचा एक स्तूपही होता. परंतु परकियांच्या आक्रमणाला तोही बळी पडला आहे. मात्र त्याच्या अस्तित्वाच्या खूणा दिसून येतात. या चैत्यगृहाच्या छताला अर्धवर्तुळकार लाकडी वासेही बसवलेले दिसून येतात. कार्ले, भाजे आणि कोंडाणा या ठराविक लेण्यांमध्येच लाकडाचाही वापर केल्याचे दिसून येते. या लेण्यापासून ट्रेकिंग करून राजमाची किल्यावरही जाता येते. अनेक ट्रेकर प्रेमींचे हे आवडते ठिकाण बनले आहे.

• • •

# बेडसे लेणी



मावळ भागातील आणखी एक महत्वाची लेणी म्हणजे बेडसे लेणी होय. कार्ले किंवा भाजे इतकीच ही प्राचीण लेणी आहेत. लोणावळ्याजवळ असलेल्या विसापूर किल्ल्याच्या एका बाजूला लोहगड हा किल्ला आहे. तर दुसऱ्या बाजूला बेडसे लेण्यांचा डोंगर आहे. पुणे-लोणावळा रेल्वेमार्गावरील कामशेत येथे उतरून तेथून काळे कॉलनी कडे जाणारा रस्ता आहे. या रस्त्यावरून ९ कि.मी.अंतरावर बेडसे हे छोटेसे गाव आहे. या गावालगतच भातराशी नावाचा डोंगर आहे. या डोंगरातच या लेणी कोरल्या गेल्या आहेत. हिनमयान पंथाची ही लेणी आहेत. बेडसे गावापासून अर्ध्या तासाच्या पायी अंतरावर ही लेणी आहेत. इतर लेण्यांप्रमाणे याही लेण्यामध्ये एक प्रशस्त मोठे असे व्हरांडा असलेले चैत्यगृह आहे. हा व्हरांडा अष्टकोनी स्तंभावर कोरला गेला आहे. सुमारे १५० मीटर लांबीच्या खडकात ही लेणी कोरली गेली असून ही लेणी मौर्यकालीन शैलीची आहेत. इथे २५ फूट उंचीचा एक स्तंभ स्थापत्यशायाचा एक उत्तम नमुना मानला जातो. या लेण्यामधये एक चैत्यगृह, विहार, खोदलेले स्तूप आणि पाण्याची कुंडे बघायला मिळतात.

पूर्वी या लेण्यांना मारकूड लेणी या नावाने संबोधले जायचे. चैत्यगृहाच्या मध्यभागी चार स्तंभ आहेत. हे स्तंभ लेण्याच्या पायापासून छतापर्यंत आहेत. याची उंची २८ फूट आहे. या स्तंभाच्या शिरोभागावर उलटी कमळाची फुले कोरलेली आहेत. त्यावर एक चौरंगही कोरलेला आहे. चैत्यगृहात एक हर्मिकेचा चौथरा असून त्यावर मोठमोठे घट कोरलेले आहेत. त्यातून अष्टकोनी खांब बाहेर

पडलेले आहेत असे दिसते. त्या चौथऱ्यावर स्त्री-पुरूषांची वेगवेगळ्या प्राण्यांवर कोरलेली चित्रे दिसून येतात. त्यांची वेशभूषाही कोरली आहे ती स्पष्ट दिसते. ती वेशभूषा वेगळीच असल्याचे दिसून येते. ती वेशभूषा बेडसे लेणीचे वैशिष्टये आहे. चैत्यगृहाच्या दाराशी असलेल्या भिंतीच्यावर पिपंळपानांची मोठी कमान कोरल्याचे दिसून येते. या मुख्य कमानीच्या खाली तीन चैत्यकमानी कोरल्याचे दिसून येते. त्यातील मधल्या आणि डाव्या कमानी खालून चैत्यगृहात जाण्याचा मार्ग आहे. चैत्यकमानीमध्ये झाडांच्या पानांची आणि फुलांची नक्षी कोरलेली दिसते. मुख्य चैत्यगृहाचे छत गजपृष्ठाकृती आहे. चैत्यगृहातील स्तंभावर काही बौध्द प्रतिक कोरली आहेत.

ही लेणी पाहण्यासाठी हजारो पर्यटक भेट देत असतात. दरवर्षी काही संघटना या ठिकाणी धार्मिक कार्यक्रमदेखील घेत असतात.

# घोराडेश्वर लेणी



पुणे शहरापासून ४० कि.मी. अंतरावर असलेल्या घोरावडी रेल्वे स्थानकापासून जवळच डोंगरावर हे ठिकाण आहे. या डोंगराला घोराडेश्वराचा डोंगर असेही म्हणतात. हिंदू आणि बौध्द धर्माच्या मूर्त्या येथे एकत्रित पहायला मिळतात. जुना पुणे-मुंबई हायवेला लागनूच देहुरोड जवळ हा डोंगर आहे. त्यामुळे लोकल रेल्वेने तसेच मोटारीने रस्त्याने या ठिकाणी पोहचता येते. तरूण पर्यटकांची सध्या इथे गर्दी वाढलेली दिसते. पायथ्यापासून लेण्यापर्यंत पायऱ्या आहेत. शिवाय रात्री लाईटची देखील सोय आहे. घोराडेश्वराची ११ लेणी साधारणपणे तिसऱ्या आणि चौथ्या शतकात कोरली गेली असावी असे मानले जाते. या लेण्याचे वैशिष्टय असे की ही संपूर्ण लेणी एकाच अखंड खडकात कोरली गेली आहेत. मुख्य चैत्यगृहाला लागूनच ध्यान धारणेसाठी नऊ खोल्या कोरलेल्या आहेत. येथे असणाऱ्या एका भिंतीवर ब्राम्ही लिपीत लिहिलेले आढळते की हे चैत्यगृह बुध्द आणि संघ यांच्यातर्फे सप्रेम भेट म्हणून देण्यात आले आहे.

अशाच प्रकारचे गृह दुसरे एक असून तेच आताचे घोराडेश्वर मंदिर आहे. ही लेणी डोंगराच्या अगदी माथ्यावर कोरली गेली आहेत. यातील बरीचशी लेणी ही देवदेवतांची नावे असलेली आहेत. त्यामध्ये विठ्ठल रूक्मिणी, संत तुकाराम यांचा समावेश आहे. याबाबत अशी माहिती सांगितली जाते की संत तुकाराम महाराज अनेकदा या घोराडेश्वराच्या लेण्यामध्ये येत आणि ध्यानधारणा

करत असत. एक मोठ्या गृहामध्ये शिवलिंग असून तेच घोराडेश्वराचे मंदिर आहे. या शिवलिंगाचा पाया हा वर्तुळाकार नसून चौकोनी आहे. महाशिवरात्रीला येथे मोठी यात्रा भरते. हजारो भाविक डोंगर चढून येथे येतात आणि शिवलिंगाचे दर्शन घेतात. या ठिकाणी पाण्याचे अनेक आकेही आहेत. या ठिकाणाहून पुणे शहर, देहूरोड, तळेगाव दाभाडे आणि गेहूंजे स्टेडियम हा विहंगमय नजारा दिसतो.

• • •

# मावळ लोकसभा मतदारसंघातील
# किल्ले - दुर्ग

# राजमाची



कोकण-मुंबई या भागांना पुणे पश्चिम महाराष्ट्राशी जोडणारा रस्ता हा बोर घाटातून अर्थात लोणावळा-खंडाळा येथून जातो. हा मार्ग खूप प्राचीन काळापासून प्रचलित असल्यामुळे या भागात असलेल्या गड किल्ल्यांना खूपच महत्व प्राप्त झाले होते. त्यामुळे महाराष्ट्रात आलेल्या सर्वच परकीय आणि स्वकीय राज्यकर्त्यांनी या भागातील किल्ल्यांवर आपले वर्चस्व ठेवले होते. इतके या किल्ल्यांचे महत्व आहे. राजमाची हा असाच एक महत्वाचा किल्ला. हा किल्ला सह्याद्रीच्या पश्चिम भागात लोणावळ्यापासून १५ कि.मी. वायव्येला आहे. अनेक डोंगराच्या रांगामध्ये हा किल्ला वसला असून या भागास उल्हास नदीचे खोरे म्हणतात. त्याकाळी राजकीय दृष्ट्या या किल्ल्याला खूपच महत्व होते. बोरघाटमार्गे जाणारा मार्ग हा व्यापारी मार्ग होता. त्यामुळे जकात वसुलीवर नियत्रंण ठेवण्यासाठी या किल्ल्यांचा उपयोग व्हायचा. त्यामुळे या किल्ल्याला कोकणचा दरवाजा म्हणतात. राजमाची हा किल्ला सुमारे २५०० वर्षापूर्वीचा आहे. या किल्ल्याच्या पश्चिमेडील बाजूस कोंढाणे ही बौध्द लेणी आहेत. तो भाग रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात येतो. येथे कर्जतहून कोंदिवडे मार्गे जाता येते. शिवाय लोणावळ्याहूनही जाता येते.

इ.स. १६५७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी कल्याणवर स्वारी केली. तेव्हा मावळात असणारे राजमाची, लोहगड, तुंग, तिकोणा आणि विसापूर हे किल्ले आपल्या ताब्यात घेतले होते. पुढे संभाजी महाराजांच्या हयातीपर्यंत

म्हणजे सन १६८९ पर्यंत हे किल्ले स्वराजाच्या ताब्यात होते. पुढे शाहू महाराजांनी सन १७१३ मध्ये हा किल्ला दर्यावर्दी कान्होजी आंग्रे यांना दिला. पुढे सन १७३० मध्ये बाजीराव पेशव्यांनी ताब्यात घेतला. पुढे दुसऱ्या बाजीरावाचा इंग्रजांनी पराभव करून हा किल्ला सन १८१८ मध्ये आपल्या ताब्यात घेतला. या किल्ल्यावर एक कोरडी विहीर आहे. त्यात कधीच पाणी टिकत नाही. एक मोठा तलाव असून तो सन १७१२ मध्ये बांधण्यात आला आहे. त्या काठावर एक शिलालेखही आहे. तलावाच्या पश्चिम बाजूस पुरातन शिवमंदिर आहे. या मंदिराच्या मागून एक झरा उगम पावतो. पुढे तो गोमुखातून बाहेर पडतो. ते पाणी शेवट तलावात जाते. त्या तलावाला उदयसागर म्हणतात. किल्ल्यावर उठेवाडी नावाची स्थानिक लोकांची वस्ती आहे. तिथे पर्यटकांना राहण्यासाठी एका स्वयंसेवी संस्थेने कँप बनविला आहे. येथे उगम पावलेला झरा पुढे उल्हास नदीला मिळतो. या मार्गात कोंदिवडे आणि कोंढाणा गावाजवळ नदीपात्रात पाळण्याचा आकाराचा एक खड्डा कोरण्यात आला असून त्यात एका बालकाची मूर्तीही कोरण्यात आली आहे. या ठिकाणी नवस केल्यास मूल होते. अशी या भागातील लोकांची श्रध्दा आहे. लोणावळयाहून तुंगाली मार्गे राजमाची गडावर पोहचता येते. किल्ल्यावरून आजूबाजूचा निसर्ग पाहता येतो. दरीतून दिसणारे धबधब्यांचे दृष्य डोळ्यांचे पारणे फेडते. या किल्ल्याचा दरवाजा गोमुखी आहे. गडावर जुन्या वाड्यांचे अवशेष पहायला मिळतात. पुढे एक छप्पर नसलेले गणेश मंदिर आहे. या ठिकाणी पाण्याच्या चार टाक्या आहेत. किल्ल्याची तटबंदी आजही मजबूत आहे.

किल्ल्यावरून जवळपासचे कर्नाळा, प्रबळगड, इर्शाळगड, ढाकबहिरी हे किल्ले आणि नागफणीचा डोंगर दिसतो. राजमाची किल्ल्यांच्या पूर्वेला आणि दक्षिणेला ज्या दऱ्या दिसतात त्याला कातळदरा म्हणतात. या दरीतूनच उल्हास नदीचा उगम होतो. या नदीच्या पश्चिमेकडील डोंगराला भैरण डोंगर म्हणतात. या किल्ल्याजवळ भैरवनाथाचेही एक मंदिर आहे. अशा प्रकारे हा किल्ला इतिहास प्रेमी आणि निसर्गप्रेमींना एक पर्वणी ठरला आहे.

● ● ●

# लोहगड



लोहगडचा उपदुर्ग असलेल्या विसापूर गडावर मोठी सपाटी आहे. तशीच मोठी दगडी तटबंदी आहे. प्राचीन शिलालेखही आहेत. डोंगराच्या पोटात भाज्याची लेणी आहेत. लोहगडचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे कड्याच्या टोकावर बांधलेली चिरेबंदी वाट. अशी रेखीव वाट फार कमी दुर्गावर पहावयास मिळते. लोहगडवाडी पार केली की ही सर्पाकार वाट सुरू होते. एकदा का कोणी या वाटेवर पाय टाकला की मग तो माणूस वर येईस्तोवर पहारेकऱ्यांच्या नजरेआड जात नाही. तो व्यवस्थित हेरला जातो. वाटेवर वेगवेगळे बुरूज आहेत. त्यावरून येणाऱ्या माणसावर नजर ठेवता येते. वाटेवर गणेश दरवाजा, दुसरा नारायण, तिसरा हनुमान आणि चौथा महा दरवाजा असे चार दरवाजे आहेत. हनुमान दरवाजा जुना आहे. इतर तीन दरवाजे आणि एक उत्तम रेखीव जिना नाना फडणीस यांनी बांधून घेतला आहे. दुसऱ्या आणि तिसऱ्या दरवाज्यांच्या मधील भागात जकिरा करण्याची भुयारे आहेत. लोहगडचा हा भुयारसमूह आगळावेगळा आहे आणि विचारान्ती बांधलेला आहे. गडावर गेल्यावर वरच्या बुरूजावरून हा सर्व मार्ग न्याहळता येतो. कड्याच्या टोकावरचे हे बांधकाम खूप सुंदर आहे. लोहगडावर जाण्यासाठी तीन वाटा आहेत. १) पुण्यावरून अथवा मुंबईवरून येतांना लोणावळ्याच्या शेजारील मळवली स्थानकावर पॅसेंजर गाडीने किंवा लोकलने उतरावे. तेथून एक्सप्रेस हायवे पार करून भाजे भावातून थेट लोहगडला जाणारी वाट पकडावी. वाट मोठी आणि प्रशस्त आहे. तिथून दीड तासांच्या चालीनंतर गायमुख खिंडींत येऊन पोहचतो. खिंडीच्या अलीकडच एक गाव

आहे. त्याचे नाव लोहगडवाडी. खिंडीतून उजवीकडे वळले म्ळणजे लोहगडास आणि डावीकडे वळले म्हणजे माणूस विसापूर किल्ल्यावर पोहचतो.

२) लोणावळ्याहून दुचाकी अथवा चारचाकी वाहनाने थेट लोहगडवाडी पर्यंत जाता येते. लोणावळा भांगरवाडी-दुधिवरे खिंड-लोहगडवाडी. पवना धरणाकडे जाणाऱ्या रस्त्याने थोडे पुढे गेल्यावर डावीकडे एक रस्ता लागतो. तेथून ३ ते ४ किलोमीटरवर लोहगडवाडी आहे. उभा चढ आणि अतिशय धोकादायक वळणे आहेत. साधारण अर्ध्या तासाचा प्रवास आहे. मात्र येथे एसटी महामंडळाची सोय नाही. स्वत:चे वाहन असल्यास उत्तम अथवा लोणावळ्यातून ट्रॅक्सने जाता येते.

३) काळे कॉलनी ही पवना धरणाजवळ वसलेली आहे. तेथून लोहगड आणि विसापूर मधील गायमुख खिंड परिसर व्यवस्थित दिसतो. पवना धरणाच्या खालून एक रस्ता गायमुख खिंडीच्या डावीकडील टेकडीवर जातो. तेथून एक मळलेली पायवाट आपणांस लोहगडवाडीत घेऊन जाते. या टेकडीवर अग्रवाल नावाच्या व्यक्तिचा बंगला आहे. या वाटेने किल्ल्यावर जाण्यास २ तास लागतात. पुणे-पौंड-कळवण-तिकोना पेठ-दुथधवरे खिंड-लोहगडवाडी. तेथून अर्ध्या तासात लोहगड चढता येतो. वाटेत हडशीचा सत्यसाई आश्रम, प्रतिपंढरपूर हे देऊळ आणि पवना धरण बघता येते.

● ● ●




आय.एन.एस. शिवाजी, लोणावळा



मिलीटरी इंजिनियरींग कॉलेज दापोडी



एन.डी. स्टुडिओ, कर्जत




कर्नाळा पक्षी अभयारण्य



निसर्गरम्य लोणावळा



निसर्गरम्य खंडाळा



निसर्गरम्य माथेरान




मावळमधील गुलाबाची शेती



भाजे लेणी



कोंढाणा लेणी



कार्ला लेणी



घारापूरी लेणी



राजमाची गड



तुंग गड



लोहगड



आंद्रा धरण, आंदर मावळ



आंद्रा धबधबा, आंदर मावळ

# कर्नाळा किल्ला



कर्नाळा हा किल्ला रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात आहे. त्यामुळे तो मावळ लोकसभा मतदार संघात मोडतो. पनवेल शहरापासून तो १० कि.मी. अंतरावर आहे. या किल्ल्याच्या भोवती जे जंगल आहे ते पक्षी अभयारण्य म्हणून संरक्षित आहे. या किल्ल्याचे महत्व शिवछत्रपतींच्या काळापासून आहे. कारण हा किल्ला कोकण किनारपट्टी आणि उर्वरित महाराष्ट्र यांच्या सीमेवर आहे.

कर्नाळा हा किल्ला फार पुरातन आहे. देवगिरी यादव काळातील हा किल्ला इ.स. १४०० पूर्वी बांधण्यात आला आहे. (अंदाजे १२४८ ते १३१८) तुघलशहाच्या काळात हा किल्ला उत्तर कोकणची राजधानी म्हणून त्यांच्या ताब्यात होता. नंतर तो गुजरातच्या सुलतानशाहीच्या अधिपत्याखाली गेला. त्यानंतर पुढे सन १५४० नंतर अहमदनगरच्या निजामशहाने त्यावर कब्जा मिळवला परंतु निजामशहाला फार काळ टिकू दिले नाही. गुजरातच्या सुलतानशहाने पोर्तुगिजांशी संधान साधून निजामच्या तावडीतून हा किल्ला सोडवला. या ठिकाणी लढाई झाली. पुन्हा तो किल्ला सुलतानकडे आला. मात्र त्यावर पोर्तुगिजांनी वचक ठेवला. पुढे सुलतानशहा किल्ला सोडून वसईत गेला आणि किल्ला पोर्तुगिजांच्या ताब्यात आला. पुढे १६७० मध्ये शिवाजी महाराजांनी पोर्तुगिजांच्या ताब्यातून शर्थीनी हा किल्ला मिळवला.

मात्र छत्रपतींच्या निधनानंतर तो औरंगजेबने चढाई करून आपल्या ताब्यात घेतला. त्यानंतर सन १७४० मध्ये पेशवाईचा काळ सुरू झाला आणि

पेशव्यांनी तो मुघलांकडून आपल्याकडे घेतला. शेवटी दुसऱ्या बाजीरावाच्या काळात इंग्रज सरकारने सन १८१८ मध्ये पेशवाई संपुष्टात आणली आणि ब्रिटीश इष्ट इंडियाचे निशान लावले. त्यानंतर कर्नाळा किल्ला इंग्रजांच्या ताब्यात आला. असा हा या किल्ल्यांचा इतिहास आहे.

सध्या या किल्ल्याची बरीच पडझड झाली आहे. तरी देखील हा किल्ला पर्यटक आणि ट्रेकिंग करणाऱ्यांचे आवडते ठिकाण बनला आहे. एक तासात तळापासून शिखरापर्यंत ट्रेकिंग करण्यासाठी मुंबई पुण्याचे ट्रेकर्स येतात. शासनाने त्यांच्यासाठी खास सोय केलेली आहे. पावसाळ्यात ट्रेकिंग करणे हा एक अविस्मरणीय आनंद देणारी घटना असते. या किल्ल्याचे प्रामुख्याने दोन टप्पे आहेत. दोन टप्प्यांमध्ये एक उंच दगडी खांब आहे. त्याला पांडू टॉवर म्हणतात. त्याचा टेहळणी बुरूज म्हणून पूर्वी उपयोग व्हायचा. या किल्ल्यांच्या माथ्यावरून प्रबळगड, माणिकगड, हाजी, मलंगगड, चांदेरी गड, माथेरान, साक्षी गड, द्रोणागिरी किल्ला आणि राजमाची गड असे आठ किल्ले किंवा गट येथून स्पष्ट दिसतात. या किल्ल्याच्या पायथ्याशी भवानी मातेचे मंदिर असून शिवाजी महाराज किल्ल्यावर जाण्यापूर्वी याच भवानी मातेचे दर्शन घेऊन गडावर जात असत.

# विसापूर किल्ला



मुंबईहून पुण्याकडे जाताना लोणावळा ओलंडले की उजव्या बाजुला जी दोन किल्ल्यांची जोडी दिसते त्यातील मागच्या बाजूकडून डोकावणारा जो किल्ला दिसतो तो विसापूर अर्थात संबळगड हा किल्ला होय. मळवली या उपनगरीत रेल्वेस्थानकावरून हा किल्ला दिसतो. मळवली येथून भाजे या गावात गेले की हा किल्ला पूर्ण स्वरूपात दिसतो.

विसापूर किल्ल्याला फारशी ऐतिहासिक पार्श्वभूमी नाही. सुरूवातीला काही वर्षे हा किल्ला निजाम राजवटीत होता. त्यानंतर काही दिवसच तो मराठा साम्राज्यात होता. पुढे १८१८ साली पेशवाईने हा किल्ला इंग्रजांच्या ताब्यात दिला. ज्या दिवशी इंग्रज अधिकारी गडावर पोहोचले. त्या दिवशी मराठा सैन्य लोहगड सोडून गेले. एवढीच या गडाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. हा गढ चढताना वाटेत एक हनुमानाचे मंदिर लागते. त्याच्या बाजूला दोन गुहा आहेत. या गुहांमध्ये ३० ते ४० लोक आरामात राहु शकतात, मात्र पावसाळ्यात या गुहांमध्ये पाणी साचते. त्यामुळे त्या काळात तेथे राहता येत नाही. गडावर पाण्याची तळी देखील आहे या शिवाय एक जाते देखील सर्वांचे लक्ष वेधून घेते. किल्ल्याच्या पठारावर लांबच लांब पसरलेली तटबंदी लक्ष वेधून घेते.

या गडावर जाण्यासाठी मळवली स्थानकावर उतरल्यानंतर भाजे गावात जावे लागते. या भाजे गावातून विसापूर किल्ल्यावर जाण्यासाठी दोन वाटा आहेत. पहिली वाट भाजे लेण्याकडे जाण्यासाठी जी वाट आहे ती पायऱ्यांची

आहे. त्या पायऱ्या सोडून एक पायवाट जंगलाच्या दिशेने जाते. त्या वाटेने २० मिनीटे चालत गेल्यास काही घरे दिसतात. तेथून पुढे गेल्यावर मोडकळीस आलेल्या पायऱ्यांची वाट दिसते. दुसरी वाट भाजे गावातून गायमुख खिंडीपर्यंत जाते. तेथून जंगलात जाणारी वाट थेट विसापूर किल्ल्याकडे जाते. विसापूरसाठी आणखी एक मार्ग म्हणजे मळवली स्टेशनपासून बाहेर पडल्यानंतर मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे पुलावरून ओलांडून डावीकडे उतरणारा जीना उतरल्यावर पाटण गाव लागते. या पाटण गावातूनही विसापूर किल्ल्याकडे जाणारा रस्ता आहे. विसापूर आणि लोहगड हे दोन्ही किल्ले एका दिवसात पाहता येतात.

• • •

# तुंग किल्ला



पवन मावळ भागात असलेला हा एक ऐतिहासिक आणि नैसर्गिक किल्ला आहे. घाटरक्षक दुर्ग असा या किल्ल्याचा लौकीक आहे. या किल्ल्यावरून बोरघाटातील व्यापारी वाहतुकीवर त्याकाळी लक्ष ठेवत जायचे. या गडावरून लोहगड आणि विसापुर हे किल्ले दिसतात. सन १६५७ मध्ये शिवाजी महाराजांनी हा किल्ला आपल्या स्वराज्यात सामील करून घेतला होता. त्यानंतर १६६० साली शिवाजी महाराजांनी नेताजी पालकर यांच्याकडे या किल्ल्याची जबाबदारी दिली होती. १६६६ मिर्झाराजे जयसिंग आणि दिलेरखान यांनी तुंग आणि तिकोणा या दोन्ही किल्ल्यांना वेढा दिला होता. त्यांनी आजूबाजूची गावे जाळून उध्वस्त करून टाकली होती. परंतु हा किल्ला काही त्यांना जिंकता आला नाही. शेवटी पुरंदरचा तह झाला त्यानुसार हा गड त्यांच्या ताब्यात गेला आणि हलाल खानने या गडावर ताबा मिळविला.

या गडावर फारसे मोठे मैदान नसल्याने एक तासाच्या आत संपूर्ण किल्ला पाहता येतो. पायथ्याशी असलेल्या तुंगवाडीतून गडावर जाताना वाटेत हनुमानाचे मंदिर लागते. पुढे गोमुखी रचनेचा दरवाजा लागतो. तेथून आत गेले की गड माथा लागतो. गड माथ्यावर एक गणेशाचे मंदिर आहे. मंदिराच्या मागच्या बाजूस पाण्यासाठी खोदलेला खंदक आहे. तेथूनच बाले किल्ल्यावर जाण्यासाठी वाट आहे. बाले किल्ल्यावर तुंगा देवीचे मंदिर आहे. या मंदिरासमोर एक गुहा दिसते. एवढीच पाहण्यासारखी ठिकाणे या गडावर आहेत.

या गडावर जाण्यासाठी लोणावळा येथून भाबुर्डे अथवा आंबवणे बस पकडून २६ कि.मी. अंतरावर घुसळखांब येथे उतरावे. तेथून ८ कि.मी. अंतरावर तुंगवाडी आहे. तेथून गडावर चढावे लागते. दुसरा मार्ग पवना धरणातील पाण्यातून ब्रम्हणोली येथून लाँचने भेबरे या गावापर्यंत जाता येते. तेथून २० मिनिटाच्या अंतरावर तुंगवाडी आहे.

• • •

# तिकोणा किल्ला



पवना नदीवरील धरणाजवळ पुणे शहराच्या साधारण ६० कि.मी अंतरावर असणारा तिकोणा किल्ला समुद्रसपाटीपासून सुमारे ३,५०० फूट उंच आहे. तिकोणा किल्ल्यावरून तुंग किल्ला ३ ते ४ कि.मी अंतरावर दिसतो. किल्ल्याच्या त्रिकोणी आकारामुळे या किल्ल्याला तिकोना असे नाव पडले.

पंधराव्या शतकाच्या अखेरीस, मलिक अहमद निजामशहा याने इ.स. १४८२-८३ च्या सुमारास जुन्नर प्रांतावर स्वारी करून जुन्नर चा बराचसा प्रांत व त्यानंतर त्याने लोहगड काबीज केला. नंतर त्याने आपला मोर्चा तुंग व तिकोना गडांकडे वळविला. इ.स. १५८५ मध्ये मलिक अहमद निजामशहाने हा किल्ला जिंकुन निजामशाहीत आणला. इ.स. १६५७ मध्ये शिवाजी महाराजांनी हा किल्ला जिंकुन परत स्वराज्यात आणला. पुढे ११ जून १६६५ साली झालेल्या इतिहास प्रसिद्ध 'पुरंदरचा तहात' शिवाजी महाराजांनी जयसिंगाला दिलेल्या २३ किल्ल्यांपैकी तिकोना हा एक किल्ला होता. तसेच नेताजी पालकरकडे काही दिवस किल्ल्याची जबाबदारी होती.

तिकोना पेठेतून जाणारी वाट उभ्या कड्यावरुन थेट गडाच्या दरवाज्यात जाते. गडावर प्रवेश करण्यासाठी चार दरवाजे ओलांडावे लागतात. पुणे-कोळवण बसने गडाच्या पायथ्याच्या थोडे जवळ जाता येते किंवा कामशेतहून काळे कॉलनीमार्गे तिकोना पेठेत पोहोचता येते.

• • •

# मावळ लोकसभा मतदारसंघातील नद्या

# इंद्रायणी नदी



इंद्रायणी नदी ही महाराष्ट्रातील एक अत्यंत महत्वाची नदी आहे. या नदीच्या तिरावर देहू आळंदीसारखी तीर्थक्षेत्रे असल्याने ती फारच प्रसिद्ध आहे. या नदीचा उगम लोणावळ्या जवळ कुरवंडे नावाच्या उंच डोंगरावर नागफनी नजिक होतो. इंद्राणयी नदी पुढे वाहत काही अंतरावर गेल्यावर तिथे टाटाच्या धरणात लोप पावते. पुढे धरणाच्या खाली पुन्हा सुरू होते. लोणावळा शहरातून ४ कि.मी. अंतर कापून कामशेत रेल्वे स्टेशन लगत मोठे पात्र धारण करते. पुढे देहू-आळंदी हून वाहत जाऊन तुळापुर येथे भिमा नदीला मिळते.

दरम्यानच्या काळात मावळात उगम पावणारी कुंडलिका ही एक छोटी नदी असून ती इंद्रायणीची उपनदी आहे. ती वडिवळे गावाजवळ इंद्रायणीला मिळते. याच ठिकाणी वडीवळे धरण आहे. इंद्रायणीला कुबेरगंगा नावाची एक छोटी नदी मिळते. इंद्रायणी नदी ही मावळच्या विकासाची गंगा आहे. या भागासाठी वरदान ठरलेली ही नदी फार लांब नसली तरी अनेक धरणे आणि तिर्थक्षेत्र यामुळे तिची खुप महती आहे.

# पवना नदी



पवना नदी ही मावळात उगम पावणारी आणि पुण्याच्या पिंपरी-चिंचवड शहराला वरदान ठरलेली आहे. लोणावळ्याजवळील डोंगरात उगम पावून पुढे ६० कि.मी. अंतर वाहत जाऊन पुढे पुण्यामध्ये मुळा नदीला मिळते. या दरम्यान काळे या गावाजवळ या नदीवर मोठे धरण बांधले गेले असून हेच ते पवना धरण होय! या धरणामुळे नव्याने वाढत असलेली पिंपरी-चिंचवड हे औद्योगिक शहर आणि वाढती लोकसंख्या यांची पाण्याची गरज भागवत आहे. शहरीकरणामुळे ही नदीही मोठ्या प्रमाणावर प्रदुषित झाली आहे. देहु, चिंचवड, दापोडी मार्गे ही सांगवी मध्ये मुळा नदीला मिळते आणि पुढे संगमावर मुळा आणि मुठा या दोन नद्यांचा संगम होऊन त्या एकत्रित पणे पुणे शहरातून जातात.

पवना नदीच्या तीरावर अनेक गुलाब फुल उत्पादन करणारे नेटशेड आहेत. त्यामुळे पवना नदी पवन मावळासाठी भाग्यरेषा बनली आहे.

● ● ●

# आंद्रा नदी



आंद्रा ही आंदर मावळात उगम पावणारी नदी असून या नदीच्या नावावरूनच या भागाला आंदर मावळ असे नाव पडले आहे. आंद्रा नदी ही मावळच्या वायव्य डोंगराळ भागात उगम पावते. पुढे वाहत जाऊन ती इंद्रायणी नदीला मिळते.

दरम्यान या नदीवर दोन धरणे असून पहिले धरण ठोकळवाडीचे टाटाचे धरण आहे. यामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर पाण्याचा पसारा असून त्या धरणाच्या खाली पुन्हा आंद्रा नदी सुरू होते. पुढे सांगवी गावाजवळ इंद्रायणी नदीला मिळते. पुढे या दोन्ही नद्या तुळापुर येथे भिमा नदीला मिळतात.

निम्म्याहून अधिक मावळचा भाग आंद्रा नदीवर अवलंबून आहे.

# कुंडलिका नदी



कुंडलिका नदी ही मावळ भागात सह्याद्रीच्या डोंगरातून उगम पावते आणि पुढे वडिवळे या गावाजवळ इंद्रायणी नदीला मिळते. कुंडलिका या नदीवर वडिवळे येथे धरण बांधण्यात आले असून कुंडलिका व इंद्रायणी यांच्या संगमावर शंकराचे मंदिर असून तेथे महारात्रीच्या दिवशी येथे मोठी यात्रा भरते.

कुंडलिका नदीवरचे जास्तीत जास्त पाणी हे उद्योगांसाठी वापरले जाते. कुंडलिका नदीच्या काठावर भात आणि नाचणीचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते.

# उल्हास नदी



उल्हास नदी ही लोणावळा खंडाळा या हिल स्टेशनच्या उत्तरेस असणाऱ्या राजमाची किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या दरीतून उगम पावते. पावसाळ्यात प्रचंड मोठ्या प्रमाणावर लोणावळा, खंडाळा येथे पाऊस पडतो. त्यामुळे उल्हास नदी पावसाळ्यात तुडूंब भरून वाहते. या नदीचा उगम जरी पुणे जिल्ह्याच्या हद्दितून सुरू होत असला तरी संपुर्ण प्रवाह मात्र रायगड जिल्ह्यात आहे. रायगड मधील कर्जत, नेरळ, वांगणी येथून ती पुढे ठाणे जिल्ह्यात प्रवेश करते. तत्पुर्वी नेरळजवळ तिला पेज ही उपनदी मिळते.

ठाणे जिल्ह्यात प्रवेश केल्यानंतर बदलापूर, अंबरनाथ आणि उल्हासनगर शहरातून कल्याणकडे जाते. दरम्यान या नदीला पुढे ठाणे जिल्ह्यातील भातसा आणि काळू या दोन नद्या मिळतात. आणि मोठी झालेली उल्हास नदी शेवटी वसईच्या खाडीतून अरबी समुद्राला मिळते. औद्योगिक विकासात या नद्यांचा मोठा वाटा आहे. अनेक गावांच्या पाणी पुरवठा योजना या नद्यांवर आहेत. बदलापूर – अंबरनाथ येथील औद्योगिक वसाहतींनाही याच नद्यातून पाणीपुरवठा होतो.

• • •

# पाताळगंगा नदी



पाताळगंगा ही नदी बोरघाटच्या डोंगरावर उगम पावून पश्चिमेकडे वाहत जाते. पुढे खोपोली जवळ अन्य उपनद्या मिळून ती पुढे वाढत जाते. शेवटी ती धरमतर खाडीला मिळते आणि अरबी समुद्रात विलीन होते.

हि नदी पाताळगंगेच्या तीरावर असलेल्या रासायनिक औद्योगिक वसाहतीमुळे अतिशय प्रदुषित झाली आहे. त्यामुळे सामान्य लोकांना या नदीच्या पाण्याचा फारसा उपयोग होत नाही. परंतु रासायनिक कंपन्यातील सांडपाणी थेट नदीत सोडल्याने ते वाहून नेले जाते.

या नदीचे पौराणिक असे सांगितले जाते की, महाभारतात भीष्म मरणासन्न अवस्थेत असताना त्यांना पाणी पाजण्यासाठी अर्जुनाने जमिनीत बाण मारून पाणी काढले होते. तीच पाताळगंगा आहे. ही नदी रायगड जिल्ह्यातच उगम पावते नि याच जिल्ह्यात समुद्राला मिळते.

# पेज नदी



सह्याद्रिच्या पश्चिम घाटातील डोंगरातून पेज ही नदी कर्जत तालुक्यातील वैजनाथ गावाकडून उगम पावते. भिवपुरी कँप येथे टाटा पावर हाऊसमध्ये वीज निर्मिती केल्यानंतरचं पाणी या पेजनदीत सोडले जाते. त्यामुळे पेज नदीला बारामाही पाणी असते. या नदीच्या किनाऱ्यावर मुंबईतील अनेक लोकांनी फार्म हाऊस किंवा नर्सरीज सुरू केल्या आहेत. विट भट्टयांचे व्यवसाय सुरू केले आहेत. वैजनाथच्या डोंगरापासून उगम पावलेली ही नदी २५ कि.मी. चा प्रवास करून नेरळ आणि वांगणी या शहरादरम्यान उल्हास नदीला मिळते आणि पुढे वाहत जाते. पेज नदीवर कर्जत शहराला पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन बसवण्यात आली आहे. पेज नदी ही उल्हास नदीची उपनदी आहे.

• • •

# मुळा नदी



मुळा नदी पुणे जिल्ह्यातील एक महत्वाची नदी आहे. पश्चिम घाटांच्या जवळ मुळशी धरण बनले आहे. मुळा नदी दख्खन भारतातील भीम नदीची एक उपनदी आहे. ती पुणे शहरातून आणि खडकी गावातून जाते. पुणे शहराच्या पुढे डाव्या किनाऱ्यावर पवना नदी आणि मुळा नदीचे विलीन होऊन पुढे भीमा नदीला मिळते.

जीवशास्त्रज्ञांनी असे म्हटले आहे की मुळा नदीच्या खोऱ्यात आणि आसपासच्या परिसरात सुमारे १०८ प्रजाती मासे, १०२ बुलझूनी वनस्पतींच्या प्रजाती, १३० पक्षी प्रजाती आहेत.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पुणे महानगरपालिकेच्या जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरील हद्दी दरम्यानची सीमा ही नदी आहे. औंधमधील पुणे ते रावेतला जोडणारा राजीव गांधी पुल, दापोडी येथे हॅरिस ब्रिज, खडकी जवळील न्यू होळकर पुल, संगमवाडीतील संगम ब्रिज इत्यादी अनेक पूल या नदीवर आहेत.

• • •

# मावळ लोकसभा मतदारसंघ क्रांतीकारक व थोर समाजसेवक

# आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके



भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सशस्त्र क्रांतीचे जनक, आद्यक्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके हे रायगड जिल्ह्यातील पनवेल जवळ असलेल्या शिरढोण या गावाचे. दि. ४ नोव्हेंबर १८४५ मध्ये त्यांचा जन्म झाला. त्यांचे आजोबा कर्नाळा किल्ल्याचे किल्लेदार होते. लहानपणीच वासुदेव फडके यांनी कुस्ती तलवारबाजी, घोडेस्वारी हे खेळ शिकले होते. माध्यमिक शिक्षण पनवेल येथे घेतल्यानंतर ते पुण्याला आले. तेथे ते इंग्रज सरकारच्या सैन्य लेखा विभागात रूजू झाले. याचवेळी पुण्यामध्ये इंग्रज सरकार विरोधात जोरदार आंदोलनाची तयारी सुरू होती. त्यावेळी पुण्यात प्रभावी असलेले न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे आणि लहुजी वस्ताद साळवे यांच्या विचाराचा प्रभाव त्यांच्यावर पडला.

लहूजी वस्तादांनी आपल्या तालमीत त्यांना तयार करून इंग्रजांविरूद्ध लढा देण्याची प्रेरणा दिली. त्यासाठी मागासवर्गिय लोकांनाही सोबत घेण्याचा सल्ला दिला. पुढे इंग्रज सैन्यात कार्यरत असताना एकदा त्यांच्या आई गावी आजारी पडली. आईला भेटण्यासाठी त्यानी रजा मागितली, पण रजा घेण्यास त्यांना नकार दिला. शेवटी अनेक मिनतवाऱ्या केल्यानंतर त्यांना रजा मिळाली होती. ते घरी पोहचे पर्यंत त्यांच्या आईचे निधन झाले होते. संतप्त झालेल्या फडकेंनी ताबडतोब सरकार नोकरीचा राजीनामा दिला आणि इंग्रज सरकार

विरोधात भाषणे द्यायला सुरूवात केली. भीषण दुष्काळात लोकांना मदत करत त्यांनी इंग्रजांविरोधात लोकांमध्ये असंतोष पसरवायला सुरूवात केली.

सन १८७९ नंतर त्यांनी सशस्त्र क्रांतीला सुरूवात केली. चळवळ चालवायची तर पैसे पाहिजेत. त्यासाठी त्यांनी काही धन दांडग्यांना विनंती केली पण निरर्थक ! त्यामुळे त्यांनी आपल्या सोबत रामोशी, धनगर, कोळी आणि दलित तरूणांना घेतले आणि आपली सैन्याची फळी तयार केली. तरूणांना लष्कारी प्रशिक्षण दिले. अनेक ठिकाणी त्यांनी अक्षरश: दरोडे टाकून चळवळीसाठी पैसा उभा केला. शिरूर व पुणे जिल्ह्यातील खेड व शिरूर येथील सरकारी खजिना लुटला. त्यातून त्यांनी आपल्या सैन्याचा खर्च भागवणे सुरू केले. त्यानंतर थेट त्यानी पुण्यावर चाल केली. काही दिवस संपूर्ण पुण्यावर त्यांनी ताबा मिळविला होता. पुढे फडके निजामाची मदत घेण्यासाठी हैद्राबादलाही गेले. परंतु काही फायदा झाला नाही. ते पुन्हा महाराष्ट्रात आले. पुढे दि. २० जुलै १८७९ रोजी ते पंढरपूरला जात असताना कलदगी या गावात इंग्रज पोलिसांबरोबर त्यांची लढाई झाली. या लढाईत त्यांना जिवंत पकडण्यात आले. पुणे येथे मुळा व मुठा नदीच्या संगमाजवळ त्यांना कैदेत ठेवले. त्यांचे वकीलपत्र पुण्यात कोणत्याही वकीलाने घेतले नाही. त्यांना आजन्म कारावासाची शिक्षा झाली. नंतर त्यांना अरेबियातील एडन येथे तुरूंगात ठेवण्यात आले. एकांतवासाची शिक्षा भोगत असलेल्या फडके यांना एके दिवशी दरवाजाची कडी कोयंड्यासह उचकटून पलायन केले.

काही दिवसांनंतर पुन्हा इंग्रजांनी त्यांना पकडले आणि तुरूंगात डांबले. त्यांना अमानुष वागणूक मिळत होती. त्याविरूद्ध त्यांनी आमरण उपोषण सुरू केले. त्या काळातच त्यांचा दि. १७ फेब्रुवारी १८८३ रोजी शिक्षा भोगत असतानाच मृत्यु झाला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आद्य क्रांतीकारक म्हणूनही त्यांची ख्याती आहे. पुण्याजवळ संगमाजवळ जेथे त्यांना कैदेत ठेवले होते तेथे सद्या त्यांचे स्मारक उभारण्यात आले आहे.

वासुदेव बळवंत फडके यांचे संसदेत तैलचित्र लावण्यात आले आहे. त्यावर चित्रपटही निघाला आहे. वासुदेव बळवंत फडके यांचे जन्मगाव शिरढोण हे मावळ लोकसभा मतदार संघात आहे.

● ● ●

# चिंचवडचे क्रांतीवीर चाफेकर बंधू



स्वातंत्र्यलढ्यात जे क्रांतीकारक म्हणून शहिद झालेत त्यामध्ये पुण्याच्या चिंचवडमधील चाफेकर बंधूंचा प्राधान्याने इतिहासात उल्लेख होतो. वासुदेव चाफेकर, दामोदर चाफेकर आणि बाळकृष्ण चाफेकर हे तीन चाफेकर बंधु होत. त्यांचे कुटूंब मुळचे कोकणातील! उदरनिर्वाहाच्या निमित्ताने ते पुण्यात चिंचवड येथे स्थायिक झाले. त्यांचे वडिल हरिपंत हे हरिकथा सांगायचे, किर्तन करायचे. त्यांची तीनही मुले वासुदेव, दामोदर आणि बाळकृष्ण त्यांना त्यात मदत करत असत. पुणे शहर त्यावेळी स्वातंत्र्य चळवळीचे शहर बनले होते. लोकमान्य टिळक या चळवळीचे नेतृत्व करीत होते. केसरी वृत्तपत्रातून ते इंग्रज सरकार विरोधात जहाल भाषेत लिहित होते. त्या लिखानाचा प्रभाव या तीन्ही भावांच्या मनावर पडत होता. त्यातून प्रेरणा घेऊनच हे तिघे चाफेकर बंधू क्रांतीकारक बनले. त्यांनी आपल्या आसपासचे तरूण गोळा केले आणि त्यांना शस्त्रांचे प्रशिक्षण दिले.

ब्रिटीशांनी आणलेल्या संमती वयाच्या विधेयकास चाफेकर बंधूचा तीव्र विरोध होता. भारतीय संस्कृती मध्ये हस्तक्षेप करू नये असे जळजळीत लेख लोकमान्य टिळकांनी केसरीत लिहीले होते. त्यामुळे चाफेकर बंधूंना पाठबळ मिळाले. त्याच दरम्यान पुण्यामध्ये भयंकर अशी प्लेगची साथ सुरू झाली. ती

साथ आटोक्यात आणण्यासाठी इंग्रज सरकारने वॉल्टर चार्ल्स रँड या अधिकाऱ्याला पुण्यात पाठवले. रँडच्या आदेशाने प्लेगचे निवारण करण्यासाठी इंग्रज अधिकारी चामड्याचे बुट घालून प्रत्येकाच्या घरात घुसून महिलांवर उपचार करित होते. त्यांना स्पर्श करित होते. त्यामुळे सामाजिक मापदंड पायंदळी तुडवले जात होते. या गोष्टीचा चाफेकर बंधूंना तीव्र संताप आला आणि त्यांनी रँड या अधिकाऱ्याचे खून करण्याचे ठरविले.

त्याचवेळी पुण्यात राणी व्हिक्टोरियाच्या राज्यरोहनाचा हिटरक महोत्सव साजरा केला जात होता. त्यामुळे पुण्यात सर्वत्र विद्युत रोषणाई करण्यात आली होती. मोठ्या मेजवानीचे नियोजन करण्यात आले होते. अशा या आनंदाच्या वेळी दामोदर चाफेकर पिस्तुल घेऊन गणेश खिंड येथे दबा धरून बसले होते आणि रँड घरातून बाहेर पडण्याची वाट पाहू लागले. दि. २२ जून १८९७ रोजी रात्री १२ वा. रँड घरातून बाहेर पडून रस्त्यावर आला असता दामोदर चाफेकर यांनी अतिशय जवळून त्याच्यावर गोळ्या झाडल्या आणि पसार झाले. त्यानंतर रँड बरेच दिवस कोमात गेला होता. नंतर ३ जुलै १८९७ ला त्याचा मृत्यु झाला. त्याचवेळी दामोदर सोबत असलेला त्यांचा मोठा भाऊ बाळकृष्णनेही रँडचा सहकारी लेफ्टनंट आसरिस्टरवर गोळ्या झाडून त्याला ठार केले.

या घटनेनंतर ते पसार झाले. सगळीकडे हाहाकार माजला. चाफेकर बंधूंना पकडण्यासाठी वॉरंट सुटले सर्वत्र शोधाशोध सुरू झाली. दामोदरांना मुंबईतून अटक करण्यात आली आणि येरवडा येथे दि. १८ एप्रिल १८९८ मध्ये फाशी देण्यात आली. त्यानंतर त्यांचे मोठे भाऊ वासुदेव यांना दि. ८ मे १८९९ ला तर बाळकृष्ण यांना दि. १६ मे १८९९ मध्ये फासावर चढविण्यात आले. अशा रितीने तिन्ही चाफेकर बंधू देशासाठी शहिद झाले.

चिंचवड मध्ये मुख्य गावात एका प्रमुख चौकाला चाफेकर चौक असे नाव देण्यात आले असून या चौकाच्या मध्यभागी चाफेकर बंधूंच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले आहे. यामध्ये दामोदर व बाळकृष्ण यांचे १२ फुट उंचीचे तर वासुदेव चाफेकर आणि महादेव गोविंद रानडे यांचे बसलेले ७ फुट उंचीचे पुतळे उभारण्यात आले आहेत.

• • •

# हुतात्मा भाई कोतवाल



भारतीय स्वातंत्र्य लढ्यात ज्या ज्या वीरांनी आपल्या प्राणाची आहूती दिली त्यामध्ये माथेरान (नेरळ) येथे जन्मलेल्या वीर भाई कोतवाल उर्फ विठ्ठल लक्ष्मण कोतवाल यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. कारण ब्रिटीश सत्तेशी झुंज देता देता त्यांनी आपला जीव गमावला तो दि. २ जानेवारी १९४३ साली. सिद्धगडावर झालेल्या चकमकीत ब्रिटीश डी.एस.पी. आर हाल यांनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. त्यात ते हुतात्मा झाले. त्यावेळी ते सिद्धगडावर आपल्या साथीदारांसह भूमिगत झाले होते. परंतु कोणीतरी फितुरी केल्यामुळे त्यांचा घात झाला होता.

भाई कोतवाल यांचा जन्म १ डिसेंबर १९१२ रोजी माथेरान येथे एका नाभिक कुटूंबात झाला. त्यांनी आपले चौथीपर्यंतचे शिक्षण माथेरानच्या लोकल बोर्डाच्या शाळेमध्ये घेतले आणि त्यांनी पुणे गाठले. पुण्यामध्ये वाडिया कॉलेजमध्ये पदवी पर्यंतचे शिक्षण घेतले. सन १९३६ साली पुन्हा आपल्या गावी परतले. भाई कोतवाल आपल्या आई-वडिलांचे चौथे अपत्य होते. त्यांच्या अगोदर तीन मुलीच होत्या. त्यामुळे आपल्या मुलाने खुप शिकावे आणि वकील व्हावे अशी घरच्यांची इच्छा होती. त्याचप्रमाणे भाई पुण्याहून पदवी घेऊन परतल्यावर लॉ करण्यासाठी मुंबईला गेले. तेथे त्यांनी कायद्याची पदवी घेऊन ते वकील झाले. परंतु त्यांनी वकिली केली नाही. स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेतला.

त्यांची सासरवाडी पुण्याची होती. त्यांना एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये होती. मुलगा भारत हा वयाच्या २२ व्या वर्षीच वारला तर मुलगी भाई स्वातंत्र्य चळवळीत भूमिगत असतानाच वारली. त्यांची पत्नी इंदु कोतवाल मात्र अलिकडे २०१२ साली वयाच्या ९१ व्या वर्षी वारल्या. भाई कोतवाल वकील होऊन परतल्यावर त्यांनी सन १९४१ मध्ये माथेरान नगर परिषदेची निवडणूक लढवली आणि ते उपनगराध्यक्ष झाले. त्यानंतर त्यांनी आपला मोर्चा जमिनदारांकडे वळवला. जमिनदार शेतकऱ्यांची खूप पिळवणूक करायचे त्याविरूद्ध भाई कोतवाल यांनी आवाज उठवला. शेतकऱ्यांना आणि कामगारांना त्यांनी एकत्र केले. दुष्काळात गरिब शेतकऱ्यांसाठी त्यांनी बँक सुरू केली. त्यासाठी त्यांनी सावकरांकडून कर्ज घेतले. कर्जतचे राजकीय व सामाजिक नेते भाऊसाहेब राऊत यांनीही त्यांना खूप मदत केली. भाई कोतवालांनी केलेल्या शेतकरी, कामगारंच्या आंदोलनाला अच्युतराव पटवर्धन, एस.एम. जोशी, लालजी पेंडसे इ. मोठे नेते उपस्थित असायचे.

भाई कोतवाल पुण्याला शिकायला असतानाच त्यांच्यावर समाजवादी चळवळीचा मोठा पगडा होता. त्यामुळेच त्यांना भाई म्हणून ओळखले जात होते. सन १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी हिरारीने भाग घेतला. इंग्रजांनी सर्व भारतीय नेत्यांना तुरूंगात डांबले. भाईंच्या विरोधात देखील पकड वॉरंट होते, परंतू ते भूमिगत झाले. त्यावेळी ते माथेरान नगरपरिषदेचे उपाध्यक्ष होते. भूमीगत कार्यकर्त्यांचा गटच त्यांनी स्थापन केला होता. त्याला कोतवाल दस्ता म्हणत. त्यांनी मुंबईला वीजपुरवठा करणारी लाईन तोडून टाकली. त्यामुळे सर्व उद्योगनगरी आणि रेल्वेसेवा कोलमडली. भाई व त्यांच्या साथीदारांना रू. २५,००० चे बक्षीस लावले होते. अशावेळी ते सिद्धगड येथे घनदाट जंगलात भूमीगत झाले होते. भूमीगत असताना स्थानिक लोकांकडून मदत मिळावी म्हणून त्यांनी एक पत्र लिहिले. पण ते पत्र चुकून जमिनदाराच्या हाती पडले. त्यांनी ते इंग्रज डी.एस.पी. हॉल यांच्याकडे दिले आणि घात झाला. दि. २ जानेवारी १९४३ रोजी इंग्रज पोलिसांनी त्यांना घेरा घातला. अंदाधुंद गोळीबार केला त्यात भाई कोतवाल आणि हिराजी पाटील हे दोघे शहिद झाले.

• • •

# हुतात्मा हिराजी पाटील



स्वातंत्र्य काळात कर्जत तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर क्रांतीकारी तरूण पुढे आले. त्यामध्ये भाई कोतवालांसोबत हिराजी पाटील यांचेही नाव बरोबरीने घेतले जाते. भाऊसाहेब राऊत यांच्या प्रेरणेने हे तरूण स्वातंत्र्य संग्रामात उतरले होते. चले जाव चळवळ सुरू झाली तेव्हा मुंबईच्या गवालिया टॅक येथे झालेल्या आंदोलनात हिराजी पाटील आणि भाई कोतवाल हजर होते. त्यानंतर त्यांनी स्वत:ला स्वातंत्र्य लढ्यात झोकून दिले. कर्जत तालुक्यातील गोमाजी या प्रतिष्ठीत शेतकऱ्याचा मुलगा हिराजी पाटील होते. घरची परिस्थीती चांगली असतांनाही देशसेवेसाठी त्यांनी स्वत:ला स्वातंत्र्य आंदोलनात झोकून दिले होते. ते कोतवाल दस्त्यात सहभागी झाले. कर्जत तालुक्यातील ५० तरूणांचा एक क्रांतीकारी गट होता. त्याला कोतवाल दस्ता म्हणायचे. या कोतवाल दस्त्याने मुंबईला विजपूरवठा करणारी टाटाची वीज भिवपुरी येथून जाते. या वीजेचे टॉवर उध्वस्त करून मुंबईचा वीजपूरवठा खंडीत केला त्यामुळे इंग्रज चवताळले. त्यांनी हिराजी पाटील यांना अटक केली. त्यांना नेरळहून कल्याणला पकडून आणले. परंतू हिराजी पाटील मोठ्या शिताफीने पोलिसांच्या हातून निसटले. ते थेट मुरबाड तालुक्यातील सिद्धगड येथे भाई कोतवालांच्या दस्त्यात सामील झाले. बरेच दिवस एकच ठिकाणी राहिल्याने अन्नपाण्याची अडचण होऊ लागली. त्यावेळी भाई कोतवालांनी दूध आणि अन्न पोहचविण्यासाठी एका आदिवासी महिलेकडे

चिठ्ठी दिली आणि बोरगाव येथील पाटलांकडे देण्यास सांगितली. मात्र ती चिठ्ठी इंग्रजी पोलिसांच्या हाती सापडली. त्यावेळी ब्रिटीश डी.एस.पी. हॉलने आपल्या १० जवानांसह सिद्धगडावर पोहोचला. त्यावेळी आझाद दस्ता भूमिगत ठिकाण बदलण्याच्या तयारीत असतानाच हॉल ने जोरदार हल्ला चढविला. या हल्ल्यात पहिलाच बळी ठरला तो हिराजी पाटील! जागेवरच त्याचा मृत्यु झाला. त्यानंतर भाई कोतवालांना टारगेट केले. प्रथम गोळी मारून जखमी केले आणि नंतर डोक्याला गन लावून डोक्यात गोळी झाडली. हिराजी पाटील आणि भाई कोतवालांची जोडी इतिहासात अजरामर झाली आहे. कर्जतचे नाव इतिहासात कोरणारे हे दोन वीर हुतात्मा झाले. त्यांचे स्मारक मुरबाड (ठाणे जिल्हा) तालुक्यातील सिद्धगडच्या पायथ्याशी उभारण्यात आले आहे. कर्जत तालुक्यातील मानिवली या हिराजी पाटलांच्या गावात दरवर्षी २ जानेवारी हा दिवस शहीद दिवस म्हणून साजरा होतो.

• • •

# चिरनेरचा सत्याग्रह



चिरनेर हे रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात असलेले एक छोटे गाव आहे. चिरनेर आणि आजुबाजुला परिसर हा आदिवासी शेतकरी, कातकरी जमात आणि कष्टकऱ्यांनी सामावलेला आहे. या परिसरात पारंपारिक भात शेती चालते. या शिवाय जंगलातील जंगलसंपत्ती म्हणजे लाकडे, पाने, फुले आणि मध यांची विक्री करूनही काही जणांचा उदरनिर्वाह चालायाचा. परंतु दि. २५ सप्टेंबर १९३० रोजी इंग्रज सरकारने अचानक या परिसरातील आदिवासींना जंगल संपत्तीचा वापर न करण्याचा बंदी हुकुम काढला. त्यामुळे लोकांच्या पोटावर पाय आला. इंग्रज सरकारचा हा जुलमी आदेश ठोकरण्यासाठी चिरनेर आणि आसपासच्या कळंबुसरे, मोठी जुई, कोप्रोली, खोपटे, पाणदिवे, भोम, धकाटी जुई, विधणे, दिघोडे या गावातील आदिवासींनी सत्याग्रह केला. याच वेळी इंग्रज सैन्याने सत्याग्रहींवर गोळीबार केला. मग या सर्वच गावातील लहानथोर मंडळी रस्त्यावर उतरली. प्रत्येकाच्या हातात काठ्या, कोयते, कुऱ्हाड आणि इतर लोखंडी अवजारे घेऊन लोक रस्त्यावर उतरले. आपल्या हक्कावर गदा आणल्याचा रोष त्यांनी रस्त्यावर उतरून सत्याग्रह करून व्यक्त केला.

निष्पाप आदिवासी सत्याग्रहींवर इंग्रज सरकारने या गोळीबारात नान्या महादु कातकरी (चिरनेर), धाकू गवत्या फोफरेकर, रघुनाथ मोरेश्वर न्हावी (दोघे काप्रोली), रामा बामा कोळी (मोठी जुई), परशुराम रामा पाटील (पाणदिवे),

हसुराम बुधाजी घरत (खोपटे), आलु बेमट्या म्हात्रे (दिघोडे) या सात जणांना वीर मरण आले. तर शेकडो सत्याग्राही जायबंदी झाले. अनेकांना आपले हात – पाय गमवावे लागले. हा सत्याग्रह पुढे इतिहासात चिरनेरचा जंगल सत्याग्रह म्हणून प्रसिद्ध पावला आहे. त्यामुळे दरवर्षी आता तिथे दि. २५ सप्टेंबर रोजी चिरनेर जंगल सत्याग्रह दिन म्हणून साजरा केला जातो. त्या सातही हुतात्म्यांचे स्मारक त्या ठिकाणी उभारले आहे.

चिरनेर हे गाव सत्याग्रहामुळे ऐतिहासिक गाव बनले आहेच याशिवाय इथे एक महागणपतीचे जागृत देवस्थान आहे. तेराव्या शतकामध्ये यादव राजवटीत या महागणपतीची स्थापना झाल्याचे सांगता येते. मात्र नंतर आलेल्या सुलतानशाही, पोर्तुगीज आणि इंग्रजांनी हल्ला केल्यामुळे ही मुर्ती एका तळ्यात लपविण्यात आली होती. पुढे पेशव्यांच्या एका रामजी फडके नावाच्या सुभेदाराने ही मुर्ती तळ्यातून बाहेर काढून तेथे मंदिर बांधले. या तळयाला त्यांनी देवाचे तळे असे नाव दिले. रामजी फडके यांनी जे मंदिर बांधले आहे ते हेमाडपंथी पद्धतीचे आहे. या मंदिराचा आकार १२ बाय १२ फुटाचा आहे. दरवाजावर गणेशपट्टी आहे. देवळाचा घुमट गोलाकार असून मुख्य घुमटाच्या चारही बाजुला चार चबुतरे आहेत. मंदिराच्या घुमटावर कळस बसविण्यात आला आहे. मंदिरातील मुर्ती ७ फुट उंच व ३.५ फुट रूंद आहे. डावीकडे सोंड असलेल्या गणेशाची मुर्ती पुर्णपणे शेंदुराने माखलेली आहे. चिरनेरच्या गणपतीची मुर्ती तीळातीळाने वाढते अशी भाविकांची श्रद्धा आहे. नवसाला पावणारा गणपती म्हणून हा महागणपती म्हणून प्रसिद्ध आहे. पुर्वी जुने लोक न्याय निवाडा करताना गणपतीला कौल लावत असत. इंग्रजांनी केलेल्या गोळीबारात गणपती मंदिराचीही हानी झाली होती. इंग्रजांची बंदुकीची गोळी चुकून दरवाजाच्या एका लोखंडी गजाला लागली होती आजही ती खूण बघायला मिळते.

रायगडचे माजी खासदार स्व.दि.बा.पाटील याच परिसारतील होते. त्यांनी आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत गोरगरिब आदिवासींची बाजू घेतली. त्यांच्या हितासाठी झगडले, लढले! त्यांचेही स्मारक चिरनेर जवळच्या जासई गावात आहे.

• • •

# महाराष्ट्र भूषण
# डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी



श्री.नारायण विष्णु धर्माधिकारी ऊर्फ नानासाहेब धर्माधिकारी (जन्म : १ मार्च १९२२, मृत्यू : ८ जुलै २००८) हे समर्थ रामदासांच्या दासबोधाचे निरूपणकार होते. त्यांनी आयुष्यभर अध्यात्म, शिक्षण, आरोग्य, समाजप्रबोधन व व्यसनमुक्ती क्षेत्रांत निरलसपणे कार्य केले. श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांचे जगभरात लाखो अनुयायी आहेत.

नानासाहेब धर्माधिकारी यांचे शिक्षण मराठी चौथीपर्यंत झालं. रेवदंड्याच्या शाळेत ते शिकत होते. त्यांच्या वडिलांचा व्यवसाय हस्तसामुद्रिक (हात पाहून भविष्य सांगणे) हा होता. धर्माधिकाऱ्यांच्या घराण्यात चारशे वर्षांपासून समाजप्रबोधनाच्या कार्याची परंपरा आहे. त्यांच्या घराण्याचे मूळचे आडनांव 'शांडिल्य' असे होते. त्यांच्या भूतकाळातल्या आठव्या पिढीतील पूर्वज गोविंद चिंतामण शांडिल्य हे धर्मजागृतीचे काम स्वेच्छेने करायचे. त्याकाळचे दर्यासारंग कान्होजी आंग्रे यांनी त्यांना सन्मानाने 'धर्माधिकारी' अशी पदवी दिली. तेव्हापासून आजतागायत त्यांचे घराणे धर्माधिकारी हे आडनांव लावत आले आणि त्याला समर्पक असे धर्मजागृतीचे काम करीत आले.

डॉ.नानासाहेबांनी आपल्या पित्याकडून प्रेरणा घेऊन, प्रसिद्धीपासून दूर राहून समाजाचे प्रबोधन करण्याचे सेवाव्रत घेतले आणि ते अव्याहतपणे चालवले. त्यांचे

चिरंजीव श्री.आप्पासाहेब उर्फ दत्तात्रेय व नातू सचिन यांनीही नानांच्याच कार्याला वाहून घेतले आहे. श्री.आप्पासाहेब यांनी या समाजप्रबोधनाच्या कार्याची धुरा वडिलांच्याच निष्ठेने आणि तळमळीने स्वतःच्या शिरावर घेतली आहे. आदरणीय नानासाहेब यांना 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार' आणि श्री. आप्पासाहेब यांना भारत सरकारच्या वतीने त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल 'पद्मश्री' पुरस्कार देवून गौरविण्यात आले आहे.

धर्माचरणाविषयी समाजाला सन्मार्गाला लावण्याची शिकवण नानासाहेब धर्माधिकारी देत गेले. आधुनिक संदर्भात दासबोधाच्या कमालीच्या सोप्या निरूपणातून विकारी मनांची मशागत करताना निर्व्यसनी समर्थ समाजाचे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी त्यांनी आयुष्य वेचले. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष ह्या असा सर्वांगीण पुरुषार्थाची ओळख त्यांनी स्वतःची ओळख विसरलेल्या समाजाला करून दिली व आजही हे कार्य निष्काम त्यांचे सुपुत्र व नातू यशस्वीरीत्या करत आहेत. या कामासाठी त्यांनी १९४३ साली रायगड जिल्ह्यातील रेवदंडा येथे श्री समर्थ आध्यात्मिक प्रासादिक सेवा समिती स्थापन केली. या संस्थेद्वारे त्यांनी जगभरात अध्यात्माचा प्रसार केला. त्याच्या शाखा आज भारताबाहेरील अनेक देशांपर्यंत पसरल्या आहेत. त्या संस्थेमध्ये आजघडीला मराठी बरोबरच हिंदी, उडिया, तामिळ, बंगाली, कन्नड व इंग्रजीतून निरूपण केले जाते. सुरुवातीला महिला व पुरुषांचीच बैठक होत असे. मात्र, बालवयापासूनच संस्कार व्हावेत म्हणून बालोपासना सुरू करण्यात आली. अध्यात्माचे धडे देतानाच नानांनी शेकडो खेडी, आदिवासी पाड्यांची भ्रमंती करून लोकांना व्यसनमुक्तीचे महत्त्व पटवून दिले होते.

मावळ लोकसभा मतदारसंघातील पिंपरी-चिंचवड शहराबरोबरच रायगड जिल्ह्यातील अनेक परिवार समर्थ यांचे अनुयायी आहेत. बैठकीच्या माध्यमातून संस्कार शिबिरे घेतली जातात, त्यांना अध्यात्माचे मार्गदर्शन दिले जाते. समाज घडविण्याचे काम या प्रतिष्ठानच्या माध्यमातून होत आहे. अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, अज्ञान, स्त्रियांवरील अत्याचार, जातिभेद अशा कुप्रवृत्तींवर जोरदार प्रहार करत नानांनी सद्गुणांची पेरणी केली. त्यामुळे लाखो लोक व्यसनमुक्त होऊन परमार्थाकडे वळले. व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन यांसारख्या विविध क्षेत्रांत त्यांनी मोठे काम केले.

नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या माध्यमातून राज्यभरात ठिकठिकाणी स्वच्छता मोहिमांचे आयोजन केले जाते. पर्यावरण संवर्धनासाठी त्यांनी मोठी मोहीम

राबवली आहे. श्री सदस्य राज्यात ठिकठिकाणी वृक्षलागवड करत आहेत. या मोहीमेच्या माध्यमातून अनेक परिसर हिरवाईने नटलेले आहेत. कोट्यवधी रोपांची लागवड करून त्यांचे जतन करण्याचे काम श्री सदस्य करत आहेत.

• • •



पवना धरण, पवन मावळ



भूशी डॅम, लोणावळा



इंद्रायणी नदी



पवना नदी



आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके



क्रांतीकारक चाफेकर बंधू, चिंचवड



क्रांतीकारक भाई कोतवाल



क्रांतीकारक हिराजी पटेल



चिरनेर जंगल सत्याग्रह हुतात्मा शिल्प स्मारक


जे.एन.पी.टी. उरण


ओ.एन.जी.सी. उरण



पाताळगंगा एमआयडीसी



तळेगाव एमआयडीसी




पिंपरी चिंचवड एम.आय.डी.सी.




हिंदुस्तान ॲंटिबायोटिक्स लिमिटेड पिंपरी



मुंबई–पुणे एक्सप्रेस वे



गहुंजे क्रिकेट स्टेडिअम, गहुंजे

# मावळ लोकसभा मतदारसंघातील महत्वाचे शासकीय उपक्रम

# जे.एन.पी.टी.
# न्हावा शेवा बंदर



जे.एन.पी.टी. अर्थात जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट हे भारतातील सर्वात मोठे कंन्टेनर पोर्ट (बंदर) म्हणून प्रसिद्ध आहे. याला न्हावा/शेवा बंदर असेही म्हटले जाते. कंन्टेनरमधून जगभरातील आवक-जावक या बंदरातून केली जाते. हे बंदर मुंबईला लागूनच पुर्वेला अरबी समुद्रात उभारण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात न्हावा आणि शेवा बंदर असेही म्हटले जाते. पश्चिमी देशातील आयात निर्यातीसाठी महत्वपूर्ण बनलेले हे एक बंदर आहे.

या बंदराची सुरूवात दि. २६ मे १९८९ पासून करण्यात आली आहे. हे बंदर म्हणजे भारतीय प्रशासनाची कौशल्ये पणाला लावणारी घटना होती. कारण भौगोलिक परिस्थिती पुरक नसताना इतक्या मोठ्या प्रमाणावर आयात - निर्यात होणारे हे बंदर तयार करण्यात आले आहे. या बंदरातून झालेली आयात - निर्यात या एका बंदरातून होत असते. गेल्या ५ वर्षामध्ये सुमारे ४० लाखाहून अधिक कंटेनरची वाहतूक करून या बंदराने एक वेगळा विक्रम प्रस्थापित केला आहे. येत्या २०२०-२१ सालापर्यंत सुमारे १ करोड कंटेनरची आयात - निर्यात करण्याचे उद्दिष्ट  या  जे.एन.पी.टी. ने ठेवले आहे.

या बंदराची वैशिष्ट्ये अशी आहेत की, या ठिकाणी ज्या मुलभूत सुविधा देण्यात आल्या आहेत त्या अगदी जागतिक दर्जाच्या आहेत. त्यामध्ये उच्च दर्जाचे तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. सर्व सोई सुविधांनी सुसज्ज असे कस्टम

हाऊस उभारण्यात आले आहे. कंटेनर उतरवण्यासाठी आणि चढविण्यासाठी ३० कंटेनर फ्राइट स्टेशन उभारण्यात आली आहेत. शिवाय देशभरातील सुमारे ५२ हून अधिक कंटेनर डेपोशी हे बंदर जोडण्यात आले आहे.

या ठिकाणी रस्ते आणि रेल्वेच्या माध्यमातून कंटेनरची वाहतूक करता यावी म्हणून हे बंदर लोहमार्ग आणि रस्त्यांनी जोडले आहे.

जे.एन.पी.टी. बंदराने कंटेनर ठेवण्यासाठी भव्य असे कंटेनर टर्मिनल उभारले आहे. त्याची लांबी ६४० मीटर अर्थात २२३० फुट इतकी असून त्यात तीन मोठे गाळे आहेत. तसेच न्हावा/शेवा आंतरराष्ट्रीय कंटेनर टर्मिनलही लीजवर घेण्यात आले आहे. त्याची लांबी ६०० मी. म्हणजे २००० फुट आहे. यात दोन मोठे गाळे आहेत. त्यामध्ये १.५ लाख टन कार्गो मावू शकतात. अशा प्रकारची कंटेनर टर्मिनल्स या ठिकाणी उभारण्यात आली आहेत.

देशभरातील आयात निर्यातीचा ४४ टक्के व्यवहार याच बंदरातून होत आहे. साधारणपणे टेक्सटाईल्स मशिनरी, खेळाची साधने, कारपेट, हड्डीविरहीत मटण, रसायने आणि औषधे या वस्तुंची निर्यात या बंदरातून होत असते. तसेच वेगवेगळ्या प्रकारच्या मशिनरी, केमिकल्स, प्लास्टिक, इलेक्ट्रीक मशिन, खाद्य तेल, अॅल्युमिनियम आणि पोलाद व्यतिरीक्त धातुकाची आयात या ठिकाणाहून होते. देशभरातील महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजरात, कर्नाटक आणि उत्तरेकडील बऱ्याच राज्यातून या बंदरामार्फतच आयात-निर्यात केली जाते.

● ● ●



जे.एन.पी.टी. बंदराला भेट देताना केंद्रिय मंत्री अनंत गिते
व मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे

# ओ.एन.जी.सी.



ओ.एन.जी.सी. अर्थात ऑईल ॲन्ड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन ही एक भारत सरकारची कंपनी आहे. ही कंपनी देशातील खनिज तेल आणि वायुचा शोध घेणारी सर्वात मोठी कंपनी आहे. या कंपनीची स्थापना दि. १४ ऑगस्ट १९५६ मध्ये झाली आहे. या कंपनीचे मुख्य कार्यालय उत्तराखंड राज्यात देहरादून येथे आहे. या कंपनीमध्ये सुमारे ३५ हजाराहून अधिक लोक काम करीत आहे. भारताला लागणारे ७२ % खनिज तेल म्हणजे पेट्रोल, डिझेल या कंपनीकडून पुरविले जाते. त्याचबरोबर घराघरात वापरला जाणारा ४८ % नैसर्गिक वायु (गॅस) याच कंपनीकडून घेतला जातो.

आत्तापर्यंत कंपनीने देशभरातील सात पैकी सहा खोऱ्यातून तेलाचे साठे शोधून काढले आहेत. त्यामुळे ११८४ तेल विहीरी आणि १५१ गॅस विहिरी, किनारपट्टीपासून दूर ४७३५ तेल विहिरी समुद्र किनाऱ्यावर खोदल्या आहेत. दर दिवशी १२ लाख बॅरेल इतके खनिज तेल उत्पादन केले जाते. अशा या जगात नावाजलेल्या कंपनीचा एक प्रकल्प रायगड जिल्ह्यातील उरण या ठिकाणी आहे. या ठिकाणी ओ.एन.जी.सी.चे दोन प्लँट आहेत. १) को-जनरेशन प्लँट २) ऑईल अँड गॅस प्रोसेसिंग प्लँट.

त्यातील पहिला प्लँट तीन भागात विभागला आहे. गॅस टर्बाईन बॉथलर्स आणि गॅस फायर्ड बॉथलर्स तर ऑईल अँड गॅस प्रोसेसिंग प्लँट या सहा भागात विभागला गेला आहे. या ठिकाणी प्रामुख्याने एल.पी.जी. गॅसची निर्मिती होऊन

तो स्टोअर केला जातो आणि इतरत्रही पाठवला जातो. त्याचबरोबर सी २ – सी ३ आणि लॅन ही अन्य उत्पादनेही तयार केली जातात.

उरण प्लँटची निर्मिती सन १९७४ मध्ये झाली आहे. ओ.एन.जी.सी. हा देशातील अतिशय महत्त्वाचा प्लँट आहे. मुंबईच्या आसपासच्या परिसरातील मिळवलेला गॅस आणि ऑईल याठिकाणी आणले जाऊन त्यावर प्रोसेस केली जाते. या प्रकल्पाला केंद्र शासनाने सर्वोत्कृष्ठ प्रकल्प म्हणून पुरस्कृत केले आहे. थेट समुद्रातून एक मोठी पाईपलाईन उरण प्रकल्पात आणली असून तेथील विविध प्लँटमध्ये त्यावर प्रक्रिया केली जाते. उरणच्या ओ.एन.जी.सी. प्रकल्पाचे क्षेत्रफळ ५.५ चौरस कि.मी. इतके असून हा प्रकल्प मुंबईच्या गेट वे ऑफ इंडिया पासून पुर्वेला पाहिल्यास दिसतो.

● ● ●

# शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको)




महाराष्ट्र शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (City and Industrial Development Corporation of Maharashtra) ही महाराष्ट्र राज्यातील एक सरकारी संस्था आहे. सिडकोची स्थापना १७ मार्च १९७० रोजी महाराष्ट्र राज्य शासनाने मुंबईच्या जवळील नवीन शहरे निर्माण करण्यासाठी केली. नवी मुंबई या शहराचे नियोजन व निर्मिती करण्याचे श्रेय सिडकोला दिले जाते.

सन १९५१-६० दशकात मुंबईच्या लोकसंख्येत ४० टक्क्यांनी वाढ झाली व त्यापुढील दशकात त्यामध्ये ४३.८०% इतक्या प्रचंड वाढीची शक्यता होती. वाढत्या लोकसंख्येमुळे पायाभूत व भौतिक सोयी-सुविधांवर अत्यंत ताण पडू लागला व त्यांचा विकास करणे मुंबईच्या भौगोलिक मर्यादेमुळे अशक्य होते. औद्योगिक व वाणिज्यिक विकासामुळे अर्थार्जनासाठी देशभरातून स्थलांतरितांचा ओघ या नगरीकडे वाढू लागला, परिणामी येथील जीवनमानाचा दर्जा खालावणार होता. वाढत्या लोकसंख्येसाठी आवश्यक तेवढ्या निवासाची सिद्धता करणे शक्य नसल्याने शहराच्या असंतुलित वाढीवर नियंत्रण आणणे अशक्य होणार होते. या समग्र पार्श्वभमीवर, सर्व प्रकारच्या स्थानिक सेवा- सुविधांवरील ताण शिथिल करण्यासाठी मुंबईच्या जुळ्या शहरांची निर्मिती करण्याचा पर्याय महाराष्ट्र शासनाने विचारार्थ घेतला. जुलै १९५८ मध्ये बृहन्मुंबई महानगर पालिकेमध्ये

विकास आराखडा निर्मितीचा निर्णय होऊन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे तत्कालीन सचिव श्री.एस.जी. बर्वे यांच्या नेतृत्वाखाली एका अभ्यास गटाची नियुक्ती करण्यात आली.

फेब्रुवारी १९५८, मध्ये श्री. एस.जी.बर्वे यांच्या अभ्यासगटाचा अहवाल शासनास प्राप्त झाला. त्यामध्ये, 'ठाणे खाडीवर रेल्वे आणि रस्ते पुलाची उभारणी करून बेटात विभागलेल्या मुंबईला मुख्य भूमीशी जोडण्यात यावे, ज्यामुळे सदर पूल खाडीपलीकडील विकासाच्या गतीस फायदेशीर ठरेल, तसेच महानगराच्या रस्ते व रेल्वे वाहतुकीवरील ताणाचे विकेंद्रीकरण होऊन औद्योगिक व निवासी विकासाला पोषक ठरेल. तसेच पूर्वेकडील संभावित विकास सूत्रबद्ध आणि सुनियोजित होईल.' अशी शिफारस करण्यात आली.

महाराष्ट्र सरकारने एस.जी.बर्वे यांच्या शिफारशींचा स्वीकार केला. त्यानंतर महानगरीय समस्यांचे विभागीय संदर्भानुसार परीक्षण व मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांसाठी मार्च १९६५ मध्ये गोखले इंस्टीट्युटचे संचालक प्रा.डी.आर. गाडगीळ यांच्या समितीची नियुक्ती करण्यात आली. गाडगीळ समितीच्या परीक्षणाद्वारे प्राप्त झालेल्या सूचनांमध्ये, मुंबई, पनवेल आणि पुणे महानगरांच्या विभागीय नियोजनाकरीत मार्गदर्शक तत्वे आखली जावीत व अशा प्रकारच्या योजनांच्या तयारी आणि अंमलबजावणीकरिता 'महानगर प्राधिकरणाची' स्थापना करण्यात यावी या मुद्द्यांचा समावेश होता.

मंडळाच्या शिफारसीनुसार नवीन महानगर ज्याला आज आपण 'नवी मुंबई' या नावाने ओळखतो, हे महानगर २१ लक्ष लोकसंख्येस सामावून घेणारे असावे असे सुचविण्यात आले. या शिफारशीचा महाराष्ट्र सरकारने स्वीकार केला. तदनुसार १७ मार्च, १९७० रोजी 'शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र मर्या.' संस्थेची स्थापना करण्यात आली. राज्य शासनातर्फे फेब्रुवारी १९७० मध्ये सध्याच्या नवी मुंबई क्षेत्रातील ८६ गावातील १५९,५४ चौ.कि.मी. क्षेत्रफळाच्या भूसंपादनाची अधिसूचना महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत जाहीर करण्यात आली. ऑगस्ट १९७३ मध्ये इतर ९ गावातील २५.७० चौ.कि.मी. क्षेत्रफळाचा यामध्ये अंतर्भाव करण्यात आला. मार्च १९७१ मध्ये सिडकोची नवी मुंबई प्रकल्पासाठी 'नवीन शहरे

विकास प्राधिकरण' पदावर नियुक्ती करण्यात आली. ऑक्टोबर १९७१ मध्ये सिडकोने महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम, १९६६ नुसार विकास आराखडा तयार करण्यास सुरुवात केली व नंतर तो प्रसिद्धही करण्यात आला.

नवी मुंबईच्या निर्मितीसाठी नियोजन आणि विकासाचा बहुकेंद्री आकृतिबंध स्वीकारला. त्या अनुषंगाने ऑक्टोबर १९७० साली आखलेल्या बृहद आराखड्याला ऑगस्ट १९७१ मध्ये शासनाने मान्यता दिली. आवश्यकतेनुसार त्यात वेळोवेळी फेरबदलही करण्यात आले. या आकृतिबंधाने निवासी क्षेत्र, रोजगार क्षेत्र, घाऊक बाजार, प्रदूषण मुक्त, उद्योग आणि लोकसंख्येची घनता यांची यथायोग्य विभागणी केली. आज सेवा-सुविधांच्या बाबतीत नवी मुंबईला परिपूर्णत्वाची उपाधी बहाल करण्यात आली. जेव्हा कधी भौतिक, वाहतूक, गृहनिर्माण, आरोग्य, आतिथ्य, आर्थिक किंवा पर्यावरण विषयक सेवा-सुविधांची पडताळणी केली जायील, त्यामुळे सर्व शहरात नवी मुंबई निर्विवादपणे आग्रक्रमांकावर असेल.

या शहरातील पायाभूत सोयी-सुविधा, विकास जगातील इतर विकसित शहरांच्या बरोबरीने आहेत. त्याचबरोबर नवी मुंबईतील शैक्षणिक आणि व्यवसायिक सुविधा परिपूर्ण तसेच वाढती मागणी सामावून घेणारे आहेत, त्यामुळेच मनुष्यबळाला स्थानिक रोजगार मिळणे सुलभ झाले आहे. आणि त्याचमुळे भावी पिढीला जागतिक स्पर्धांना सामोरे जाण्याचे पूर्ण स्वातंत्र्य उपलब्ध होत आहे. बांधकाम विअक्साचे सन्मान असणारे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, सिडको प्रदर्शन संकुल, सेझ, आणि नवी मुंबई मेट्रो या सर्व प्रकल्पांमुळे येथील व्यापारास मदत मिळेल आणि जगभरातील विविध संस्था नवी मुंबईच्या बहुविध बाजारात व्यापार करण्यास येतील. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रकल्पांमुळे येथील व्यवसाय व वाणिज्यास प्रशस्त संधी नि'र्ाण करून देईल त्याचबरोबर या शहराला आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्र बनवण्यास मदत करेल. या शहरात येणा-या नवीन व्यापार व व्यापारी संस्थांमुळे येथे असलेल्या लोकांना नवीन नोक-यांची संधी मिळेल त्या पुढेही जाऊन येथील लोकसंख्या वाढेल आणि गृहोपयोगी वस्तूंची मागणी देखील वाढेल. सिडको, शहरांची कार्यक्षम नियोजक असल्यामुळे भविष्यकालीन संभाव्य असणा-या लोकसंख्या वाढीस

निवासाची सोय करण्यास आतापासूनच सिडकोची तयारी सुरु आहे. आज सिडकोची भारतातील प्रमुख नगर विकास व पायाभूत सुविधा विकसित करणारी संस्था अशी कीर्ती आहे, जेव्हा सिडकोस शहरांचे शिल्पकार या नावाने संबोधले जाते तेव्हा सिडको महामंडळ तसे करूनही जाते.

• • •

# पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण



पिंपरी चिंचवड हे शहर अतिशय झपाट्याने वाढणारे शहर आहे. या शहराचा विकास नियोजनबद्ध आणि शिस्तबद्ध पद्धतीने व्हावा यासाठी एका प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. तेच हे पिंपरी चिंचवड न्यू टाऊनशिप डेव्हलपमेंट ऑथॉरिटी (PCNTDA) अर्थात पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण! या प्राधिकरणाची स्थापना सन १९७२ मध्ये करण्यात आली. हे प्राधिकरण म्हणजे पुणे महानगर क्षेत्राचे एक अविभाज्य घटक असले तरी पिंपरी-चिंचवड भागाचा स्वतंत्रपणे विकास करण्याची जबाबदारी या प्राधिकरणाकडे आहे. या प्राधिकरणाच्या माध्यमातून या भागातील प्रचंड वेगाने वाढणाऱ्या बहुसंख्येसाठी शहरी गृहनिर्माण आणि व्यवसाय व उद्योगासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम गेल्या ४५ वर्षांपासून सुरू आहे. राज्य शासनाच्या धोरणानूसार सुमारे ५ लाख लोकसंख्या सुमारे ४३ चौरस कि.मी. क्षेत्रावर बसवून तेथे गृहनिर्माण, व्यवसायिक सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम सुरू आहे. आतापर्यंत अवघे २५% उद्दीष्टे पुणे झाले. या भागाला या नवनगर विकास प्राधिकरणाने उत्तम दर्जाच्या नागरी सुविधा आणि शहरी पायाभूत सुविधा पुरविल्या आहेत. यापुढे शहराच्या वाढीचा वेग प्रचंड असल्यामुळे त्या दृष्टीने नियोजन करून नियोजनबद्ध शहरीकरण कसे होईल यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

प्राधिकरणाच्या नियोजनबद्धतेमुळे या शहराची गणना विकसित शहरांमध्ये

केली जात आहे. केवळ आत्ताचाच विचार केला जात नाही, तर पुढील २५ वर्षांचे शहराचे चित्र डोळ्यासमोर ठेवून नागरी सुविधा निर्माण केल्या जात आहेत. त्यामध्ये रस्ते, पिण्याचे पाणी, सांडपाण्याची व्यवस्था, वीज पुरवठा, शहराचे सुशोभिकरण, शाळा, खेळाची मैदाने, क्लब हाऊस, वाहतुकीच्या सोईसाठी उड्डाणपूल, पार्किंग व्यवस्था, फेरीवाल्यांसाठी जागा, ठिकठिकाणी संरक्षण भिंती बांधणे, अंतर्गत रस्ते, वृक्षारोपण, तलावांचे सुशोभिकरण, भाजी मंडई, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांसाठी गृहनिर्माण प्रकल्प, ॲडव्हेंचर पार्क, विरंगुळा केंद्र, उद्याने, बहुउद्देशिय सभागृह अशी असंख्य कामे या प्राधिकरणाच्या माध्यमातून मार्गी लावली आहेत. त्यामुळे या शहराला एक नियोजनपूर्व व शिस्तबद्ध आकार मिळाला आहे. रस्त्यालगत आणि तलाव नाले यांच्या बाजूने सुशोभिकरण आणि वृक्ष लागवड करून शहराच्या सौंदर्यात भर घातली आहे.

काळेवाडी फाटा येथील औंध-रावेत रस्त्यावर दोन समांतर उड्डाणपूल, प्राधिकरणाची सुसज्ज अशी आकुर्डी येथे इमारत, आकुर्डी रेल्वे स्थानकाजवळ सबवे, पेठ क्र. ३९ मध्ये क्रिडांगणे, वाकड पोलिस स्टेशन इमारत, पेठ क्र. ६ मध्ये ट्राफीक पार्क, भोसरी सेक्टर ४,९,१०,२८ क्रिडांगण व क्लब हाऊस, टाटा मोटर्स येथील मर्सिडीज बेंझ जवळ उड्डाणपूल, सेक्टर ४ मध्ये हॉकर्स झोन, कुदळवाडी चौकात उड्डाणपूल, स्पाईन रस्त्याच्या मध्यभागी वृक्षारोपण व सुशोभिकरण अशी अनेक कामे या प्राधिकरणाने करून नागरीकांच्या सोयी सुविधांमध्ये भरीव कार्य केले आहे.

या प्राधिकरणाची सुत्रे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांकडे असतात. प्राधिकरणाची एक समिती असून विभागीय आयुक्त त्याचे अध्यक्ष आहेत. त्याचबरोबर जिल्हाधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त, मुख्य अभियंता, शहर रचना विभागाचे उपसंचालक, जीवन प्राधिकरणाचे अधिक्षक अभियंता, टाऊन प्लॅनिंगचे सहसंचालक, प्राधिकरणाचे मुख्य कार्यकरी अधिकारी हे सर्व या समितीमध्ये असतात. ते सर्वजण शहराचा विकास आराखडा आणि मुलभूत सोयी सुविधा याबाबतीत बारकाईने विचार करत असतात. आतापर्यंत प्राधिकरणाने केलेला विकास डोळ्यात भरण्यासारखा आहे.

• • •

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA), पुणे



पुणे मेट्रोपॉलिटन रीजन डेव्हलपमेंट ऑथॉरिटी (पीएमआरडीए) हे पुणे मेट्रो क्षेत्रासाठी नियोजन आणि विकास प्राधिकरण आहे, जे एक योजनाबद्ध आणि सुव्यवस्थित रीतीने विकासाच्या दिशेने वाटचाल करते. पीएमआरडीए हे सन २०१५ मध्ये अधिसूचित करण्यात आले. त्याचे क्षेत्रफळ २,८०१.७३ चौ.मी. असून अंदाजे ७२.७६ लाख लोकसंख्या आहे, ज्यामुळे ते महाराष्ट्रातील सर्वात मोठे शहरी क्षेत्र बनविते.

माहिती युगात शहरी विकास आणि शासन आणने, पीएमआरडीए इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल चॅनेलद्वारे सर्व कायदेशीर आणि नियमन प्रक्रिया एकत्रित करत आहे. सर्व भागधारकांसाठी माहिती सहजपणे उपलब्ध करून देणे, पीएमआरडीएचा उद्देश आहे की आपल्या नागरिकांसाठी जगातील सर्वात जास्त जिवंतता निर्देशांकाची अंमलबजावणी करणे, तसेच भविष्यातील त्रासमुक्त आणि कार्यक्षम पर्यावरणाची ऊर्जा उभारणी करणे.

पीएमआरडीए पुणे शहर, मावळ, मुळशी, हवेली, भोर, दौंड, शिरुर, खेड, पुरंदर आणि वेल्हे या भागांचे संपूर्ण तालुके समाविष्ट करतात. महाराष्ट्र शासनाच्या नागरी विकास विभागाने पीएमआरडीएची कायदेशीररित्या अधिकार असलेली आणि स्वत:ची वित्तपुरवठा संस्था आहे. पीएमआरडीएचा सर्वात मोठा

फायदा हा आहे की त्याचा बहुतांश भाग ग्रीनफील्ड विकासाच्या अंतर्गत येतो.

गेल्या तीन दशकांत पुणे शहराला प्रमुख शहरी समूहांपैकी एक म्हणून विकसित केले आहे. पीएमआरडीए राज्य आणि देशाच्या सीमेच्या पलीकडे जाऊन अनेक उद्योग/क्षेत्रांना कुशल मनुष्यबळ आणि प्रतिभा देणारी शैक्षणिक केंद्र म्हणून गणली जाते. परिणामी, पीएमआरडीए एका समकालीन औद्योगिक हबमध्ये वेगाने वाढले आहे आणि आज प्रचंड क्षमता असलेले एक मोठे विकसित शहर म्हणून ओळखले जाते.

या उत्क्रांतीमुळे पुणे क्षेत्राला एक प्रमुख विकास केंद्र आणि एक आकर्षक गुंतवणूकीचे स्थान म्हणून स्थान मिळाले आहे. जगभरातील बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून कंपनी स्थापित करण्यासाठी आणि भविष्यातील भविष्यासाठी होणाऱ्या व्यवसायांना विस्तारित करण्यासाठी हा प्रदेश आकर्षणाचा केंद्र झाला आहे.

पीएमआरडीए क्षेत्र चांगले हवामान, नैसर्गिक साधनसंपत्तीची विपुलता, समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारताच्या आर्थिक राजधानी मुंबईजवळ आहे. हे महत्त्वपूर्ण घटक नवीन व्यवसायांच्या विकासासाठी आणि विद्यमान लोकांच्या विस्तारास प्रोत्साहन देतात.

# प्रस्तावित
# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ
# कोपर-पनवेल



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे भारतातील मुंबई शहराजवळचा प्रस्तावित विमानतळ आहे. हे विमानतळ कोपर-पनवेल भागात बांधण्याचा आराखडा आहे. यात भारतीय विमानतळ प्राधिकरण आणि महाराष्ट्र सरकार (सिडको द्वारे) यांचे प्रत्येकी १३% तर ७६% खाजगी भांडवल असेल. हे विमानतळ ११.४ किमी स्के. प्रदेशात विस्तारलेला असेल. यावर ४,५०० मीटर लांबीच्या दोन समांतर धावपट्ट्या असतील. याचे प्रवासी टर्मिनल २,५०,००० मीटर स्के. क्षेत्रफळाचे असेल तर मालसामानाचा धक्का १,००,००० मीटर स्के. क्षेत्रफळाचा असेल. येथून दरवर्षी ५ ते ५.५ कोटी प्रवासी हाताळण्याची क्षमता असेल. या विमानतळासाठी एकूण ९० अब्ज रुपये खर्च केले जातील. पैकी पहिल्या टप्प्यात ४० अब्ज रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

हे विमानतळ मुंबई-पनवेलमधील रा.म.क्र.४ब वर सध्याच्या सहारा विमानतळापासून ३५ किमी अंतरावर प्रस्तावित आहे. ही जागा निवडताना नव्या मुंबईतील वाढती लोकसंख्या, औद्योगिक आणि व्यापारी संकुले तसेच ती वाढण्यासाठी असलेला मोठा वाव हा मुख्य निकष होता. एरबस ए-३८० आणि बोईंग ७४७-८ सारख्या अतिप्रचंड विमानांनाही या विमानतळावर ये-जा करणे

सोपे होईल अशा दृष्टिने या विमानतळाची रचना करण्यात येईल.

याची उभारणी चार टप्प्यांत करण्यात येईल. पहिला टप्पा सन २००८–२०१२ दरम्यान असेल. ४.२ अब्ज रुपये खर्च करुन या टप्प्यात एक कोटी प्रवासीक्षमता असलेला तळ उभारण्यात येईल. सन २०१५–२०१७ दरम्यानच्या दुसऱ्या टप्प्यात १.९ अब्ज रुपये खर्चून याची क्षमता दोन कोटी प्रवाशांची करण्यात येईल. तिसऱ्या टप्प्यात (२०२०–२२) प्रवासीक्षमता तीन कोटी करण्यासाठी १.६ अब्ज रुपये खर्ची पडतील तर चौथ्या टप्प्यात (२०२६–२८) ही क्षमता ४ ते ५ कोटी होईल व त्यासाठी अजून २.३ अब्ज रुपये वापरण्यात येतील. सन २०३० पर्यंत या विमानतळावरुन तीन कोटी प्रवासी ये–जा करतील असा अंदाज आहे.

या विमानतळाची उभारणी सरकारी तसेच खाजगी भांडवलातून करण्यात येईल. ठाणे–बेलापूर, तळोजा येथील औद्योगिक वसाहती, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट येथून मालसामान तर पुण्यापासून उत्तर मुंबईपर्यंतच्या पट्ट्यातील प्रवासी या विमानतळाचा उपयोग करतील असा अंदाज आहे.

या विमानतळाच्या उभारणीवरुन अनेक वाद निर्माण झाले. जरी साधारण तारखा ठरल्या असल्या तरी अजूनही बांधकाम सुरू करण्यासाठीची मुदत ठरवण्यात आलेली नाही. जगातील इतर शहरांप्रमाणे मोठे आंतरराष्ट्रीय विमानतळ गाव/शहरापासून दूर बांधून तेथे ये–जा करण्यासाठी रस्ते/लोहमार्ग बांधावे अशीही एक मागणी आहे. यामागे उद्योगधंदे व शेतीसाठी वापरली जाणारी जमीन विमानतळांसाठी न वापरता पडीक जमीन वापरली जावी हा हेतू असतो.

# हिंदुस्तान अँटिबायोटिक्स लिमिटेड पिंपरी




पिंपरी येथे भारतातील पहिली भारत सरकारची सार्वजनिक क्षेत्रातील औषध उत्पादक कंपनी आहे. सन १९९३ मध्ये भारतातील पहिली कंपनी जीने आरएचयू-एरिथ्रोपोएटीन (हेमॅक्स) हे रिकॉम्बीनंट डीएनए प्रॉडक्ट लाँच केले. कंपनीने सन २००८ मध्ये हेलपॅन, हॉल्टॅक्स, हेक्झनसारख्या नवीन उत्पादनांची सुरुवात केली. सॅटी-एचआयव्ही औषधे सप्टेंबर २००९ पासून तयार केली जातात.

भारतातील गरीबांना स्वस्त दरात औषधे मिळावीत या महात्मा गांधींच्या विचाराच्या आधारावर एचएएलची स्थापना डब्ल्युएचओ आणि युनिसेफ यांच्या सहकार्याने करण्यात आली होती. १० मार्च १९५४ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते उद्घाटन झाले. कंपनीचे १९५५ मध्ये उत्पादन सुरू झाले.

एचएएल पेनिसिलिन, स्ट्रेप्टोमायसिन, जेनेटिमिसिन, एम्पीसिलीन आणि अमोक्कोसिलीन इत्यादिंसारख्या अँटीबायोटिक्सचे व्यावसायिक उत्पादन करते. एचएएलने कृषी-पशुवैद्यकीय उत्पादनांमध्ये देखील वैविध्यपूर्ण केले आहे. महाराष्ट्र एंटीबायोटिक्स अँड फार्मास्युटिकल्स लि. आणि कर्नाटक अँटीबायोटिक्स अँड फार्मास्युटिकल्स लि. यांना भारताबाहेर परवडणारी औषधे उपलब्ध करून देण्याचे त्यांचे सामाजिक उद्दिष्ट आहे.

• • •

# आय.एन.एस. शिवाजी




आय.एन.एस. अर्थात इंडियन नेव्हल स्टेशन म्हणजेच भारतीय नौदल तळ. हे तळ देशभरात अनेक ठिकाणी आहेत. त्यापैकी पुणे शहराजवळ एक आहे त्याचे नाव आय.एन.एस. शिवाजी असे असून तो तळ लोणावळा या निसर्गरम्य ठिकाणी आहे. या ठिकाणी नौदलात दाखल होणाऱ्या अधिकाऱ्यांना अभियांत्रिकीचे प्रशिक्षण देणारे महाविद्यालय आहे. नौदल आणि तटरक्षक दलाच्या जवानांना या ठिकाणी प्रशिक्षण दिले जाते. या तळाची निर्मिती दि. १५ फेब्रुवारी १९४५ मध्ये झाली आहे. हा परिसर लोणावळा शहराच्या दक्षिणेस चार-पाच कि.मी. अंतर असलेल्या सुप्रसिद्ध भुशी डॅमजवळ वसलेला आहे. सुमारे ८७५ एकर जागेवर ही संस्था उभारली आहे. समुद्रामध्ये काही आपातकालीन घटना घडली तर मदतीचे प्रशिक्षण नौदल आणि तटरक्षक दलाच्या जवानांना दिले जाते.

अलिकडे या ठिकाणी नौदलाच्या अधिकाऱ्यांना अणुतंत्रज्ञान, जैविक तंत्रज्ञान आणि रासायनिक सुरक्षा विषयी प्रशिक्षण येथील केंद्रात दिले जाते. सागरी अभियांत्रिकी तंत्रज्ञान देखील या ठिकाणी शिकवले जाते. त्यामुळे नौदलाच्या या तळाला अधिक महत्त्व असून या भागातील सुरक्षादेखील कडक आहे. भूशी डॅम परिसरात पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांसाठी आय.एन.एस. शिवाजी हे नौदल तळ भूरळ घालते.

● ● ●

# मिलीटरी इंजिनियरींग कॉलेज दापोडी



लष्करी यांत्रिकी महाविद्यालय किंवा कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनियरिंग (College of Military Engineering) ही भारतीय लष्कराच्या कोअर ऑफ इंजिनियर्स ह्या शाखेची एक तंत्रज्ञान प्रशिक्षण संस्था आहे. येथे भारतीय लष्करातील निवडक जवानांना यांत्रिकीचे प्रशिक्षण दिले जाते.

मुंबई-पुणे महामार्गावर पुणे महानगरातील खडकी लष्कर तळाजवळ हे कॉलेज आहे. कॉलेजचा परिसर मुळा नदीच्या काठावर ३,६०० एकर (१५ चौ. किमी) क्षेत्रावर पसरला असून येथे केवळ लष्करी अधिकार्यांना व लष्करातील नागरी कर्मचाऱ्यांना प्रवेश मिळतो.

• • •

# दारूगोळा कारखाना देहूरोड




देहूरोड येथून जवळच असलेला भारताच्या संरक्षण खात्याचा दारूगोळा निर्मिती कारखाना हा महत्त्वाचा कारखाना आहे. तो देहूरोड जवळील शेलारवाडी भागात आहे. या कारखान्यामध्ये पायरोटेक्निक दारू गोळ्याची निर्मिती करण्यात येते. रात्रीच्या वेळी युद्धनौकांचा वापर करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या पायरोटेक्निक दारूगोळ्यांची निर्मिती करणे अत्यंत गरजेचे होते. त्यासाठी सन १९७७ मध्ये या कारखान्याच्या निर्मितीला मंजूरी मिळाली आणि सन १९८२ मध्ये पहिला टप्पा पूर्ण झाला. तर सन १९८४ मध्ये दुसरा टप्पा पुर्ण होऊन उत्पादन सुरू झाले. या ठिकाणी दारूगोळ्याची निर्मिती आणि साठवणूक केली जाते.

या ठिकाणी हात बॉम्ब, बॉम्ब, धुरांचे दारूगोळा, धुक्यातील सिग्नल, बुलेटप्रुफ वाहने आदि यंत्रणा या ठिकाणी केली जाते. या ठिकाणाहून देशभरात हा दारूसाठा पुरविला जातो. देशभरात असे ३९ कारखाने आहेत. त्यापैकी तळेगाव देहूरोड यांच्या दरम्यानचा हा एक कारखाना आहे. याशिवाय महाराष्ट्रात आणखी १० असे आयुधांचे कारखाने आहेत.

• • •

# एन.ए.डी.- मोरा



भारतीय नौदलाच्या शास्त्रगाराची (एन.ए.डी.) स्थापना स्वातंत्र्यपूर्व काळात सन १९४५ मध्ये झाली आहे. देशाला समुद्र मार्गे पश्चिमेकडून धोका असल्याने भारतीय नौदलने मुंबई जवळील मोरा या समुद्र किनाऱ्याजवळील गावात हा नौदलाचा शस्त्रगार स्थापन केला. हे ठिकाण रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात आहे. हे ठिकाण अतिसंवेदनशील म्हणून घोषित आहे. सन १९७१ च्या भारत पाक युद्धात नौदलाने चांगली कामगिरी बजावली होती. त्या दृष्टीकोनातून नौदलाचे सामर्थ्य वाढवण्यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न केले गेले. त्यात उरणजवळच्या एन.ए.डी. चा समावेश आहे. या ठिकाणी नौदलाचा शस्त्रसाठा असून चोख बंदोबस्त असतो.

# भक्ती-शक्ती शिल्प - निगडी देशातील उंच तिरंगा



भक्ती शक्ती हे महान संत तुकाराम महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्यात झालेल्या भेटीचे स्मरण म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने स्थापित केलेल्या पुतळ्यांचा संग्रह आहे. भक्ती-शक्ती हे अध्यात्म आणि शक्तीची संघटना दर्शवते. ऐतिहासिकदृष्ट्या छत्रपती शिवाजी महाराज हे 'हिंदवी स्वराज्य'च्या सुरुवातीच्या दिवसांमध्ये संत तुकाराम महाराजांचे आशिर्वाद घेण्यासाठी देहूला आले होते. हे ठिकाण जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरील सेक्टर २३, निगडी येथे आहे. प्रसिद्ध आर्ट स्टुडिओ, नाशिक येथील मुर्तीकार मदन गर्गे यांनी पुतळे बनविण्याचे काम केले. संत तुकाराम महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची उंची २० फूट असून इतर पुतळे १० फूट उंचीवर आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका (पीसीएमसी) चा दावा आहे की भक्ती शक्ती चौकात देशाचा सर्वात मोठा राष्ट्रीय ध्वज १०७ मीटर आहे. भारतातील सर्वात मोठा राष्ट्रीय ध्वज प्रदूषण केंद्र अटारी, अमृतसर येथे आहे, जो ११० मीटर वर आहे.

पीसीएमसीचे सिव्हिल डिपार्टमेंटचे कार्यकारी अभियंता सतीश इंगळे यांनी ठामपणे सांगितले, ७ जानेवारी रोजी ३.३९ कोटी रूपये निविदा मंजूर करण्यात आली होती. हा करार आउटसोर्सिंग एजन्सी एस.एस. साठे कंपनी

आणि बजाज इलेक्ट्रिकल्स यांना देण्यात आला होता. ध्रुव आणि ध्वजांची संरचनात्मक रचना कॉलेज ऑफ इंजिनियरिंग पुणे (कोइईपी) द्वारे मंजूर केली गेली आहे.

बांधकाम आधीपासूनच सहा महिन्यांपूर्वी सुरू झाले होते आणि युरोपियन स्टँडर्ड (ईएस) कोडवर आधारित होते कारण १२.५० मीटर्सच्या पुढे हाय फास्ट स्ट्रक्चर्स डिझाइन करण्यासाठी भारतीय मानक कोड नाही. तथापि, बजाज इलेक्ट्रिकल्सचे इलेक्ट्रिकल मॅनेजर स्नेहल वाकोडीकर यांनी सांगितले की, भारतीय मानक (आयएस) कोड शहराच्या अचूक वारा गती मिळविण्यासाठी वापरले गेले आहेत. वाकोडीकर यांनी सांगितले की, प्रवासात जास्तीत जास्त वायु वेग ३९ मीटर प्रति सेकंद आहे.

सिविल इंजिनिअरिंग विभागातील कोइपी असोसिएट प्रोफेसर नामदेव हेडु म्हणाले, ध्रुव आणि ध्वजचे स्ट्रक्चरल डिझाइन पवन मापदंड आणि भूकंपग्रस्त प्रभाव लक्षात घेऊन आम्हाला मंजुरी दिली आहे. खांबाचा पाया ८८ आहे, जो पोलचा भार घेण्यास सक्षम आहे. बजाज इलेक्ट्रिकल्सने तयार केलेले विभाग सुरक्षित आहेत आणि ध्वजसह वाराचा दबाव टिकवून ठेवू शकतात. या ध्वजसाठी वापरलेली सामग्री दीर्घ कालावधीसाठी टिकून राहू शकते.

• • •

# मुंबई-पुणे एक्सप्रेस वे



मुंबई - पुणे एक्सप्रेस हायवे अर्थात यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग. हा देशातील पहिला सहापदरी काँक्रीटने बनवलेला महामार्ग असून तो देशाची आर्थिक राजधानी मुंबई आणि आय.टी. हब असलेले पुणे शहर यांना जोडणारा आहे. या महामार्गाची निर्मिती शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रेरणेने सन १९९५-९६ साली शिवसेना-भाजपा युतीच्या सरकार राज्यात सत्तेवर असताना सुरू झाली. त्यानंतर सन २००२ हा महामार्ग बांधून वाहतुकीसाठी सुरू झाला. हा नियंत्रित प्रवेश महामार्ग असून त्यासाठी टोल भरावा लागतो. या महामार्गामुळे पुणे-मुंबई हे १४८ कि.मी. चे अंतर अवघ्या ९४.५ कि.मी.वर आले आहे. या महामार्गावर कोणताही अडथळा नाही काटरस्ता नाही की सिग्नल यंत्रणा नाही. त्यामुळे भारतात कुठेही धावल्या नाहीत इतक्या वेगाने गाड्या या महामार्गावरून धावतात. त्यामुळे पूर्वी पुणे-मुंबई हे अंतर पार करण्यासाठी ४ ते ५ तास लागायचे. आता हे अंतर अवघ्या दोन तासात पार केले जाते. देशातील सर्वात जास्त वर्दळीचा हा महामार्ग समजला जातो.

पूर्वी मुंबई-पुणे महामार्ग क्र. ४ हा ब्रिटीशांच्या काळात बांधला गेला होता. परंतू वाढती वाहतूक आणि अपघाताचे वाढते प्रमाण, बोरघाटात होणारे ट्राफिक जॅम यामुळे नव्या महामार्गाची गरज निर्माण झाली. त्यावेळी सन १९९० साली तत्कालीन सरकारने केंद्र सरकारच्या राईटस् आणि ब्रिटीश कंपनी स्कॉट विल्सन यांना नवीन महामार्गाच्या निर्मिती करिता पाहणी आणि अभ्यास करायला

सांगितला सन १९९४ मध्ये या कंपन्यांनी आपला अहवाल सादर केला. त्यावेळी या महामार्गाचा खर्च ११४६ कोटी इतका अपेक्षित होता.

त्यानंतर १९९७ साली शिवसेना -भाजप युतीचे सरकार असताना या महामार्गाच्या प्रत्यक्ष बांधकामात सुरूवात झाली. ती जबाबदारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे सोपविली. त्यानंतर महामंडळाने बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्वावर ३० वर्षे टोल आकारून खर्च वसूल करण्याचा निर्णय घेतला आणि कामाच्या निविदा मागवण्यात आल्या. एकूण ५५ निविदा आल्या होत्या. त्यापैकी ४ ठेकेदार कंपन्यांकडे या महामार्गाची जबाबदारी देण्यात आली. त्यानंतर दोन वर्षातच महामार्गाचा पहिला टप्पा सन २००० मध्ये सुरू झाला तर त्यानंतर दोन वर्षांनी दुसरा टप्पा म्हणजे सन २००२ मध्ये संपूर्ण महामार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. हा महामार्ग नवी मुंबई शहर संपताच पनवेलच्या जवळ असलेल्या कळंबोली येथे सुरू होतो आणि पुणे शहराजवळ रावेत येथे संपतो. येथून वाहनांना पिंपरी-चिंचवडकडे जाता येते. येथून पुढे पुणे-बेंगलोर महामार्ग सुरू होतो. बोरघाटामध्ये जुन्या महामार्गावर तीव्र वळणे आणि चढे चढ होते. परंतु या नव्या महामार्गाने तितकीशी तीव्र वळणे आणि चढ नाहीत.

या महामार्गावरून बाहेर पडण्यासाठी शेडूंग (पनवेल) चौक, खालापूर लोणावळा (२), तळेगाव व सोमाटणे येथे फाटे देण्यात आले आहेत. या महामार्गावर अनेक ठिकाणी उड्डानपूल बांधण्यात आले आहेत. तर ६ ठिकाणी बोगदेही तयार करण्यात आले आहे. बोरघाटच्या खाली खालापुर येथे तर घाटाच्या वर तळेगाव येथे टोलनाके आहेत. या महामार्गावरून धावणारी वाहने अतिवेगाने धावत असतात. त्यामुळे दुचाकी-तीनचाकी, बैलगाड्या आणि ट्रॅक्टरना या महामार्गावर परवानगी नाही. या महामार्गावरील ६ बोगदे कोकण रेल्वे कॉर्पोरेशन ने खोदले आहे. भातन, माडप, आडोशी, खंडाळा आणि कामशेतच्या हद्दीत दोन असे सहा बोगदे आहेत. या महामार्गाचा बराचसा भाग मावळ भागातून जातो. या महामार्गाने वेळेची आणि पैशाची बचत होत असल्याने देशाची अब्जावधी रूपयाची बचत झाली आहे.

• • •

# गहुंजे क्रिकेट स्टेडियम



महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियम (जुने नाव: सुब्रतो रॉय सहारा स्टेडियम) हे पुणे शहराजवळील एक क्रिकेट स्टेडियम आहे. पुण्याबाहेरील गहूंजे ह्या गावाजवळ मुंबई–पुणे द्रुतगतीमार्गाच्या बाजूला असलेले हे स्टेडियम एप्रिल २०१२ मध्ये बांधले गेले. पुण्यातील नेहरू स्टेडियम मधील सामान्यांच्या तिकिट वाटपावरून पुणे महानगरपालिका आणि महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन ह्यांच्या दरम्यान भांडणे चालू होती. भारतातील इंडियन प्रिमियर लीगची वाढती लोकप्रियता लक्षात घेता क्रिकेट असोसिएशनने नवे स्टेडियम बांधण्याचा निर्णय घेतला. या स्टेडियमसाठी पुण्याबाहेर गहुंजे गावाजवळील मुंबई – पुणे द्रुतगती मार्गालगतची जागा निवडण्यात आली. स्टेडियमच्या बांधकामाला रू.१५० कोटी इतका खर्च आला. दि. १ एप्रिल २०१२ रोजी तत्कालीन आय.सी.सी. अध्यक्ष व केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी नव्या स्टेडियमचे उद्धाटन केले. सन २०१३ मध्ये सुब्रतो रॉयच्या सहारा इंडिया परिवाराने या स्टेडियमचे नामकरण हक्क विकत घेतले व स्टेडियमचे नाव सुब्रतो रॉय सहारा स्टेडिअम असे ठेवले. सहारा पुणे वॉरियर्स या संघाचे हे गृहमैदान होते.

सन २०१३ साली पुणे वॉरीयर्स संघावर बंदी घालण्यात आल्यामुळे व सहारा परिवार आर्थिक संकटात सापडल्यामुळे या स्टेडियमाचा वापर कमी झाला. सहाराकडून करारित मानधन न मिळाल्यामुळे असोसिएशनने या स्टेडियमचे नाव पुन्हा महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियम असे ठेवले.

सन २०१५ इंडियन प्रिमियर लीगमधील किंग्ज इलेव्हन पंजाब संघाचे काही सामने येथे खेळण्यात आले.

या मैदानातील प्रेक्षककक्षाची रचना कोणत्याही बैठकीवरून संपूर्ण मैदानाचा देखावा दिसेल अशी करण्यात आली आहे. या मैदानावर वालूकामय माती पसरवून त्यावर गवत घातलेले आहे. त्यामुळे कितीही पाऊस पडला. तरी पाण्याचा निचरा काही मिनीटांतच होतो. आणि मैदान पुन्हा खेळण्यास लवकर तयार होते. या स्टेडियमची प्रेक्षकक्षमता ३७४०६ इतकी आहे. आत्तापर्यंत या स्टेडियमवर एकमेव कसोटी सामना दि. २३ ते २७ फेब्रुवारी २०१७ मध्ये झाला आहे. पहिल्या एकदिसीय सामना दि. १३ ऑक्टोबर २०१३ मध्ये भारत विरूद्ध ऑस्ट्रेलिया असा झाला होता. प्रथम ट्वेंटी ट्वेंटी सामना दि. २० डिसेंबर २०१२ साली भारत विरूद्ध इंग्लंड असा झाला होता.

• • •

# मावळ लोकसभा मतदारसंघ
# तालुके/विधानसभा

# पिंपरी विधानसभा




| | |
|---|---|
| एकूण प्रभाग | ९ |
| नगरसेवक संख्या | ३६ |
| मतदार संख्या | ३,७७,६६८ |

# चिंचवड विधानसभा





| | |
|---|---|
| एकूण प्रभाग | १४ |
| नगरसेवक संख्या | ५६ |
| मतदार संख्या | ४,७८,१९२ |

# मावळ तालुका



| | |
|---|---|
| गावे | १८२ |
| ग्रामपंचायत | १०४ |
| लोकसंख्या | ३,७७,५५९ |
| नगरपालिका | तळेगाव दाभाडे<br>एकूण प्रभाग-१३ नगरसेवक संख्या-२६ |
| | लोणावळा<br>एकूण प्रभाग-१३ नगरसेवक संख्या-२५ |
| पर्यटन स्थळे | तुंग, तिकोणा, राजमाची, कार्ला, लोणावळा, खंडाळा |
| औद्योगिक क्षेत्र | उर्से, कान्हे, टाकवे |

# कर्जत तालुका




| | |
|---|---|
| गावे | १८७ |
| ग्रामपंचायत | ५१ |
| लोकसंख्या | २,१२,०५१ |
| नगरपालिका | कर्जत<br>एकूण प्रभाग–५, नगरसेवक संख्या–१८ |
| | माथेरान<br>एकूण प्रभाग–५, नगरसेवक संख्या–१७ |
| पर्यटन स्थळे | कोंढाणा लेणी, माथेरान |

# खालापूर तालुका



| | |
|---|---|
| गावे | १२१ |
| ग्रामपंचायत | ४५ |
| लोकसंख्या | २,०७,४६४ |
| नगरपालिका | खोपोली<br>प्रभाग १४, नगरसेवक ३० |
| पर्यटन स्थळे | महाड गणपती, मोरबे धरण, उंबर खिंड, एनडी स्टुडिओ |
| औद्योगिक क्षेत्र | खालापुर, वावोशी, खोपोली |

# पनवेल तालुका




| | |
|---|---|
| गावे | १५८ |
| ग्रामपंचायत | ९२ |
| लोकसंख्या | ७,५०,२३६ |
| नगरपालिका | पनवेल महानगरपालिका<br>प्रभाग २०, नगरसेवक ८९ |
| पर्यटन स्थळे | कर्नाळा अभयारण्य |
| औद्योगिक क्षेत्र | तळोजा एम.आय.डी.सी. |

# उरण तालुका



| | |
|---|---|
| गावे | ६५ |
| ग्रामपंचायत | ३५ |
| लोकसंख्या | १,६०,३०३ |
| नगरपालिका | उरण<br>प्रभाग ६, नगरसेवक १८ |
| पर्यटन स्थळे | चिरणेर गणपती, घारापुरी लेणी, द्रोणागिरी किल्ला |
| औद्योगिक क्षेत्र | जे.एन.पी.टी. मेरी टाईम बोर्ड |

# मावळ लोकसभा मतदारसंघ







## श्रीरंग आप्पा बारणे

**खासदार, मावळ लोकसभा**

**संपर्क कार्यालय :**

**दिल्ली** : ६९, नॉर्थ एव्हेन्यू, नवी दिल्ली. फोन : ०११ २३०९४०२७
**पुणे** : श्री निवास, पद्मजी पेपरमिल जवळ, थेरगाव, चिंचवड. फोन : ०२०-६४१०७१७१
**पनवेल** : निल एन्स्पायर, १२५/२, एस.टी. स्टँड जवळ, पनवेल.

**Email :** appabarne@gmail.com **Web :** www.shrirangappabarne.com **Mobile App** *Link* : https://goo.gl/uePTwQ